महाराष्ट्रांतील किल्ले

भाग दुसरा.

चिंतामण गंगाधर गोगटे.

सन १९०७.

किंमत बारा आणे.

नांवें

४ वसई,

महाराष्ट्र देशांतील किल्ले.

भाग २ रा.

हा ग्रंथ.

चिंतामण गंगाधर गोगटे.

'छत्रपति थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र,'
'बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें चरित्र' व
'औरंगजेब बादशाहाचें चरित्र'
या पुस्तकांचे कर्ते,
यांनीं लिहिला.

आवृत्ति पहिली.

शके १८२८–सन १९०७.

पुणें येथें 'इंदिरा' छापखान्यांत त्र्यंबक हरि आवटे यांनीं
छापिलें आणि चिंतामण गंगाधर गोगटे
यांनीं प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना.

—:०:—

महाराष्ट्रांतलि किल्ल्यांचा हा दुसरा भाग तयार करण्याचा जो विचार माझे मनांत आला त्याचें सर्व श्रेय डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी व विशेषतः तिचे हुशार, मेहनती, व दीर्घोद्योगी माजी सेक्रेटरी रावबहादुर विष्णु बाळकृष्ण सोहनी यांसच दिलें पाहिजे. सोसायटीनें या ग्रंथाच्या पहिल्या भागास दक्षिणा फंडांतून दोनशें रुपयांचें बक्षीस दिलें आहे, व या भागास शंभर रुपयांचें बक्षीस दिलें आहे.

या भागांत ठाणें व रत्नागिरी हे जिल्हे, व सावंतवाडी कोल्हापूर व सांगली हीं संस्थानें एवढ्या प्रदेशांतील किल्ल्यांची माहिती दिलेली आहे. या पुस्तकास मुख्य आधार क्यांबेल साहेब यांनीं केलेल्या 'बॉम्बेय गॅझिटियर्स' नांवाच्या ग्रंथाचा आहे.

तथापि या भागांत दिलेल्या किल्ल्यांपैकीं कांहीं किल्ले विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यांतील किल्ले स्वतः पाहिलेले आहेत. जितकी माहिती मिळवितां आली तितकी मिळवून हा ग्रंथ तयार केलेला आहे. तथापि सुज्ञ वाचकांस एवढीच प्रार्थना आहे कीं, ज्यांच्या ज्यांच्या वाचण्यांत हा ग्रंथ येईल त्यांना यांत न दिलेली अशी जी कांहीं माहिती माहीत असेल ती त्यांनीं मेहरबानीनें ग्रंथकारास दिल्यास कदाचित् या ग्रंथाची पुनरावृत्ति काढण्याचा प्रसंग आलाच तर तिचा या ग्रंथांत मोठ्या आनंदानें समावेश केला जाईल. प्रत्येक किल्ल्याचे पायथ्याशीं जाऊन तेथच्या लोकांपासून माहिती मिळवून [illegible] हा ग्रंथ लिहिला गेला असता तर तो अपूर्व झाला अस[illegible] गोष्ट सत्य आहे. परंतु मोठ्या दुःखानें असें ह्मणावें [illegible] वसई,

तसें करण्यास ज्या सोई, व सवलती लागतात त्या मिळणें कठिण पडतें, व या सर्व गोष्टी होण्याला मुख्य आधारस्तंभ जो पैसा त्याची व ग्रंथकाराची तर बहुतेक फारकत झाल्यासारखें आहे. तेव्हां अभावाचे ठिकाणीं,कांहीं तरी थोडासा ओबड धोबड आकार आणण्याचा प्रयत्न करावा असा विचार मनांत येऊन हा ग्रंथ तयार केलेला आहे, व एवढ्याच गोष्टीवर समाधान मानून स्वस्थ बसणें भाग आहे.

ह्या ग्रंथाचा आणखीं एक भाग शिल्लक आहे. त्यांत खानदेश, नाशीक, नगर, सोलापूर, विजापूर बेळगांव, व धारवाड, एवढ्या प्रांतांतील किल्ल्यांची माहिती देण्याचा विचार आहे.

ग्रंथकर्ता.

अनुक्रमणिका.

ठाणें जिल्हा.

		पृष्ठ.
१	डहाणू	३
२	दिंडू.	५
३	संजान.	५
४	उंबरगांव.....	५
५	बल्लाळगड.	५
६	गंभीरगड.....	५
७	इंद्रगड.	६
८	सेगवाह किल्ला.	७
९	अशिरीचा किल्ला....	७
१०	असावचा किल्ला.....	११
११	शिरगांवचा किल्ला....	१२
१२	काळदुर्ग.	१३
१३	टकमकचा किल्ला....	१३
१४	तांदुळवाडीचा किल्ला.	१४
१५	अलीबागचा किल्ला.	१४
१६	भवनगड.	१४
१७	तारापुरचा किल्ला.	१५
१८	दांतिवरें किल्ला.	१८
१९	मानोरचा किल्ला.....	१८
२०	केळवेंमाहीमयेथीलकिल्ले	२०
२१	दांतिवऱ्याचा किल्ला.	२३
२२	अरनाळा किल्ला.	२३
२३	वसईचा किल्ला.	२५
२४	बेलापूरचा किल्ला.	५४
२५	धारावी किल्ला.	५६
२६	पारसिकचा किल्ला.	५६
२७	ठाण्याचा किल्ला.	५७
२८	वरसोवा.	५९
२९	जिवधनचा किल्ला.	६०
३०	कामनदुर्ग	६१
३१	कोंजचा किल्ला.	६१
३२	गूमतरा किल्ला.	६३
३३	भोपटगड	६३
३४	माहुलीचा किल्ला.	६४
३५	बळवंतगड.	६७
३६	बहिरवगड.	६७
३७	गोरखगड....	६९
३८	नळदुर्ग.	७०
३९	सिदगड.	७१
४०	कल्याणचा किल्ला.	७१

रत्नागिरी जिल्हा.

१	बाणकोट	८०
२	हर्णै.	८२
३	सुवर्णदुर्ग.....	८२
४	कनकदुर्ग	८६
५	फत्तेगड.	८६
६	गोवा किल्ला. ...	८९
७	मंडणगड.....	८९
८	सुमारगड.....	८९
९	महिपतगड.	९०
१०	पालगड.	९२
११	रसाळगड	९
१२	अंजनवेलचा किल्ल्यां नांवें	
१३	बहिरवगड.... ४ वसई,	
१४	गोवळकोट.	

पृष्ठ.
१५ भवनगड ९७
१६ मैमतगड.... ....९८
१७ उचितगड किंवा प्रचितगड. ९८
१८ जयगड. ९९
१९ पूर्णगड..... ....१०१
२० रत्नागिरीचा किल्ला.१०१
२१ विजयगड. १०१
२२ आंब्रोळगड. १०६
२३ यशवंतगड. १०७
२४ राजापुरचा किल्ला. १०७
२५ विजयदुर्ग किंवा घेरिया. १०८
२६ सांठवलीचा किल्ला. १०८
२७ बहिरवगड. ११५

पृष्ठ.
२८ देवगड. ११५
२९ खारेपाटणचा किल्ला ११६
३० कोटकामतें. ११७
३१ भरतगड. ...११८
३२ भगवंतगड. ११९
३३ वेताळगड. १२०
३४ सिधगड. १२०
३५ मालवणचा किल्ला किंवा सिंधुदुर्ग.....१२०
३६ सर्जेकोट. १२६
३७ नांदोसचा किल्ला. १२६
३८ निवतीचा किल्ला.....१२६
३९ रामगड..... ....१२७
४० किल्ला रेडी किंवा यशवंतगड. १२८

सांवतवाडी संस्थान.

१ आवर किल्ला. १३१
२ वांदें येथील किल्ला.१३२
३ कुडाळचा किल्ला.....१३२
४ महादेवगड. १३३
५ मनोहरगड. १३४
७ मनसंतोषगड. १३६
७ सांवतवाडीचाकिल्ला.१३७

कोल्हापूर संस्थान.

१ बावडा किल्ला. १३९
२भूधरगड..... ....१४१
३ पन्हाळा किल्ला.....१४१
४ पावनगड. १५१
५ रांगणा किल्ला. १५१
६ सामानगड. १५२
७ विशाळगड. १५३

सांगली संस्थान.

ोदवाडचाकिल्ला १५९
ठवेढ्याचाकिल्ला.१६१
ेचा किल्ला. १६५
चा किल्ला. १६६
५ श्रीमंतगड. १६८
६ तेरडळचा किल्ला. १६९
७ येलवट्टी किल्ला. १७०

महाराष्ट्रांतील किल्ल्यांचें वर्णन.

भाग दुसरा.

ठाणें जिल्हा.

हा जिल्हा उत्तरअक्षांश १८° ४२′ आणि २०° २०′, व पूर्वरेखांश ७२° ४५′ आणि ७३° ४८′ यांच्यामध्यें आहे. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ ३५७३ चौरस मैल आहे, व त्याची लोकसंख्या ८११४३३ आहे, आणि त्याचा वसूल सुमारें ११ लाख रुपये आहे.

या जिल्ह्याचा उत्तरेकडील भाग चिंचोळा होत गेलेला आहे, म्हणजे त्याच्या उत्तरसीमेची लांबी फक्त १३ मैल आहे. त्याच्या उत्तरेस काळू व दमणगंगा ह्या दोन नद्या असून त्यांच्या पलीकडे अमदाबाद जिल्ह्यापैकीं सुरत प्रांत, व पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील दमण प्रांत लागतो. पूर्वेस धरमपूरचें संस्थान, आणि नाशीक, अहमदनगर व पुणें हे जिल्हे आहेत. वर सांगितलेले तीन जिल्हे व ठाणें जिल्हा यांच्या दरम्यान सह्याद्रीची ओळ आहे. दक्षिणेस कुलाबा जिल्ह्यापैकीं कर्जत व पनवेल हे तालुके व उरण, हॉगबेटें, मुंबई, साष्टीबेट हा प्रदेश आहे, व पश्चिमेस आरबी समुद्र आहे.

या जिल्ह्याचे नऊ तालुके केलेले आहेत त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—१ डहाणू, २ माहीम, ३ वाडें, ४ वसई,

५ भिवडी, ६ शाहापूर, ७ साष्टी, ८ कल्याण, व ९ मुरबाड.

ठाणें जिल्ह्यांतील किल्ल्यांचें साधारण वर्णन.—ठाणें जिल्ह्यांत एकंदर ४० किल्ले आहेत, व त्यांचे तीन भाग करतां येतील. पहिल्या भागांत समुद्रकाठीं असणारे किल्ले मोडतात. यांची संख्या १९ आहे—डहाणू तालुक्यांत ४ (डहाणू, दिंडू, संजान व उंबरगांव.) माहीम तालुक्यांत ७ (अलिबाग, भवनगड, दातिवरें माहीम, पाणकोट, शिरगांव आणि तारापूर.) वसई तालुक्यांत ३ (अरनाळा, वसई व खारबाव.) साष्टी तालुक्यांत ५ (बेलापूर, धारावी, परसिक, ठाणें व वरसोवा.) कल्याण तालुक्यांत १ (कल्याण.) दुसरा भाग म्हणजे अंतःप्रदेशांतील किल्ले. हे एकंदर सोळा आहेत. त्यांपैकीं डहाणू तालुक्यांत ४ (बल्लाळगड, गंभीरगड, इंद्रगड, आणि सेगवाह.) माहीम तालुक्यांत ६ (असाव, अशेरी, काळदुर्ग, मानोर, टकमक व तांदुळवाडी.), वाडें तालुक्यांत १ (कोंज.), वसई तालुक्यांत २ (जिवधन व कमानदुर्ग.), भिवडी तालुक्यांत १ (गूमतारा.), शाहापूर तालुक्यांत २ (भोपटगड व माहुली.) तिसरा भाग म्हणजे सह्याद्रींतील किल्ले. हे ५ आहेत. त्यांपैकीं शाहापूर तालुक्यांत १ (बलवंतगड.) मुरबाड तालुक्यांत ४ (बाहिरवगड, गोरखगड, नलदुर्ग व सिंधगड.) ह्यांपैकीं बहुतेक किल्ले मुसलमान लोक किंवा पोर्तुगीज लोक यांनीं इ० स० १३०० पासून इ० स० १६०० च्या दरम्यान बांधलेले आहेत. सतराव्या शतकांत या बहुतेक किल्ल्यांची शिवाजीनें नीट दुरुस्ती केली होती. पोर्तुगीज

लोकांच्या सत्तेचा ऱ्हास झाल्यावर हे सर्व किल्ले मराठ्यांचे अमलाखालीं आले (इ० स० १७३९–४०.) नंतर इ० स० १७७४ त यांपैकीं कांहीं किल्ले इंग्लिशांनीं मराठ्यांपासून जिंकून घेतले, व इ० स० १८१८ त पेशवाई बुडाल्यावर बाकीचे त्यांच्या हातीं आले. इंग्लिशांचे हातीं हे किल्ले आले तेव्हां ते सर्व नादुरुस्त होते. त्यापूर्वींच्या वीस वर्षांत त्यांच्या दुरुस्तीकडे एक कवडीही खर्च झालेली नव्हती, व आंत झाडेंझुडपें वाढलेलीं होतीं किनाऱ्यावरील कांहीं किल्ले साधारण बऱ्या स्थितींत होते. इंग्लिशांचे हातीं ते आल्यावर त्यांनीं किनाऱ्यावरील किल्ल्यांस फारसा हात लाविला नाहीं, परंतु अंतःप्रदेशांतील बहुतेक किल्ले पाडून टाकिले. वसई, अरनाळा, तारापूर, गोरखगड, सिधगड वगैरे किल्ल्यांवर कांहीं दिवस इंग्लिशांनीं आपली शिबंदी ठेविली होती. परंतु पुढें लवकरच त्यांनीं आपलें सैन्य तेथून काढून टाकिलें, व तेव्हांपासून आजमितीपर्यंत ते सर्व ओसाड पडलेले आहेत, व कांहींतर नामशेष झालेले आहेत. त्यांचें तालुकेनिहाय वर्णन येणेंप्रमाणें:—

डहाणू तालुका.

—:०*०:—

या तालुक्यांत एकंदर ८ किल्ले आहेत; त्यांपैकीं ४ समुद्रकिनाऱ्यावर व ४ अंतःप्रदेशांत आहेत.

समुद्रकिनाऱ्यावरील ४ किल्ले.

१ डहाणू.—हा किल्ला डहाणू नदीच्या मुखापासून कांहीं अंतरावर तिच्या उत्तर तीरावर बांधलेला आहे.

त्याचे दगड टांकीचे असून तो मजबूत रीतीनें बांधलेला आहे. त्याच्या भिंती साधारणपणें ३० फूट उंच व १० फूट रुंद आहेत. इ० स० १८१८ त या किल्ल्याचे संबंधानें मेजर डिकिनसन यानें असें वर्णन केलें आहे कीं, " हा किल्ला फार चांगल्या स्थितींत आहे. त्याला चार बुरूज असून त्याला तोफा व बंदुका उडविण्याकरितां भोंकें आहेत, परंतु त्याच्या गच्चया पडून गेल्या आहेत. किल्ल्यांत बऱ्याच इमारती आहेत, परंतु त्या नादुरुस्त आहेत. किल्ल्यांत राहण्यासारखें एकही घर नाहीं. आंत एक पाण्याची विहीर आहे, परंतु ती पडून गेलेली आहे, व तिचें पाणी नासून गेलेलें आहे. किल्ल्याचा दरवाजा भक्कम आहे." इ० स० १८६२ त त्याचें असें वर्णन केलेलें आहे कीं, " हा किल्ला फार मजबूत आहे, परंतु हल्लीं त्यांत कांटेरी झाडेंझुडपें वाढलेलीं आहेत, व आंतील विहीर अगदीं पडून गेलेली आहे."

हा किल्ला पोर्तुगीज लोकांनीं बांधला असावा असें वाटतें. डहाणू येथें इ० स० १५३३ पासून इ० स० १७३८ पर्यंत पोर्तुगीज लोकांचा अमल होता. इ० स० १७३९ त चिमणाजी आप्पानें डहाणू शहर घेतलें त्या वेळीं डहाणूचा किल्ला मराठ्यांचे ताब्यांत गेला. पुढें इ० स० १८१८ त त्याचें स्वामित्व इंग्लिशांकडे आलें. या किल्ल्याचे संबंधानें महत्त्वाची अशी कोणतीही ऐतिहासिक गोष्ट उपलब्ध नाहीं. डहाणू हें एक प्राचीन काळचें शहर असावें असें वाटतें; कारण नाशीक जिल्ह्यांतील एका कोरींव लेण्यांत नहपान याचा जामात उशवदत्त यानें डहाणूक नदीवर नाव बांधिली असें वर्णन केलेलें आहे.

२ दिंडू—हें खेडें उंबरगांवच्या उत्तरेस १३ मैलांवर आहे. येथें एक पडापड झालेला लहानसा किल्ला आहे. तो बहुधा पोर्तुगीज लोकांनीं बांधला असावा. झेंडावेस्टामध्यें याचे संबधानें असें लिहिलें आहे कीं, "चांचे लोकांपासून तिकडील समुद्रकिनाऱ्याचें रक्षण करण्याचें काम जड पडूं नये म्हणून इ० स० १७९७त मराठ्यांनीं या किल्ल्याची नीट दुरुस्ती केली होती." याशिवाय या किल्ल्याचे संबधानें कांहींच माहिती मिळत नाहीं.

३।४ संजान व उंबरगांव—उंबरगांव येथें हे दोन कोट आहेत, परंतु त्यांची हल्लीं पडापड झालेली आहे, व तेथें महत्त्वाची अशी कोणतीच गोष्ट घडून आल्याचें कळत नाहीं. हे दोन्ही कोट पोर्तुगीज लोकांनीं बांधले असावे असें अनुमान होतें, व ते बहुधा चांचे लोकांपासून मुलखास उपद्रव होऊं नये म्हणून बांधले असावे.

अंतःप्रदेशांतील ४ किल्ले.

---

५ बल्लाळगड.—हा किल्ला उंबरगांवच्या पूर्वेस १० मैलांवर २०० फूट उंचीच्या एका टेंकडीवर बांधलेला आहे. याच्या सभोंवार दाट जंगल आहे. त्याचें क्षेत्रफळ अवघें ८० फुटांजवळजवळ आहे. त्याचा दरवाजा पडून गेला आहे. किल्ल्याचा तट सुमारें १९ फूट उंच व ७ फूट रुंद आहे. किल्ल्यांत एक शाकारलेलें घर असून एक पाण्याचें टांकें आहे. परंतु त्याचें पाणी अतिशय खराब झालेलें आहे. या किल्ल्याची हल्लीं पडापड झालेली आहे.

६ गंभीरगड.—हा किल्ला डहाणूच्या पूर्वेस २२ मैलां-

वर व्याहाळी नांवाच्या खेड्यांत मोडतो. ज्या टेंकडीवर हा किल्ला बांधलेला आहे, तिची उंची २२७० फूट असून तिचा माथा फार अरुंद आहे. परंतु तिचा पायथा मात्र बरेच मैल पसरलेला आहे. ज्या ज्या ठिकाणीं टेंकडीची चढण सोपी होती त्या त्या ठिकाणीं तटबंदी केलेली आहे. परंतु हल्लीं तिची पडापड झालेली आहे. इ. स. १८१८ मध्यें टेंकडीच्या एका बाजूस फक्त १२० फूट लांबीचें एक भिंताड अवशेष होतें, व मध्यें एक बांबूचा दरवाजा होता; या दरवाज्याला लागून किल्ल्यांतील शिबंदीच्या झोंपड्या होत्या. टेंकडीच्या माथ्यावर एक टांकें आहे, व तेथून किल्ल्यांतील लोकांस पाण्याचा पुरवठा होत असे. हल्लीं या किल्ल्याची पडापड झालेली आहे.

७ **इंद्रगड.**—हा किल्ला उंबरगांवच्या उत्तरेस १९ मैलांवर समुद्रकिनाऱ्यापासून दोन मैलांवर काळू नांवाच्या नदीच्या दक्षिण तीरावर एका दोनतीनशें फूट उंचीच्या वृक्षाच्छादित टेंकडीवर बांधलेला आहे. ह्या किल्ल्याच्या पूर्व व पश्चिम या बाजू नीट सरळ आहेत. किल्ल्यापासून ४०० यार्डांवर एक टेंकडी आहे तिच्यावरून या किल्ल्यावर मारा लागू पडतो. हा किल्ला फार लहान म्हणजे १८० फूट लांब व १२० फूट रुंद आहे. इ. स. १८१८त या किल्ल्याचे तटाला वाटोळे बुरूज असून त्यांची उंची २० फूट व जाडी सुमारें १० फूट होती. किल्ल्याचा तट दुरुस्त होता, परंतु तटावरील भिंत नादुरुस्त होती. तिची जाडी सुमारें १० फूट होती. आंत जाण्यास दोन दरवाजे होते, व त्यांच्या रक्षणाकरितां त्यांना लागूनच बांधलेल्या भिंती फारच मजबूत होत्या. किल्ल्यांत दोन

मध्यम रीतीच्या इमारती होत्या, व दोन पाण्याचे हौद होते. तसेंच आंत १९ तळघरें होतीं. इ० स० १८६२ त किल्ल्याची बहुतेक पडापड झालेली होती. हा किल्ला इ. स. १७८० त जनरल गोदर्द साहेबाच्या लष्करापैकीं लेफटेनेंट वेल्श ह्यानें काबीज केला. किल्ल्यांतील तळघरें प्राचीन काळचीं आहेत असें म्हणतात, परंतु त्यांतून शिलालेख वगैरे कांहीं नाहीं. ह्या किल्ल्याचे संबंधानें महत्त्वाची अशी ऐतिहासिक गोष्ट घडून आल्याचें दिसत नाहीं.

८ सेगवाह किल्ला.—हा किल्ला डहाणूच्या पूर्वेस १६ मैलांवर एका टेंकडीवर बांधलेला होता. आतां त्याचा मागमूसही राहिलेला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. इ. स. १८१८ त या किल्ल्याच्या दक्षिण टोंकाची तटबंदी कायती शिलक होती. बाकीच्या तटाची थोडथोडी पडापड झालेली होती. या किल्ल्याचे खालचा व वरचा असे दोन भाग होते. इ. स. १८१७ त खालचे किल्ल्याचा दरवाजा जाळून टाकण्यांत आला. त्या वेळीं आंत सुमारें १० पाण्याचीं टांकीं होतीं.

माहीम तालुका.

९ अशिरीचा किल्ला.—हा किल्ला माहीमच्या ईशान्येस २२ मैलांवर अशिरी नांवाच्या डोंगरावर बांधलेला आहे. हा किल्ला भोज नांवाच्या राजानें बांधला व तो १४ शतकाच्या प्रारंभीं माहीमचा राजा बिंब यानें कोळी किंवा नाईक लोकांपासून घेतला.

इ० स० १५५६ त हा किल्ला पोर्तुगीज लोकांनीं घे-

तला, व तो ३८ गांवांचें सुभ्याचें ठिकाण केलें. उत्तरठाणें प्रांतांत पोर्तुगीज लोकांचीं जीं ठाणीं होतीं, त्या सर्वांचें अशिरगड हें नाकें होतें. त्यानें पोर्तुगीज लोकांच्या मुलुखाच्या ईशान्येस चंधार लोक, पूर्वेस कोळी लोक व आग्नेयीस अहमदनगर सरकार यांचीं तोंडें जणुकाय दाबून धरिलीं होतीं. पूर्वीं ह्या डोंगराच्या पायथ्याशीं वरणीपूर म्हणून एक कोळी लोकांची वसहत होती. पुढें तें ठिकाण पोर्तुगीज लोकाचे हातीं आल्यावर त्यांनीं तेथें मेढेकोट बांधून वर तीन तोफा ठेविल्या. किल्ल्याची चढण इतकी बिकट होती कीं, वर जावयाचें म्हणजे एक अनवाणी, किंवा दोऱ्या धरून वर जावें लागत असे. मार्गांत किल्ल्याजवळ जाऊन पोहोंचेपर्यंत एकंदर १२ खिंडी लागत असत. किल्ल्यावर जाण्याचे मार्गाचे तोंडाशीं जी खिंड होती, तिला सलद खिंड असें म्हणत, व तेथें मेढेकोट बांधलेला असून कोळी लोकांचा पहारा होता. येथून पुढें गेलें म्हणजे एक अरुंद व तुटलेली अशी बारींतून पाउलवाट होती. ही वाट इतकी भयंकर होती कीं, एक पाऊल घसरलें तर चढणारा खालीं भयंकर कड्यांत पडून त्याचे तुकडे तुकडेच व्हावयाचे. ह्या बारीच्या माथ्याशीं एक गुहा लागत असे, तींतून वर गेलें म्हणजे किल्ल्याचा पहिला दरवाजा लागे. ह्या दरवाज्याला लागूनच एक ७० पायऱ्यांचा दगडी जिना होता व तो चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याचा दुसरा दरवाजा होता. हा दरवाजा अतिशय मजबूत असून तेथें पोर्तुगीज लोकांचीं चार कुटुंबें त्याच्या संरक्षणाकरितां ठेवलेलीं होतीं. ह्या दरवाज्याच्या आंत दुसरा एक तटबंदी केलेला दरवाजा होता व त्यावर

दोन तोफा ठेवलेल्या होत्या. किल्ल्याच्या माथ्यावर गुरें, मेंढरें, बकरीं, डुकरें यांना चरावयास मुबलक जागा होती. तेथून सभोंवतालच्या सर्व प्रांताचा समुद्रापर्यंतचा देखावा दिसत असे. माथ्याला तटबंदी वगैरे केलेली नव्हती, परंतु डोंगराच्या कडेवर कदाचित् कोणी शत्रु वर येण्याचा प्रयत्न करूं लागला तर त्याचा नाश करण्याकरितां मोठमोठ्या दगडांच्या राशी घालून ठेवलेल्या होत्या. वर २० पाण्याचीं टांकीं, व दोन पाण्याचे खजिने होते. आंत बायका पोरें धरून एकंदर सातशें मनुष्यें होतीं, व हीच किल्ल्याची शिबंदी होय.

पोर्तुगीज लोक या किल्ल्याला विशेष महत्त्व देत असत. प्रत्येक दरवाज्यावर पोर्तुगीज पहारेकरी ठेविलेले होते, व किल्लेदाराचे परवानगीशिवाय कोणास आंत येण्याची अगर बाहेर जाण्याची सक्त मनाई होती. अस्तमानीं सर्व दरवाज्यांस कुलुपें पडत, व पहारेकरी सर्व किल्ल्या किल्लेदाराजवळ आणून देत, व सूर्योदयीं तो त्या त्यांच्याकडे परत पाठवी. किल्ल्यांतील शिबंदी नेहमीं सावध असे. रात्रीस ९० धनुर्धारी पोर्तुगीज लोकांचा पहारा असे, व ते उजेडाकरितां मोठमोठ्या चुडी पेटवीत असत. इ. स. १६१३ त पोर्तुगीज लोकांनीं आपल्या पुष्कळ किल्ल्यांवरची शिबंदी कमी केली, परंतु अशिरगडावरील शिबंदी कमी केली नाहीं. इ. स. १६९० च्या सुमारास हा किल्ला मोंगलांनीं घेतला. परंतु इ. स. १६८३ त पोर्तुगीज लोकांनीं तेथें मोंगलांचा एक हबशी सरदार होता त्याला ६५०० रुपये लांच देऊन तो परत घेतला. इ. स. १७३७ च्या सुमारास चिमणाजी आप्पानें माहीम

काबीज केलें, व अशिरगडच्या सर्व वाटा बंद केल्या, त्यामुळें पोर्तुगीज लोक जेरीस येऊन त्यांनीं लवकरच तो किल्ला मराठ्यांस दिला. इ. स. १७३८ त तो पोर्तुगीज लोकांनीं पुनः घेतला. परंतु लवकरच मराठ्यांनीं तो फिरून जिंकून घेतला. तेव्हांपासून १८१७ पर्यंत तो मराठ्यांचे ताब्यांत होता. त्यापुढें त्याचें स्वामित्व इंग्लिशांकडे आलें, व तो आयासावांचून त्यांचे हातीं आला.

इ. स. १८१८ त क्यापटन डिकिनसन यानें या किल्ल्याचें असें वर्णन केलें आहे कीं, " हा किल्ला दाट जंगलाच्या प्रदेशांत एका १००० फूट उंचीच्या टेंकडीवर बांधलेला आहे. प्रथमतः किल्ल्याची चढण सोपी आहे असें वाटतें; परंतु जसजसें पुढें जावें तसतशी ती फारच बिकट आहे असें अनुभवास येतें. प्रथमतः पथ्थर फोडून तयार केलेला एक ४० फूट उंचीचा अवघड जिना लागतो. ह्या जिन्याच्या वर एक लोखंडी दरवाजा बसविलेला आहे. या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे पुनः पहिल्याप्रमाणेंच अतिशय बिकट अशी दुसरी चढण लागते, व तिच्यापुढें दुसरा दरवाजा लागतो. दुसरीकडून कोणास वर चढतां येऊं नये म्हणून टेंकडीच्या दोन बाजू सारख्या बांधून काढलेल्या आहेत. आंत सुमारें १०० फूट उंचीवर एक तटबंदी केलेलें वाटोळें आवार आहे, परंतु त्याची पडापड झालेली आहे. टेंकडीच्या माथ्यावर एक पडापड झालेला अष्टकोनी बुरूज आहे. जरी यादरील तटबंदीची पडापड झालेली आहे, तरी हा किल्ला स्वतःसिद्धच इतका बळकट आहे कीं, आंत अगदीं थोडे लोक असले तरी तेकेवढ्याही मोठ्या सैन्यास सहसा दाद देणार नाहींत.

माथ्यावर एक अर्धा मैल लांबीरुंदीचें मैदान आहे, व तीन उत्कृष्ट पाण्याचीं तळीं आहेत. तसेंच किल्ल्यांतील पूर्वींच्या शिबंदीच्या राहण्याच्या कांहीं झोपड्या आहेत. आंतील जमीन पुष्कळ ठिकाणीं फार उत्तम आहे." इ० स० १८६२ त या किल्ल्याची सर्वत्र पडापड झालेली होती. इ० स० १८८१ त याचें असें वर्णन केलेलें आहे कीं, "किल्ल्याचा आंतील दरवाजा पडून गेला आहे. किल्ल्याच्या पूर्वेस सुमारें १५० पावलांवर एका षट्कोनी बुरुजाच्या खाणाखुणा दृष्टीस पडतात. तेथें जवळच एक मोठा दगड असून त्यावर क्रुसाचें चिन्ह, व पोर्तुगीज लिपीनें लिहिलेला एक लेख आहे. किल्ल्याच्या तटाच्या आंत २ व बाहेर ८ मिळून दहा हौद आहेत. बाहेरच्या आठांपैकीं दोन हौद कोरडे आहेत, बाकीच्यांतून पांच फुटांपर्यंत पाणी आहे. आंतल्या दोन हौदांपैकीं एकाला पायऱ्या असून आंत ९ फूट पाणी आहे, व दुसऱ्याला पायऱ्या नसून आंत २॥ फूट पाणी आहे. शिवाय दोन टांकीं आहेत. किल्ल्याजवळ १९ मनुष्यें राहतील असें एक तळघर असून त्याला उजेड येण्याकरितां झरोके ठेविलेले आहेत."

१० **असावचा किल्ला.**—हा किल्ला माहीम तालुक्यांत पालघर रेलवे स्टेशनाच्या ईशान्येस पांच मैलांवर एका ८०० फूट उंचीच्या टेंकडीवर बांधलेला आहे. ही टेकडी सर्व बाजूंनीं एकसारखी सरळ होत गेलेली आहे, व त्यांत तिची उत्तरेकडची बाजू तर फारच अवघड आहे. किल्ल्याच्या खालचा कांहीं भाग शिवाय करून बाकी सर्व ठिकाणीं य टेंकडीवर दाट जंगल आहे. दक्षिणेस माहीम तालुक्यांतील डोंगरांची रांग, व उत्तरेस डहाणू ता-

लुक्यांतील डोंगर यांच्या नाक्यावर हा किल्ला बांधलेला आहे. पूर्वी अशिरी, माहीम, तारापूर, चिंचणी, डहाणू, शिरगांव इतक्या ठिकाणी याचा संबंध होता, त्यामुळें त्याला बरेंच महत्त्व आलें होतें. किल्ल्याचे पायथ्याशीं महागांव म्हणून एक भरवस्तीचा गांव आहे. या किल्ल्याचे संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

११ **शिरगांवचा किल्ला** (भुईकोट).—हा किल्ला माहीमच्या उत्तरेस तीन मैलांवर शिरगांव नांवाचे खेड्यांत समुद्रकिनाऱ्यावर आहे. ह्या किल्ल्याचा आकार लांबोळा होता. त्याची लांबी २०० फूट व रुंदी १५० फूट होती. त्याच्या तटाची उंची ३० फूट व जाडी १० फूट होती. पूर्वी किल्ल्यांतील निमे जागा फक्त शिबंदीच्या राहण्याच्या खोल्या, व धान्याचीं कोठारें यांनींच अडून गेलेली होती. अद्यापि ह्या घरांच्या भिंती जीव धरून आहेत. किल्ल्यांत एक गोड्या पाण्याची विहीर आहे. पूर्वी किल्ला व गांव यांच्यामध्यें बरेंच अंतर होतें. इ. स. १८१८ त हा किल्ला इंग्रजांचे हातीं आला, तेव्हांपासून शिरगांवचें खेडें व इतर झाडें उत्तर व पूर्व या बाजूंकडून वाढत वाढत किल्ल्याला येऊन भिडल्यामुळें किल्ल्याच्या दरवाज्याशीं येऊन पोहोंचेपर्यंत येथें किल्ला आहे असें समजून येत नाहीं. इ स. १८६२ त किल्ल्याचें फक्त पश्चिमेकडचें भिंताड अवशेष होतें. भरतीचे वेळीं पश्चिमेचे बाजूस समुद्राचें पाणी किल्ल्यांत शिरतें. पूर्वी किल्ल्याला लागून शिरगांवचें शाळागृह होतें. हल्लीं रहदारी बंगल्याकडे त्या शाळागृहाचा उपयोग केलेला आहे. इ. स. १७३९ त चिमणाजी आप्पानें कतलवाड, डहाणू, केळवें,

तारापूर वगैरे ठिकाणें घेतलीं त्याच वेळीं शिरगांवचा किल्लाही सर केला. तो इ. स. १८१८ पर्यंत मराठ्यांकडे होता. पुढें त्याचें स्वामित्व इंग्लिशांकडे गेलें.

१२ काळदुर्ग.--हा किल्ला माहीमच्या ईशान्येस ८ मैलांवर वरकुतें व नवली या खेड्यांत मोडतो. तो एका १५४७ फूट उंचीच्या टेकडीवर बांधलेला आहे. त्याची हल्लीं पडापड झालेली आहे. इ. स. १८६२ त या किल्ल्याची पाहणी झाली, त्या वेळीं त्याची बहुतेक तटबंदी पडून गेलेली होती. परंतु दरवडेखोर वगैरे लोकांस तेथें राहण्यास आश्रय मिळूं नये म्हणून आंतील पाण्याचीं सर्व टांकीं त्या वेळीं सरकारानें फोडून टाकिलीं. या किल्ल्याचे संबंधानें विशेष महत्त्वाची गोष्ट उपलब्ध नाहीं.

१३ टकमकचा किल्ला.— हा किल्ला माहीमच्या आग्नेयीस पंधरा मैलांवर, तानसा व वैतारणा या नद्यांच्या उगमाच्या कांहींसा ईशान्येस जंगली प्रदेशांत एका २०००फूट उंचीच्या बिकट डोंगरावर बांधलेला आहे. किल्ल्याचा माथा ४०० यार्ड लांब व १०० यार्ड रुंद आहे. ह्या डोंगराची चढण दोन ठिकाणीं साधारण सोपी आहे, व ह्याच ठिकाणीं फक्त तटबंदी केलेली आहे. हा किल्ला स्वतःसिद्धच बळकट होता, तरी त्याची बरोबर डागडुजी व व्यवस्था नसल्यामुळें इ० स० १८१८ त तो इंग्लिशांस सर करण्यास मुळींच आयास पडला नाहीं. किल्ल्याच्या पायथ्याशीं इतकें दाट अरण्य आहे कीं, शत्रूचें सैन्य पायथ्याला येऊन भिडलें तरी आंतील लोकांस त्याची मुळींच दाद लागणार नाहीं. किल्ल्यांत ९ टांकीं होतीं व त्यांचें पाणी फार चांगलें होतें. तसेंच आंत पहारेकरी लो-

कांच्या कांहीं झोपड्या होत्या. इ. स. १८६२ त किल्ल्याची तटबंदी पडून गेलेली होती. चोरटे लोकांस थारा मिळूं नये म्हणून इंग्लिश सरकारानें आंतील पाण्याचीं टांकीं फोडून टाकिलीं.

१४ तांदुळवाडीचा किल्ला.—हा किल्ला माहीमच्या आग्नेयीस १० मैलांवर एका १९०० फूट उंचीच्या टेकडीवर बांधलेला आहे. किल्ल्यांत खडकांत खोदलेलीं पुष्कळ पाण्याचीं टांकीं आहेत; तसेंच पूर्वीं तेथें मोठी मजबूत तटबंदी असावी असें अनुमान होतें. पूर्वेच्या बाजूस किल्ल्याचे पायथ्याशीं वैतरणा नदी वाहत जाते, व तिच्या कांठीं किल्ल्याला लागून लालठाण नांवाचें एक खेडें आहे. एथें पाण्याचा एक तलाव आहे, व तो पोर्तुगीज लोकांनीं बांधला असें सांगतात. या किल्ल्याचे संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

१५ अलीबागचा किल्ला (भुईकोट).—हा लहानसा किल्ला माहीमच्या दक्षिणेस ३ मैलांवर केळव्यांच्या खाडीच्या उत्तर तीरावर बांधलेला आहे. त्याच्या तटाची उंची वीस फूट असून त्याचें क्षेत्रफळ अवघें ९६ फूट आहे. आंत एक जुनी तोफ पडलेली आहे. हा किल्ला पोर्तुगीज लोकांनीं बांधला असें सांगतात.

१६ भवनगड.—हा किल्ला केळवेंमाहीमच्या दक्षिणेस ४ मैलांवर आहे. याची लांबी १८८ फूट व रुंदी ७० फूट आहे. हल्लीं त्याची सर्वत्र पडापड झालेली आहे. याच्या सभोंवार व आंत आंबे, फणस, व केळी या झाडांची गर्दी होऊन गेलेली आहे. आंत एक तळघर आहे, त्यांत

पूर्वीं धान्य ठेवीत असत. आंत एक पाण्याचें टांकें असून त्यांत सुमारें दीड पुरुष पाणी आहे.

१७ **तारापुरचा किल्ला.**—(भुईकोट)–तारापूर हा गांव तारापुरच्या खाडीच्या दक्षिण तीरावर माहीमच्या उत्तरेस १९ मैलांवर आहे. येथें इ० स० १५९३ त पोर्तुगीज लोकांनीं भुइकोट किल्ला बांधिला. इ० स० १८१८ त या किल्ल्याचे संबंधानें क्यापटन डिकिनसन यानें असें वर्णन केलें आहे कीं, " उत्तर–कोकणांत समुद्र-कांठीं जे किल्ले बांधलेले आहेत, त्यांत तारापुरचा किल्ला अतिशय मोठा असून तो फार चांगल्या स्थितींत आहे. किल्ल्याच्या तटाचे दगड घडींव असून त्याचें क्षेत्रफळ सुमारें ५०० फूट आहे. तटावरील पडदी शिवाय करून त्याची उंची ३० फूट, व जाडी १० फूट आहे, व पडदीची रुंदी ४ फूट आहे. उधानाचें[१] पाणी आलें म्हणजे तें किल्ल्याच्या उत्तरेकडील तटाला येऊन थडकतें. कांहीं कांहीं ठिकाणीं थोडथोडी पडापड झालेली आहे. पडदीच्या भिंतीचाही कांहीं भाग पडलेला आहे. किल्ल्याच्या आग्नेयीकडील कोपऱ्यास बुरूज किंवा गोपुर वगैरे कांहीं नाहीं. त्याच्या तीन बाजूंस साधारण खोल व रुंद असा खंदक आहे. परंतु तो कोरडा आहे. किल्ल्यांत जाण्याचा दुसरा दरवाजा पूर्वेकडील तटाच्या मध्यंतरीं आहे. आंत पडापड झालेलीं पुष्कळ ठिकाणें व इमारती आहेत. याशिवाय पहारेकरी व शिबंदी लोकांचीं राहण्याचीं घरें आहेत; तसेंच आंत पुष्कळ विहिरी असून त्यांचें पाणी

---

१ पौर्णिमा व अमावास्या या दिवसांचे सुमारास समुद्राचे भरतीचें पाणी फार वाढतें त्यास उधानाचें पाणी असें म्हणतात.

गोड असून मुबलक आहे." तारापुरची वस्ती हल्लीं किल्लयापासून १५० फुटांच्या अंतरापर्यंत येऊन थडकली आहे. इ० स० १८६२ त त्याच्या उत्तरेकडील तटाचा कांहीं भाग कोसळून पडल्यामुळें तो मोडकळीस आला होता.

तारापूर हा गांव फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. इ.स. १२८० त माहीमचा राजा भीम यानें नाईक लोकांपासून हा गांव घेतला. इ. स. १५३३ त पोर्तुगीज लोकांनीं हा गांव जाळून टाकिला. इ. स. १५५६ त तारापूरच्या आसपास पोर्तुगीज लोकांस बराच मुलूख प्राप्त झा.ल्यामुळें सर्व दमण प्रांतांत तारापुरासारखें दुसरें भरभराटीचें ठिकाणच नव्हतें. इ० स० १५५९ त कांहीं हबशी लोकांनीं तारापुरावर हल्ला केला, परंतु पोर्तुगीज लोकांनीं त्यांना पिटाळून लाविलें. इ. स. १५८२ त मोंगलांनीं तारापूर घेण्याचा प्रयत्न केला, परंतु तो फुकट गेला. इ. स. १५९३ त पोर्तुगीज लोकांनीं तारापुरचा किल्ला बांधला. इ० स० १६१२ त मोंगलांनीं तारापुरावर पुनः स्वारी केली, परंतु त्यांना विन्मुख परत यावें लागलें. इ. स. १६३४ त तारापूर येथें एक न्यायाधीश असून त्याचा अमल दमण प्रांताच्या निमे भागावर चालत असे. तसेंच त्या गांवाचा सुरत व दीव या बंदरांशीं मोठा व्यापार चालत असे. तारापुरच्या किल्लयाचा तट मोठा भक्कम असून त्याला सभोंवार वाटोळे बुरूज होते. किल्लयांत शिपाई लोकांस राहण्याच्या कोठड्या असून शिवाय एक चर्च, एक ख्रिस्ती लोकांचा मठ, व एक दवाखाना होता. किल्लयाच्या शिबंदीमध्यें एक कपतान, एक नाईक, दहा शिपाई, एक पोलीस इन्स्पेक्टर, त्याचे हाताखालीं चार शिपाई, एक

दुभाषी, एक लेखक, एक मशालजी, व एक छत्रधारी इतके लोक होते. याशिवाय एक पाद्री, ९० पोर्तुगीज लोक, २०० घाटे लोक, व १०० गुलाम इतकी मंडळी असून ते सर्व युद्धकलानिपुण असून प्रत्येकाजवळ तरवार, भाला व बंदुक इतकीं हत्यारें असत. इ० स० १७२८ त तारापूरच्या किल्ल्यावर फक्त ६० शिपाई होते असा दाखला सांपडतो. इ० स० १७३९ त चिमणाजी आपानें या किल्ल्यावर हल्ला केला. किल्ल्याच्या तटाखालीं ४ सुरुंग खोदले होते. पैकीं दोन सुरुंग चांगले लागू पडले व तटाला खिंडार पडलें. बाजी भिवराव, रामचंद्र हरी, यशवंतराव पवार हे मराठे सरदार आपापले लोक बरोबर घेऊन किल्ल्याकडे धांवले. परंतु पोर्तुगीज लोकांनीं प्रथमतः त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं, व कांहीं वेळपर्यंत जय कोणास मिळणार तें कांहीच कळेना. नंतर राणोजी शिंदे खंदकांत उतरला व ज्या ठिकाणीं तटाला खिंडार पडलें नव्हतें अशा ठिकाणीं तो आपल्या लोकांसह गेला. त्याचे लोक नागव्या तरवारी हातांत घेऊन तटाला शिड्या लावून वर चढले. परंतु ह्या ठिकाणींही पोर्तुगीज लोक मोठया निकरानें लढले, व सर्वांचे देह धारातीर्थीं ठेवीपर्यंत त्यांनीं मराठ्यांच्या किल्ल्यांत शिरकाव होऊं दिला नाहीं. कांहीं थोडे पोर्तुगीज लोक मराठ्यांचे हातीं सांपडले, त्यांत किल्लेदार डॉन फ्रान्सिस डी आलारकेओ हा एक होता.

हा किल्ला मराठ्यांचे हातीं आल्यावर त्यांनीं समुद्राकडच्या तटाची भक्कम रीतीनें दुरुस्ती केली. इ०स १७६० त ह्या किल्ल्याची स्थिति फार उत्तम होती, व वर एकंदर ४ तोफा होत्या, असा दाखला सांपडतो. इ०स० १७७६

त रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब पुण्याहून पळाला तो या किल्ल्यांत जाऊन राहिला. इ० स० १८०३ मध्यें हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला. हा किल्ला पेशव्यांचे ताब्यांत होता, तेव्हां त्यांनीं तो विकाजी मेहेरजी नांवाच्या मनुष्यास १०० वर्षांच्या मुदतीनें इनाम म्हणून दिला होता, व तो अद्यापि त्याचे वंशजांकडे चालत आहे.

तारापुरच्या उत्तरेस एक मैलावर खाडीच्या किनाऱ्यावर एक विटांचा बुरूज बांधलेला आहे. हल्लीं त्याची पडापड झालेली आहे. इ० स० १८१८ त कॅपटन डिकिनसन यानें त्या संबंधानें असें वर्णन केलें आहे कीं, त्याची उंची २२ फूट असून त्याचा व्यास २८ फूट आहे. तोफा उडविण्याकरितां एक जागा (धमधमा) केली होती ती जमिनीपासून नऊ फूट उंचीवर होती. तेथें पांच तोफा ठेविलेल्या होत्या. त्याच्यावर तशीच दुसरी एक जागा होती व तेथेंही पांच तोफा ठेविलेल्या होत्या. तटाच्या वरच्या भिंतीची जाडी ३॥ फूट होती व त्याच्यावर छावणी होती.

१८ दातिवरें किल्ला.-हा किल्ला माहीमच्या दक्षिणेस १० मैलांवर आहे. हल्लीं याची पडापड झालेली आहे. हा बहुधा पोर्तुगीज लोकांनीं चांचे लोकांपासून आपल्या मुलखास उपद्रव होऊं नये म्हणून बांधला असावा. दातिवरें येथें सुमारें शंभर प्रवाशांस उतरण्यास जागा मिळेल एवढी धर्मशाळा मुंबईच्या अरदेशीर दादी नांवाच्या पारशी गृहस्थानें बांधलेली आहे. ह्या किल्ल्याचे संबंधानें कांहींच माहिती मिळत नाहीं.

१९ मानोरचा किल्ला.—मानोर हा गांव वैतरणा नदीच्या कांठीं आशिरगडाच्या दक्षिणेस ६ मैलांवर, व

पालघर रेलवे स्टेशनाच्या पूर्वेस १० मैलांवर आहे. वैतरणा नदीस समुद्राची भरती आली म्हणजे मानोरपर्यंत पाणी भरतें, व २० पासून ४० खंडी वजनाचें गलबत तेथपर्यंत येऊं शकतें. पोर्तुगीज लोकांचे अमलांत मानोर हें एका परगण्याचें मुख्य ठिकाण होतें. ठाणें प्रांताच्या उत्तर भागांत पोर्तुगीज लोकांचे जे किल्ले होते, त्यांत हा किल्ला व अशिरीचा किल्ला हे दोन मुख्य होते, असें वर्णन आढळतें. परंतु त्यांत दिलेल्या हकीकतीवरून मानोरपासून जवळच असावचा किल्ला आहे, त्यालाच पूर्वीं कदाचित् मानोरचा किल्ला म्हणत असतील असें वाटतें. तथापि खुद्द मानोर येथें एका लहानशा उंचवट्याच्या प्रदेशावर एक फार जुनी इमारत असून तिचा आकार एखाद्या किल्ल्याच प्रमाणें आहे. तेथें पाण्याचें एक टांकें आहे. इ० स० १६३४त या इमारतीचें असें वर्णन केलेलें आहे कीं, "ही इमारत दुमजली आहे. वरच्या मजल्याच्या छपराला खालून खांबांचा आधार दिलेला आहे. खालच्या मजल्याला दोन रस्ते असून त्यालाही खांबांचाच आधार दिलेला आहे. येथें शिसें, व बंदुकीच्या बारांची दारू यांचा सांठा असे. तसेंच पांच तोफा, सत्तर बंदुका, तोफांचे गोळे व ३० मशाली इतकी सामग्री असे. या तटबंदी केलेल्या इमारतीला लागूनच एक सुमारें पाऊण मैल घेराचा मेढकोट बांधलेला होता. या मेढकोटाच्या मध्यंतरीं एक बुरूज होता; व आंत २० पोर्तुगीज कुटुंबें, ७३ बाटे लोक, व ८० हिंदु व मुसलमान तिरंदाज लोक इतकी मंडळी असे." अहमदनगरच्या राजांपासून किंवा कोळी वगैरे लुटारू लोकांपासून त्या प्रांताला उपद्रव पोहोंचूं नये म्हणून पोर्तुगीज लोकांनीं उत्तर–कोंकणांत ठि-

कठिकाणीं असा बंदोबस्त करून ठेविलेला होता. इ० स० १७२७त या किल्ल्याचें असें वर्णन केलें आहे कीं, "वर सांगितलेली इमारत एका खडकावर बांधलेली असून तिची तटबंदीही फारशी उंच नाहीं. सारांश त्या जागेला " किल्ला" असें म्हणतां येणार नाहीं. आंत ८ तोफा व १०४ पहारेकरी लोक आहेत. आठ तोफांपैकीं पांच तोफा निरुपयोगी आहेत."

२० केळवेंमाहीम येथील किल्ले.--केळवें व माहीम हे दोन निरनिराळे गांव आहेत. माहीम हा गांव माहीम तालुक्याचें मुख्य ठाणें असून तो पालघर रेल्वे स्टेशनाच्या पश्चिमेस सुमारें पांच मैलांवर आहे. केळवें व माहीम यांच्यामध्यें खाडी असून केळवें माहीमच्या दक्षिण दिशेस सुमारें एक कोसावर आहे. वर सांगितलेल्या दोन्ही ठिकाणीं दोन निरनिराळे किल्ले आहेत. केळवेंमाहीमच्या संबंधानें असा इतिहास आढळून येतो कीं, तेराव्या शतकाच्या अखेरीस मुंबईमाहीम येथील सरदार भीमराव यानें तो गांव मूळ नाईक लोकांच्या एका मुख्याच्या ताब्यांत होता त्याच्यापासून घेतला. इ० स० १३५० च्या सुमारास तो मुसलमानांच्या ताब्यांत गेला. इ० स० १४०० च्या सुमारास गुजराथच्या राजांकडे त्याचें स्वामित्व गेलें. इ० स० १५३२ च्या सुमारास पोर्तुगीज लोक त्याचे धनी झाले. इ० स० १६१२ त मोंगल लोकांनीं त्या गांवावर हल्ला केला. परंतु पोर्तुगीज लोकांनीं त्यांना दाद दिली नाहीं. " हा गांव डहाणू गांवाएवढा असून तेथें पुष्कळ फळबागा आहेत, व तेथचा किल्लाही डहाणू किल्ल्याप्रमाणेंच आहे," असें इ० स० १६३४ त या गांवाचें वर्णन केलेलें

आहे. त्या वेळीं या किल्ल्यावर दारूगोळा व तोफा वगैरेचा फार बंदोबस्त होता, व तेथें एक पोर्तुगीज सरदार १० पोर्तुगीज शिपाई, एक नाईक, १ पोलीस इन्स्पेक्टर, ४ पोलीसचे शिपाई, १० काळे शिपाई, व १ मशालजी इतके लोक होते. किल्ल्याला लागूनच गांव वसलेला होता, व तेथें ५० पोर्तुगीज कुटुंबें, १५० बाटे लोकांचीं कुटुंबें, व २०० हत्यारबंद गुलाम होते. गेमेली क्यारेरा यानें माहीम गांव व किल्ला यांचा आपले लेखांत उल्लेख केलेला आहे. " हा किल्ला बळकट नसून त्याचा तट सखल आहे व तो दगड व चिखल यांनीं बांधलेला आहे. त्याची लांबी ५९० फूट व रुंदी २२० फूट आहे, " असें इ० स० १७२८ त त्याचें वर्णन केलेलें आहे. त्या वेळीं वर ६० शिपाई लोक व पंधरा तोफा होत्या. किल्ल्यापासून कांहीं अंतरावर एक मेढेकोट बांधलेला होता, व त्याच्या रक्षणार्थ एक कपतान व ३० शिपाई लोक ठेवलेले होते. इ० स० १७३९ त चिमणाजी आपानें मोठ्या शिकस्तीनें हा किल्ला सर केला. " माहीमचा किल्ला त्रिकोणी आहे. त्याच्या तोंडाशीं पंचकोनी दोन बुरूज असून तोफा व बंदुका मारतां याव्या म्हणून त्यांना भोंकें ठेविलेलीं आहेत, " असें इ० स० १७६० त त्याचें वर्णन केलेलें आहे.

माहीमचा किल्ला पूर्वीं मोठा होता. परंतु खाडीच्या पाण्यामुळें हल्लीं त्याचा बराच भाग वाहून गेलेला आहे.

इ० स० १८१८ त माहीमच्या किल्ल्याची इंग्लिशांनीं पाहणी केली, त्या वेळीं तो फार चांगल्या स्थितींत होता. त्या वेळीं त्याचें असें वर्णन केलेलें आहे कीं, " हा किल्ला अतिशय बळकट असून त्याचें क्षेत्रफळ ८०

फूट आहे. वरील भिंत धरून तटाची अतिशय उंची म्हटली म्हणजे सुमारें २८ फूट आहे. किल्ल्याचा मुख्य दरवाजा पूर्वेच्या किंवा जमिनीच्या बाजूस आहे. किल्ल्याच्या पश्चिम बाजूस खाडीचें पाणी येऊन लागतें. बाकीच्या तीन बाजूंस बाहेरून दुसरी एक भिंत बांधलेली असून आंत शिबंदीचीं राहण्याचीं घरें आहेत गांव अगदीं किल्ल्याला लागून आहे, व तेथें इतकी झाडी आहे कीं, किल्ल्याच्या तटापर्यंत शत्रूला बिनबोभाट जातां येईल. " इ० स० १८६२ त हा किल्ला फार चांगल्या स्थितींत होता. म्हणजे दमणच्या दक्षिणेस अरनाळा किल्ला शिवाय करून याच्या इतका बळकट किल्ला दुसरा नव्हता. हल्लीं या किल्ल्यांत कलेक्टर साहेबाचा बंगला आहे.

केळवें येथील किल्ला माहीमच्या किल्ल्याच्या दक्षिणेस दोन मैलांवर आहे. प्रथम दंडाराजपुरी खाडीच्या उत्तर तीरावर एक मेढेकोट बांधलेला आहे, व तेथून पश्चिमेचे बाजूस ८०० फुटांवर खाडीच्या तोंडाशीं हा किल्ला बांधलेला आहे. इ० स० १८१८ त त्याची पहाणी केली त्या वेळीं किल्ल्यांत पुष्कळ मोडकळीस आलेलीं घरें होतीं. खाडीच्या तोंडाशीं दुसरा एक किल्ला आहे, त्याला पाणबुरूज असें म्हणतात.

माहीमच्या उत्तरेस दोन मैलांवर शिरगांव व अरनाळ्याला लागूनच असणारा दातिवरें गांव या दोहोंच्या मध्यें सुमारें १९ मैलांची किनाऱ्याची पट्टी आहे. तेवढ्या अंतरांत चांचे लोकांपासून त्या किनाऱ्याला फार उपद्रव होत असे. तो बंद करण्याकरतां किल्ले व बुरूज मिळून एकंदर १६ तटबंदीच्या जागा पोर्तुगीज लोकांचे वेळीं

बांधलेल्या होत्या. त्यांपैकीं बहुतेकांचा निकाल लागलेला आहे. त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:—१ माहीमचा किल्ला, २ फुटका बुरूज, ३ मधला बुरूज, ४ अलीबागचा किल्ला, ५ पाणबुरूज, ६ दंडा किल्ला, ७ किंतल, ८ टांकीचा बुरूज, ९ उसरणी, १० मथनें, ११ येदवण, १२ कोरें, १३ दातिवरें, १४ वीरठाण, १५ चटलें, व १६ खटलें. यांपैकीं शेवटच्या तीन अंतःप्रदेशांत होत्या.

२१ दातिवऱ्याचा किल्ला.—हा किल्ला माहीम तालुक्यांत माहीमच्या दक्षिणेस १० मैलांवर समुद्राकिनाऱ्यावर आहे. हा किल्ला पोर्तुगीज लोकांनीं बांधला असावा. हल्लीं त्याची सर्वत्र पडापड झालेली आहे.

वसई तालुका.

—:०*०:—

२२अरनाळा किल्ला (जंजिरा).—हा किल्ला अरनाळा नांवाच्या एका लहानशा बेटाच्या वायव्य कोपऱ्यावर पाण्यांत बांधलेला आहे. उत्तर-कोंकणांतील अतिशय मोठी नदी वैतरणा हिचें मुख या किल्ल्याचे माऱ्यांत आहे. इ० स० १८१८ त या किल्ल्याचें असें वर्णन केलेलें आहे कीं, तो लांबोळा असून त्याचें क्षेत्रफळ ७०० फूट आहे, व त्याला वाटोळे बुरूज आहेत. वरील भिंत धरून तटाची उंची साधारण ३० फूट आहे. तट भरींव असून नीट दुरुस्त होता. परंतु वरील कांहीं ठिकाणीं व विशेषतः बुरुजांजवळ पडापड झालेली होती. आंत कांहीं झाडें होतीं. उत्तर-कोंकणांत वसईच्या खालोखाल असा हाच

किल्ला आहे. त्याचें तटाचें काम वसईच्या किल्ल्यापेक्षांही ज्यास्त मजबूत आहे.

इ० स० १५३० त पोर्तुगीज लोकांचा शिरकाव उत्तर-कोंकणांत झाला. त्या वेळीं हा किल्ला गुजराथच्या मुसलमान लोकांच्या ताब्यांत होता. त्या वेळीं किल्ल्यांत पुष्कळ घुमट व सारासन तऱ्हेच्या पुष्कळ कमानी होत्या. पुढें तो पोर्तुगीज लोकांचे हातीं आल्यावर त्यांनीं त्या सर्व कमानी पाडून टाकल्या. पुढें पोर्तुगीज सरकारानें तो वसईच्या एका पोर्तुगीज गृहस्थाला देऊन टाकिला, व हल्लीं जो किल्ला दृष्टीस पडतो तो त्या गृहस्थानें बांधलेला आहे. त्यानें वर शिबंदी वगैरे ठेवून किल्ल्याचा नीट बंदोबस्त केला. इ० स० १७३७ त मराठ्यांनीं तो पोर्तुगीज लोकांपासून घेतला. किल्ल्याच्या उत्तरेकडील दरवाज्यावर एक मराठी लेख आहे, त्यावरून हा किल्ला पहिले बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दींत शके १६५९ ह्मणजे इ० स० १७३७ त पुनः बांधला असें लिहिलें आहे. इ० स० १७८१ त इंग्लिशांनीं हा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला व आगाशी येथून किल्ल्यावर तोफखाना सुरू करण्याचा विचार केला. परंतु किल्लेदारानें त्या वेळीं तो इंग्लिशांस दिला नाहीं. हा किल्ला कायमचा असा इ० स० १८१७ त इंग्लिशांचे हातीं आला. त्यानीं तेथें कांहीं दिवसपर्यंत थोडीशी शिबंदी ठेविली होती. हा किल्ला अद्यापि फार चांगल्या स्थितींत आहे. आंत गोडें पाणी पुष्कळ आहे. किल्ल्यांत त्रिंबकेश्वराचें व भवानीचें अशीं दोन देवालयें असून पहिल्याला ४९ रुपये व दुसऱ्यास ९१ रुपये अशी सरकारांतून सालीना नेमणूक आहे. तसेंच आंत शाहाअली

व हज्जीअह्ली या दोन मुसलमान साधूंचीं थडगीं आहेत. त्यांना सालीना सरकारांतून ८० रुपयांची नेमणूक आहे. त्याचप्रमाणें आंत एक अष्टकोनी चिरेबंदी तळें असून शिवाय पुष्कळ विहिरी आहेत.

२३ **वसईचा किल्ला.**—वसई हें शहर मुंबईच्या उत्तरेस ३० मैलांवर वसईच्या खाडीच्या उत्तरतीरावर आहे. हल्लीं तेथें म्युनिसिपालिटी असून, तें तालुक्याचें ठाणें आहे. वसई-रोड स्टेशनापासून वसई शहर ४॥ मैलांवर आहे. पोर्तुगीज लोकांच्या नाश पावलेल्या इमारतींचे अवशेष भाग वसईच्या नैर्ऋत्य दिशेस असून ते ताडमाडांची गर्दी झाल्यामुळें त्यांत लपून गेले आहेत, व हा भाग व वसई शहर यांचेमध्यें गोखिर्व्याची खाडी आहे. ह्या भागाला पूर्वीं वसई बेट असें म्हणत असत. वसईच्या किल्ल्याची साग्र माहिती समजण्याकरितां वसई शहराच्या प्राचीन इतिहासाची माहिती देणें अवश्य आहे.

जोंपर्यंत *सोपार हें कोंकणप्रांताचें राजधानीचें शहर होतें (इ० स० ११०० पर्यंत) व तेथें फार मोठा

---

*हा फार मोठा गांव प्राचीन काळापासून म्हणजे इसवीसनापूर्वी १५०० पासून इ०स० ११०० पर्यंत कोंकण प्रांताच्या राजधानीचें शहर होतें. महाभारतांत याचें सुपारक असें नांव दिलेलें आहे. पांडव गोकर्णाहून प्रभास तीर्थाला येत असतां ते येथें राहिले होते, असें लिहिलें आहे. हरिवंशामध्यें याचें नांव आलेलें आहे. गौतमबुद्धानें जे अनेक जन्म घेतले, त्यांपैकीं एके वेळीं तो सुपारक येथें जन्मला असा दाखला सांपडतो. इ०स. पू. ५४० वर्षांच्या सुमारास बंगाल व मगध यांचेमधील प्रदेशाचा राजा विजय हा सुपारक येथें येऊन राहिला होता. सालोमनचें इ० स. पू. १००० वर्षे ओफीर म्हणून जें शहर होतें तेंच हें सोपार शहर असावें असें बेनफी म्हणतो.

व्यापार चालत होता, तोंपर्यंत वसई शहर विशेष प्रसिद्ध असेल असें वाटत नाहीं. तें सोपारच्या दक्षिणेस ६ मैलांवर आहे. इ०स० ११०० च्यापुढें त्याचें नांव थोडथोडें पुढें येऊं लागलें. देवगिरीच्या यादव वंशाचे अमलाखालीं (इ०स० १२००-१२९०) वसई हें एका प्रांताचें मुख्य शहर असावें असा अंदाज आहे. परंतु इ०स० १५०७ पर्यंत त्या संबंधानें खातरीनें असें कांहीं सांगतां येत नाहीं. गुजराथचा राजा महंमद बेगद (इ०स० १४५९-१५१३) यानें इ० स० १५०७त वसई व मुंबई हीं शहरें घेण्याचा प्रयत्न केला होता असें म्हणतात. इ०स० १५१४त बार्बोसा यानें या शहरास बाक्से असें म्हटलें आहे, व तेथें मूर व हिंदु लोक राहत असून तें गुजराथच्या राजांच्या अमलांतील एक उत्कृष्ट बंदर होतें असें तो लिहितो. त्या वेळीं तेथें व्यापाराची फार मोठी घडामोड होत असे. तसेंच निरनिराळ्या ठिकाणांहून तेथें गलबतें येत असत, व मलबाराहून सुपारी, नारळ, व दुसरे मसाल्याचे पदार्थ तेथें फार येत असत. इ० स० १५२६त पोर्तुगीज लोकांनीं प्रथमतः तेथें एक वखार घातली. गुजराथच्या राजास ती गोष्ट न आवडल्यामुळें त्यानें त्यांस अतिशय त्रास दिला. तेव्हां इ०स० १५२९त हेक्टर डी सिल्व्हेरिया हा पोर्तुगीज सरदार आपल्या २२ लढाऊ तारवांसह एके दिवशीं रात्रीं वसईच्या बंदरांत शिरला, व एकाएकीं शहरावर हल्ला करून त्यानें अल्लीशाहा नांवाच्या सरदाराचा पराभव केला, व तें शहर जाळून टाकिलें.

इ० स० १५३१ त पोर्तुगीज लोकांनीं पुनः त्या शहराची अशीच नासाडी केली. पोर्तुगीज लोकांच्या अशा

प्रकारच्या स्वाऱ्यांचा, बंदोबस्त करण्याकरितां गुजराथचा राजा बहादुरशाहा यानें दीवचा सुभेदार मालिक टोकन यास वसईची तटबंदी करावी म्हणून हुकूम केला. तेव्हां टोकन यानें तेथें एक लहानसा किल्ला बांधला, व समुद्र व खाडी या बाजूंस तट घातला व त्याच्या सभोंवार मोठा खंदक खणून तो खाऱ्या पाण्यानें भरून टाकिला. त्यानें वसईच्या संरक्षणाकरितां पायदळ व घोडेस्वार मिळून एकंदर १९००० लोक ठेविले. पुढें कांहीं दिवसांनीं पोर्तुगीज लोकांचा सरदार नूनो-डा कुन्हा हा बरोबर १९० लढाऊ जहाजें, २००० गोरे लोक, व २००० गोवेकरी घेऊन वसईच्या किल्ल्यावर चाल करून आला. त्या वेळीं मालिक टोकन भिऊन गेला व त्यानें त्याच्याशीं तहाचें बोलणें सुरू केलें. परंतु डा कुन्हा यानें त्या वेळीं ज्या अटी सांगितल्या त्या इतक्या कडक होत्या कीं, टोकन यास तें तहाचें बोलणें सोडून द्यावें लागलें. नंतर पोर्तुगीज लोकांनीं किल्ल्याच्या उत्तरेस थोडक्याच अंतरावर आपला तळ दिला. पुढें त्यांचे अघाडीचे सरदार डिओगो डी सिल्व्हेरिया, व मान्यूएल डी मासीडो हे कांहीं लोक बरोबर घेऊन शिड्या लावून तटावर चढले, व त्यानीं टोकन याच्या फौजेवर अशा निकरानें हल्ला केला कीं, त्याच्या फौजेस एकदम तेथून पळ काढावा लागला. त्या वेळीं पोर्तुगीज लोकांस तेथें पुष्कळ धान्यसामग्री, व दारूगोळा सांपडला. पोर्तुगीज लोकांनीं वसईच्याजवळच चौल येथें पूर्वी किल्ला बांधला होता. तेव्हां हा किल्ला राहूं दिला तर त्यापासून आपणांस पुढें त्रास होईल असें त्यांस वाटून व तेथें ठेवण्या पुरती त्यांच्याजवळ शिबंदीही नव्हती म्हणून

त्यांनीं त्या वेळीं वसईचा किल्ला जमीनदोस्त करून टाकिला, व शत्रूच्या ४०० तोफा बरोबर घेऊन ते गोव्यांस परत गेले.

गुजराथचा राजा सुलतान बहादूर किंवा बहादुरशाहा याला दक्षिण व माळवा या प्रांतांत मोठमोठे विजय प्राप्त झाल्यामुळें तो फारच चढून गेला होता. त्यामुळें दिल्लीचा बादशाहा हुमायून याची या वेळेच्या सुमारास त्याच्याशीं चुरस लागली होती. तेव्हां पोर्तुगीज लोकांस आपल्या पक्षाकडे ओढून घ्यावें असें प्रत्येकास वाटूं लागलें. बहादुरशाहा यानें पोर्तुगीज लोकांस आपणाकडे मिळविण्याकरितां इ० स० १५३३त त्यांना वसईप्रांत दिला, तांबड्या समुद्राशीं जो व्यापार चालत असे त्यावर जकात बसविण्याचा अधिकार त्यांस दिला, व त्याच्या राज्यांतील जीं गलबतें व्यापाराकरितां बाहेर जातील त्यांनीं प्रथम वसईच्या बंदरांत लागून पोर्तुगीज लोकांचा परवाना घेऊन नंतर पुढें जावें, असा बंदोबस्त करण्याचें कबूल केलें. इ० स० १५३४त हुमायून बादशाहानें पोर्तुगीज लोकांशीं तहाचें बोलणें लाविलें. परंतु त्यांनीं बहादुरशाहाचा पक्ष सोडिला नाहीं. तेव्हां बहादुरशाहा मोठा खुश होऊन त्यानें त्यांस दीव येथें किल्ला बांधण्याची परवानगी दिली. नंतर पोर्तुगीज लोकांनीं पुनः वसई येथें आपली वखार घातली; परंतु वसईचा कांहींच बंदोबस्त त्यांनीं केला नाहीं. इ०स०१५३६त मोंगलांचें सैन्य वसईवर चाल करून आलें. परंतु पोर्तुगीज लोक मोठ्या तयारीनें आहेत असें त्यांस आढळून येतांच एक बारही न काढतां ते लोक परत निघून गेले. त्या वेळीं वसई येथें आंटोनिओ गालवाहो हा पोर्तुगीज सरदार होता. नंतर कांहीं दिव-

सांनीं पोर्तुगीज लोकांचा हिंदुस्तानांतील वसाहतींचा व्हाइसराय नूनो डा कुन्हा हा वसई येथें आला व त्यानें नवीन किल्ल्याचा पाया घातला, व त्या पायाचा दगड गालवाहो याच्या हातून बसविला. त्याच वेळेच्या सुमारास पोर्तुगीज लोकांनीं वसई येथील कांहीं मशिदींचा विध्वंस करून तेथें सेंट जोसफ याचा मठ स्थापन केला. इ० स० १५३९ त गुजराथच्या मुसलमानी फौजेनें वसईस वेढा दिला, परंतु पोर्तुगीज लोकांनीं त्यांस परत पिटाळून लाविलें. इ० स० १५८३ त वसई येथें भात, व इतर धान्यें,व इमारतीलायक लाकूड यांचा मोठा व्यापार चालत होता, असा दाखला सांपडतो. इ० स० १५८६त अबुल फजल् यानें असें लिहिलें आहे कीं, दमण, संजाण, माहीम व तारापूर या शहरांप्रमाणें वसई हें मोठें व्यापाराचें शहर आहे, व मोंगल लोकांच्या केवळ हयगयीमुळें व आळसामुळें तीं सर्व शहरें युरोपीयन लोकांच्या हातांत गेलीं आहेत. इ० स० १५९० च्या सुमारास वसईच्या किल्ल्याचें पुनः काम सुरू केलें व तो इ० स० १६०० च्या सुमारास पुरा झाला. किल्ल्याच्या भिंती कठिण दगडांच्या बांधलेल्या असून तटाला एकंदर अकरा बुरूज होते. त्याच्यावर मोठ्या तोफा ९० होत्या, त्यांपैकीं २७ तोफा पितळेच्या होत्या. किल्ल्याच्या रक्षणार्थ २१ जहाजांचें आरमार असून प्रत्येक जहाजावर १६ पासून १८ पर्यंत तोफा होत्या. चौल सारखा जरी वसई येथें व्यापार चालत नसे, तरी तेथें गलबतें बांधण्याचा कारखाना होता, त्यामुळें त्या शहराला विशेष महत्त्व आलेलें होतें. तसेंच तेथें सुपीक अशा *वसई प्रांताचें

* वसईच्या उत्तरेस १० मैल, पूर्वेस २४ मैल व दक्षिणेस ६०

मुख्य ठाणें असून त्या प्रांतांत ‡ पुष्कळ सधन पोर्तुगीज जमीनदार रहात होते, व तेथें पोर्तुगीज लोकांच्या उत्तर कोंकणांतील सर्व प्रांतांच्या सुभेदाराचें ठाणें होतें, त्यामुळें वसई हें त्या वेळीं एक मोठें धनाढ्य शहर झालें होतें. किल्ल्याचे आंतील जागा फक्त वरिष्ठ प्रतीच्या पोर्तुगीज लोकांकरितां ठेवलेली होती; व ते दुसऱ्या कोणासही आंत येऊं देत नसत. किल्ल्यांतील गल्ल्या सरळ रेषेंत होत्या, व त्यांचे चौक फार मोठे होते. आंतील सर्व इमारती दुमजली असून सुरेख होत्या व त्यांचीं गोपुरें आच्छादित असून, त्यांच्या खिडक्या फार मोठ्या होत्या. तसेंच आंत पुष्कळ मोठमोठीं ख्रिस्ती देवालयें होतीं. म्हणजे पोर्तुगीज लोकांच्या हिंदुस्तानांतील वसाहतींची राजधानी गोंवें शहर याच्या खालच्या प्रतीचें दुसरें शहर पाहूं गेलें, तर त्या वेळीं फक्त एक वसई शहरच होतें. शहराच्या अधिकाऱ्याला कपतान हा किताब होता व त्याच्या तैनातीस १६ हुजरे, ४ मशालजी, ३ पाणके, व १ छत्रधर इतकी मंडळी असे. या मंडळीचा कपतान धरून सालीना एकंदर खर्च

मैल एवढा मुलूख वसई प्रांतांत मोडत असे, व त्याचे वसई, कसबे ठाणें, साष्ठी बेट, करंजें बेट, वेलाफ्लोर बेट, मनोर, व असेरीम असे सात भाग केलेले होते.

‡ त्या वेळीं वसई प्रांतांत हिंदुस्तानांतील अतिशय धनसंपन्न अशा पोर्तुगीज लोकांचीं शंभरांहून जास्त कुटुंबें राहत होतीं. सोळाव्या शतकाच्या अखेरीस गोव्यांस पोर्तुगीज संतीणींकरितां एक मठ बांधला त्या वेळीं वसई प्रांतांतल्या कांहीं श्रीमंत कुटुंबांतील बायकांनीं वर्गणीदाखल म्हणून २००००० झराफिन किंवा हल्लीचे शिक्का रुपये १००००० पाठवून दिले होते. यावरून त्या प्रांताच्या सधनतेची सहज कल्पना होईल.

जवळ जवळ १५०० रुपयांपर्यंत असे. कपतानास सल्ला मसलत देण्याकरितां एक आल्डरमन किंवा धर्माधिकारी असे. कपतानाच्या हाताखालीं एक दुय्यम कपतान असे, व त्याच्या तैनातीस २ कारकून, दोन मशालजी व दोन हुजरे असत. किल्ल्यांतील व्यवस्था नीट रीतीनें राखण्याकरितां एक अमलदार नेमलेला होता, व त्याच्या हाताखालीं तोफखान्याचे १२ लोक दिलेले होते. किल्ल्याच्या बाहेरच्या शहराच्या बंदोबस्ताकरितां एक ठाणेदार किंवा फौजदार नेमलेला असून त्याच्या हाताखालीं २० शिपाई, ४ बरकनदाज लोक, एक नाईक, एक कारकून, एक भाषांतरकर्ता, एक सुतार, व एक नाखवा किंवा खलाशी लोकांचा नाईक इतकी मंडळी असे. इनसाफ करण्याकरितां एक न्यायाधीश नेमलेला होता. तसेंच एक जज्ज, अपिलांचा निकाल करणारा दुसरा एक जज्ज, एक बारिस्टर, असे आणखी अमलदार नेमलेले होते. यांशिवाय एक समुद्राकडील बेलीफ, एक सरकारकून, एक सरकारी वकील, एक बेवारशी मालाची व्यवस्था करणारा अमलदार, एक रात्रीचा पाहरा करणारा अमलदार, व एक मेस्त्री इतकी मंडळी असे.

सतराव्या शतकाच्या प्रारंभीं (इ० स० १६०७) वसई येथें गलबतें बांधण्याचा फार मोठा कारखाना चालत असे, व इमारती लायक लाकूड, व दगड यांचा फार मोठा व्यापार चालत असे. गोव्यांस मोठमोठे वाडे व इमारती वसईहून दगड नेऊन बांधीत असत. इ० स० १६१२ त मुसलमान लोकांनीं या किल्ल्यास पुनः एकवार वेढा दिला, परंतु त्या वेळीं त्यांस यशप्राप्ति झाली नाहीं.

इ० स० १६१८ त वसईवर फार मोठें अकल्पित अनर्थ गुजरलें. प्रथमतः एक आजाराची भयंकर साथ शहरांत व किल्ल्यांत आली, व तिच्या योगानें हजारों लोक मरण पावले. याच सार्थीत तेथच्या पाद्री लोकांतील मुख्य इमान्यूएल अकोस्टा हा ता० १९ मे रोजीं मरण पावला. त्याचें प्राणोत्क्रमण होण्यापूर्वीं त्यानें असें सांगितलें होतें कीं, झालें हें कांहींच नाहीं, याहूनही भयंकर अनर्थ यापुढें वसई येथें गुजरणार आहेत. पुढें त्याचें प्राणोत्क्रमण झाल्यावर लगेच आकाश मेघांनीं आच्छादित झालें, विजांचा कडकडाट सुरू झाला, व मोठा झंजावात सुटला. अस्तमान समयीं मोठी वावटळ सुटून समुद्राचें पाणी इतकें वाढलें कीं, किल्ल्यांतील सर्व लोक अतिशय भिऊन गेले, व जलप्रलय होण्याची वेळ आजच येऊन ठेवली कीं काय, असें त्यांस वाटूं लागलें. बंदरांतील शेंकडों तारवें एकमेकांवर आपटून फुटून गेलीं. किल्ल्यांतील व बाहेरील शेंकडों घरें वाऱ्यानें पाडून टाकलीं, व शेंकडों घरांचीं छपरें उडवून नेलीं. *फ्रान्सिसकन व आगस्टीनियन लोकांचे मठ धुळीस मिळाले. जेसूइट लोकांचीं तीन भव्य देवालयें व त्यांचे रहाण्याचे वाडे यांच्या वरचीं छपरें उडून गेलीं व त्यांच्या भिंतींना एवढाल्या मोठ्या भेगी पडल्या कीं, तीं घरें दुरुस्ती करण्याच्या लायकीचीं राहिलीं नाहींत. ताडामाडाचीं इतकीं झाडें मोडून पडलीं व त्यांच्यामुळें इतका नाश झाला कीं, त्याचें वर्णनही करतां येत नाहीं. हजारों वृक्ष उन्मळून पडले. वाऱ्याचा जोर एवढा मोठा होता कीं, उंच उंच माडाचीं झाडें मुळासकट एखाद्या पिसाप्रमाणें आकाशांत उडत

* ख्रिस्ती लोकांमध्यें हे दोन पंथ आहेत.

असत, व कोठें तरी दूर जाऊन पडत. विश्वाचा अंत झाला म्हणजे जी स्थिति होईल अशी कल्पना आहे, ती स्थिति त्या वेळीं वसई शहराची झाली होती. मद्रास जर्नल भाग ९ यामध्यें या संबंधानें असें वर्णन केलेलें आहे कीं, इ० स० १६१८ त म्हणजे सुरत येथें इंग्लिशांनीं आपलें ठाणें घातल्यानंतर सहा वर्षांनीं मुंबईच्या आसपासच्या किनाऱ्यावर एक भयंकर तुफान झालें. प्रथमतः तारीख १५ मे रोजीं तें वसई येथें सुरू झालें. त्याचा जोर एवढा मोठा होता कीं, आपलीं घरें एकदम जमीनदोस्त होतील व त्यांतच आपला अंत होईल या भीतीनें तेथील लोक तळघरांत जाऊन लपून बसले. रात्रीस २ वाजण्याचे सुमारास एक धरणीकंपाचा धक्का बसला व शेकडों घरें जमीनदोस्त झालीं; वाऱ्याच्या जोरानें समुद्राचें पाणी शहरांत शिरलें; लाटांचा भयंकर आवाज होऊं लागला; देवालयांचीं खपरेलें उडून गेलीं; हजारों दगड उडून लांब जाऊन पडले; दोन हजार मनुष्यें प्राणास मुकलीं; तळ्यांतील मासेही मरून गेले; जसजसें तुफान वाढत गेलें तसतशीं बहुतेक देवालयें जमिनीस मिळत चाललीं; बंदरांतील पुष्कळ व्यापारी गलबतें बुडून तळास गेलीं.

हें वादळ होऊन गेल्यानंतर पावसानें इतके डोळे वटारले कीं, पावसाचें कांहींच चिन्ह दिसेना. त्यामुळें थोड्याच महिन्यांत दुष्काळाचें स्वरुप इतकें भयंकर होऊन गेलें कीं, आईबाप आपल्या स्वतःच्या पोटाची आग शांत करण्याकरितां आपल्या पोटच्या गोळ्यास भरबाजारांत मुसलमान व्यापाऱ्यांस विकूं लागले. नंतर जेसूईट पाद्री लोकांनीं मोठी रकम गोळा केली व तिच्यांतून ते त्या गरीब लोकांस खाण्याकरितां देऊं लागले, व अशा रीतीनें त्यांनीं तो विक्रय

बंद केला. त्या वेळीं सर्व पोर्तुगीज पाद्री आपल्या देवालयांत जाऊन मोठ्या दीन स्वरानें व अनन्यभावानें परमेश्वराची करुणा भाकूं लागले. तेव्हां त्या जगदीशास दया येऊन त्यानें एकदम मेघ राजास आज्ञा केली. त्याबरोबर सर्व आकाश ढगांनीं व्यापून गेलें, व दुसऱ्या दिवसा-पासून पर्जन्यास सुरवात झाली. नंतर हळू हळू पुनः आबादानी होत चालली.

सतराव्या शतकांतील युरोपांतील फिरस्त्यांनीं वसई शहराचें असें वर्णन केलें आहे कीं, " वसई हें एक सुंदर तटबंदीचें शहर असून एक उत्तम बंदर आहे. त्या प्रांतांत तांदूळ, डाळ, व इतर धान्यें, तेल, नारळ वगैरेचें चांगलें उत्पन्न आहे. शहराचा तट दगडी असून त्याचा घेर तीन मैलांचा आहे. तटाला एकंदर तीन दरवाजे आहेत. त्यांपैकीं दोन मुख्य आहेत. एक पूर्वेकडील तटांत आहे व दुसरा पश्चिमेकडील तटांत आहे. दक्षिणेच्या बाजूस एक लहानसा दरवाजा आहे. तटाला एकंदर आठ बुरूज आहेत. परंतु त्यांपैकीं कांहीं अपुरे आहेत. दक्षिणेच्या किंवा समुद्राकडच्या बाजूस जेथून हल्ला येण्याचा संभव कमी आहे, तेथें एकेरी तट बांधलेला आहे. किल्ल्यावर ४०० गोरे, २०० बाटे, व १८०० गुलाम मिळून २४०० लोकांची शिबंदी आहे. उच्चप्रतीच्या पोर्तुगीज लोकांकरितां शहराचा कांहीं भाग अगदीं वेगळा तोडून घेतलेला होता. कोणाही हिंदूला किंवा धंदेवाल्या मनुष्याला तटाचे आंत राहूं देत नसत. किल्ल्याच्या आंतील रस्ते रुंद व सरळ रेषेंत होते. मध्यंतरीं बाजाराची जागा असून तिच्या सभोंवार सुंदर मंदिरें बांध-

लेली होतीं. बडे लोक भव्य हवेल्यांतून राहत असत. आंत ६ प्राथनागृहें, ४ मठ, व दोन पाठशाळा होत्या. ”

सतराव्या शतकाच्या अखेरीस पोर्तुगीज लोकांच्या सत्तेचा ऱ्हास होऊं लागला, त्या वेळीं वसई शहरास फार मोठा धक्का बसला. इ० स० १६७४त मस्कतचे ६०० मुसलमान चांचे लोक वसईस आले. त्या वेळीं तेथील शिबंदी इतकी घाबरून गेली कीं, त्या चांचे लोकांनीं तटाच्या बाहेरील लोकांवर भयंकर रीतीनें जुलूम केले, व सर्व देवालयांतलि चीजवस्त लुटून नेली, तरी तिनें त्या लोकांस कांहींएक अडथळा केला नाहीं. त्याच वर्षीं मोरो पंडित म्हणजे मोरोपंत पिंगळे यानें कल्याण येथें मराठ्यांचें कायमचें ठाणें दिलें, व वसईच्या उत्पन्नांपैकीं एक चतुर्थांश उत्पन्न पोर्तुगीज लोकांनीं दिलें पाहिजे अशी अट त्यांच्याकडून कबूल करून घेतली. इ० स० १६७६ त शिवाजी स्वतः वसईच्या आसपास आला व पोर्तुगीज लोकांस न जुमानतां त्यानें सिबन नांवाच्या जागेला तटबंदी केली. इ०स० १६९० त मराठ्यांनीं वसईस वेढा दिला; परंतु त्या वेळीं त्यांना यश मिळालें नाहीं. वसईची स्थिति दिवसें दिवस ज्यास्त बिघडत चालली होती. तेथचे सुभेदार अप्रामाणिक रीतीनें वागूं लागले होते, वरिष्ठ प्रतीचे पोर्तुगीज लोक दुराचारी बनले होते, पाद्रीलोक ज्या त्या कामांत आपलेंच घोडें पुढें ढकलूं लागले होते व एकंदर पोर्तुगीज लोक, ज्यांनीं त्यांच्या धर्माची दीक्षा घेतली नव्हती, त्यांस अतिशय गांजूं लागले *होते. वरील

*इ० स०१५८७त स्पेनचा राजा दुसरा फिलिप यानें हिंदुस्ता-

कारणांमुळें पुष्कळ लोक वसई सोडून गेले होते. तसेंच पुष्कळ वर्षें एक भयंकर साथीचा *रोग उत्पन्न झाला होता त्यामुळें, इ० स० १६९० त त्या शहरची सुमारें ½ लोकसंख्या कमी झाली होती. अठराव्या शतकाच्या प्रारंभीं वसईची लोकसंख्या ६०४९९ होती. या संख्येपैकीं बाटे लोकांची संख्या ९८१३१ होती, व अस्सल युरोपियन लोकांची संख्या २३६८ होती. त्याच वेळेच्या सुमारास वसईचें असें वर्णन केलेलें आहे कीं, वसई हें एक लहानसें व्यापाराचें बंदर आहे. हामिलटन साहेब असें

नांतील पोर्तुगीज सुभेदार राजद्रोही झाले असून ते आपल्या ताब्यांतील किल्ल्यांची दुरुस्ती मुळींच करीत नाहींत असें म्हटलें आहे. डा कुन्हा यानें दिलेल्या वसईच्या वर्णनांत तो असें लिहितो कीं, ज्यांनीं खिस्तीधर्म स्वीकारिला नव्हता त्यांचे संबंधानें नियम फारच कडक होते, कोणाही हिंदूला घोडेवाल्याशिवाय दुसरी चाकरी देऊं नये, व कोणावरही लवमात्र दया करूं नये, कोणालाही सरकारी कामांत घेऊं नये, सर्वांनीं आदित्यवारीं संध्याकाळीं पाद्री साहेबांचें धर्मपर व्याख्यान ऐकण्याकरितां खिस्ती देवालयांत आलें पाहिजे; जो कोणी येणार नाहीं त्याला ४ आण्यांपासून ८ आणेपर्यंत दंड द्यावा लागत असे. गोवेझ नांवाच्या साहेबानें इ०स० १६०३ मध्यें असें लिहून ठेविलें आहे कीं, पोर्तुगीज लोकांनीं जे खिस्ती झाले नाहींत त्यांना इतकें छळलें कीं, पुष्कळ हिंदु, मुसलमान व पारशी तो प्रांत सोडून शहाजहान बादशाहाचे राज्यांत जाऊन राहिले. दमण व वसई यांच्या दरम्यान् धर्मांतर न केलेले असे फार थोडे लोक राहत असून, त्या प्रांतांतील बहुतेक जमीन लागवडीशिवाय पडलेली होती.

* ह्या रोगाचे संबंधानें गेमेली क्यारेरी यानें असें वर्णन केलें आहे कीं, "हा रोग हिंदुस्तानच्या पश्चिम भागांत फार झाला होता. त्यांचीं लक्षणें म्हटलीं म्हणजे प्रथमतः कानांचेमागें, काखांतून व आडसंधींतून द्राक्षाएवढे बाधणे येत असत, व बुबुळांच्या सभोंवतालचा डोळ्याचा भाग तांबडा होत असे. हीं चिन्हें झालीं म्हणजे मनुष्य आपल्या जिविताची आशा सोडून पुढच्या तयारीस लागे."

म्हणतो कीं," वसईतील सर्व संपत्ति आळशी बडे लोकांनीं पुरून टाकिली होती. ते आपला काळ सुखांत व चैनींत घालवीत, ते मोठे गर्विष्ट असत, व आपल्या देशाच्या सत्तेचा ऱ्हास होत चालला आहे, या गोष्टीची त्यांस गुमानही नसे." इ० स० १७२० त वसईच्या किल्ल्याची स्थिति तपासण्याकरितां गोव्यांहून एक अमलदार आला होता, त्यानें असें लिहिलें आहे कीं, " तटाच्या बाहेरच्या सर्व माऱ्याच्या जागांची अव्यवस्था झाली आहे, सर्व मेढेकोट व तट मोडकळीस आले आहेत, किल्ल्यांत पुरेशी शिबंदी नाहीं, व आंत जे कांहीं थोडेसे लोक आहेत, ते अशिक्षित असून त्यांस कवाइतीची मुळींच माहिती नसल्यामुळें त्यांचा उपयोग फक्त एखादा दरवडा घालण्यांत फार चांगला होईल!"

अशा प्रकारें दुर्बळ झालेल्या वसई शहराच्या सभोंवार मराठे लोक हळूहळू घिरट्या घालूं लागले. इ ० स ० १७३८ त मराठ्यांनीं वसईच्या उत्तरेस अरनाळा म्हणून जो किल्ला आहे तो घेतला. त्याचप्रमाणें वरसोवा व धारावी हीं बेटेंही त्यांनीं हस्तगत केलीं, व वसईच्या दोहों बाजूंच्या खाड्या आपले ताब्यांत घेऊन त्या शहराचें सर्व दळणवळण बंद पाडलें. त्याच वेळीं मराठ्यांची धाड गोव्यांवरही जाऊन पडल्यामुळें पोर्तुगीज लोकांस वसईस कुमक पाठवितां येईना, व वांद्रें येथील जेसूईट लोक फार वर्षांपासून मुंबईच्या इंग्लिश लोकांस अतिशय त्रास देत असत, त्यामुळें त्यांनींही पोर्तुगीज लोकांस मदत देण्याचें नाकारलें. चिमणाजी आप्पा बरोबर मोठी फौज घेऊन वसईस आला, व तारीख १७ फेब्रुवारी इ० स० १७३९ त त्यानें वेढ्याचें काम सुरू केलें. त्या वेळीं

त्याच्याबरोबर मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव विंचुरकर, राणोजी शिंदे, शंकराजी नारायण, मानाजी आंग्रे, पिलाजी जाधव वगैरे सरदार आपापल्या फौजेसह आले होते, व खंडूजी माणकर, कृष्णाजी नाईक वगैरे सरदार साष्टी, धारावी वगैरे किल्ले घेऊन मागाहून येऊन मिळाले. वेढ्याचें काम धीरे धीरे चाललें होतें, व दररोज तोफांचा मारा किल्ल्यावर चाललाच होता. कांहीं दिवसांनीं वसईचा किल्लेदार सिल्व्हेरिया डी मेनेझेस यानें चिमणाजी आप्पा याजपाशीं असें बोलणें लाविलें कीं, " जंजिऱ्याच्या शिद्दीप्रमाणें तुम्हीं आम्हांशीं तह करण्यास कबूल असाल तर आम्हीं वसईच्या आसपासचा सर्व मुलूख तुम्हांस देतों." परंतु चिमणाजी आप्पास ती गोष्ट पसंत पडली नाहीं. त्याला असें वाटलें कीं,वसईसारखा मजबूत किल्ला पोर्तुगीज लोकांचे हातीं ठेवून शेजारचा प्रांत आपणांस मिळाला एवढ्याच गोष्टीचा संतोष मानून जर आपण आज निघून गेलों तर त्या लोकांना आपला गेलेला मुलूख परत जिंकून घेण्यास फारसे आयास पडणार नाहींत, व ते पुनः आपणांस उपद्रव देतील. त्यामुळें चिमणाजी आप्पानें तें बोलणें अमान्य करून वेढ्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालविलें, व पावसाळा सुरू होण्याचेपूर्वीं वसईचा किल्ला सर करण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें किल्ल्यास मोर्चे लाविले. पोर्तुगीज लोकांनीं मराठ्यांवर तोफांचा एकसारखा मारा चालविला, त्यामुळें पुष्कळ मराठे प्राणास मुकले. पुढें मराठ्यांनीं मोठमोठ्या तोफा आणून किल्ल्यावर भडिमार सुरू केला,व तटाला एक लहानसें खिंडार पाडलें. परंतु त्यांना हल्ला

करतां येईना. नंतर किल्ल्याचें भिंताड पाडावें या हेतूनें मराठ्यांनीं तटाखालीं सुरुंग खोदले. परंतु पोर्तुगीज लोकांनीं त्याच बेतानें तटाचे आंतून जमीन खोदून ठेवि-ल्यामुळें मराठ्यांचा तो प्रयत्न व्यर्थ गेला. नंतर मराठ्यांनीं पुनः पांच सुरुंग तयार केले. त्यांपैकीं तीन अगदीं जवळजवळ होते,व दोन बरेच अंतरावर होते. प्रथमतः दोहोंपैकीं एकाला आग घातली, परंतु तो चांगलासा उडाला नाहीं. म्हणून जवळ जवळ जे तीन होते त्यांना आग घातली. परंतु त्यांपैकीं प्रथमतः फक्त दोनच उडाले, व त्यामुळें तटाला बरेंच मोठें खिंडार पडलें. त्या वेळीं मराठे मोठ्या वीरश्रीनें किल्ल्यांतील मंडळीवर हल्ला करण्याकारतां धावत गेले, व कांहीं तटावरही चढले. परंतु त्या आणीबाणीच्या प्रसंगीं राहिलेला तिसरा सुरुंग एकदम उडाला, व तो इतक्या जोरानें उडाला कीं, त्या ठिकाणीं मराठ्यांचे हजारों लोक प्राणास मुकले. तटावरील लोकांच्या चिंधड्या चिंधड्या होऊन ते हवेंत परांप्रमाणें उडाले. तटाखालचे लोक तट पडल्यामुळें चुरडून मेले व जे थोडेसे शिल्लक राहिले, त्यां-च्यावर पोर्तुगीज लोकांनीं गोळ्यांचा वर्षाव करून त्यांचाही फडशा करून टाकिला. नंतर पांचव्या सुरुंगास आग घातली. हा सुरुंग सेंट सबास्टियन नांवाच्या बुरुजाखालीं खोदलेला होता, व तो मल्हारराव होळकराच्या देखरेखीखालीं तयार केलेला होता. हा सुरुंग उडतांच अर्धाअधिक बुरूज ढांसळून खालीं पडला. मराठयांनीं या ठिकाणीं एकदम लगट केली. या झटापटींत पोर्तुगीज लोकांचे ४० लोक ठार झाले, व शंभरांवर जखमी झाले. मराठ्यांचेही बरेच लोक जायां

झाले. पोर्तुगीज लोकांनीं तट पडल्या जागीं मातीच्या टोपल्या रचून त्यांची भिंत तयार केली, व तेथून ते तोफा डागूं लागले. हा वेढा एकंदर तीन महिने पडला होता. मराठ्यांनीं पोर्तुगीज लोकांची सर्व सामग्री बंद केली होती. त्यामुळें पोर्तुगीज लोकांची उपासमर होऊं लागली. खुषकीच्या बाजूनें चिमणाजी आप्पा, व समुद्राच्या बाजूनें मानाजी आंग्रे वेढा देऊन बसले होते. अशा रीतीनें पोर्तुगीज लोकांचा कोंडमारा झाला होता. शेवटीं पोर्तुगीज लोक मराठ्यांस शरण आले, व त्यांनीं तहाचें बोलणें सुरू केलें. ता. १६ मे सन १७३९ रोजीं उभय पक्षीं तह झाला. या वेढ्यांत पोर्तुगीज लोकांचे सुमारें ८०० व मराठ्यांचे ५ हजारांवर लोक जायां झाले, असा चिमणाजी आप्पाचा स्वदस्तुरचा लेख आहे. आप्पानें हा बळकट किल्ला छातीचा कोट करून सर केला. अशा प्रकारचें वेढ्याचें काम मराठ्यांचे हातून दुसरें झालेंच नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. मराठी दप्तरांत या वेढयांत मेलेल्या व जखमी झालेल्या लोकांची एकंदर संख्या १२ पासून १४ हजारांपर्यंत दिलेली आहे. हा इतिहास ग्रांटडफ साहेबांनीं आपल्या बखरींत दिला आहे. पेशव्यांचे बखरींत या वेढयाचे संबंधानें असें लिहिलें आहे कीं, तीन महिनेपर्यंत मोठ्या निकरानें लढूनही किल्ला हातीं येत नाहीं असें पाहून चिमणाजी आप्पा फार निराश झाला. एके दिवशीं त्यानें आपल्या सर्व सरदारांस जवळ बोलावून असें सांगितलें कीं, “ किल्ला हस्तगत होत नाहीं, करितां मजला तोफेचे

तोंडीं बांधून तरी माझें डोकें किल्ल्यांत पाडावें, नाहीं तर किल्ला घ्यावा." त्या वेळीं सर्व सरदारांनीं "आपला निश्चय तोच आमचा नेम आहे, परंतु कांहीं तरी किल्ल्यांतील भेद समजल्याशिवाय तो हस्तगत होणें कठीण, याकरितां त्याची कांहीं तरी मसलत काढिली पाहिजे," असें सांगितलें. पुढें सर्वानुमतें असें ठरलें कीं, खंडूजी माणकर यानें गुराख्याचा वेष घेऊन किल्ल्यांत शिरकाव करावा, अंजूरकर म्हणून पांचकळशा सुतार होता त्यानें किल्ल्यांत जाऊन सुतारकीचें काम करावें, व दुलभाजी मोरे या नांवाच्या सरदारानें आंत जाऊन कासाराचा धंदा करावा, व अशा रीतीनें तिघांनीं किल्ल्यांतील भेद काढावा. या बेताप्रमाणें तिघेही किल्ल्यांत शिरले, व त्यांनीं आंतील सर्व बातमी आणिली. नंतर मराठयांनीं आपल्या लष्करांतून किल्ल्याच्या तटापर्यंत एक सुरुंग तयार केला, व त्यांत दारूचे बुदले भरून त्यांस बत्ती दिली. त्या वेळीं किल्ल्याचा एक बुरूज उडाला, परंतु तो पुनः जागच्याजागीं बसला, खालीं ढांसळला नाहीं. नंतर दुसरा सुरुंग तयार केला, व त्याच्यायोगानें मराठ्यांचा कार्यभाग साधला. या वेळीं आप्पाच्या थोरपणाची अशी एक गोष्ट सांगतात कीं, किल्ल्यांतील एका मुख्य फिरंगी सरदाराची बायको किल्ल्याच्या पश्चिमेच्या आंगच्या चोर दरवाज्यानें बाहेर पडून गोव्यांस पळून जाण्याकारितां मचव्यांत बसली. परंतु आंग्र्यानें तें गलबत पकडून तिला कैद केलें, व चिमणाजी आप्पाकडे पाठवून दिलें. ती बाई फार सुस्वरुप होती. आप्पानें तिला पाहतांच "ही कशाला धरून आणिली?"

असें म्हटलें, व तिला लुगेंडचोळी देऊन परत किल्ल्यांत पोहोंचतें केलें. ती परत गेल्यावर तिनें आपल्या नवऱ्यास सांगितलें कीं, " चिमणाजी आप्पा मोठा पुण्यवान् आहे. आपणास या लढाईत यश येणार नाहीं. तेव्हां त्या सरदारानें चिमणाजी आप्पाशीं तहाचें बोलणें सुरू केलें. पुढें उभयपक्षीं तह झाला त्यांत असें ठरलें कीं, पोर्तुगीज लोकांनीं आपली चीजवस्त घेऊन आठ दिवसांत किल्ला खालीं करून द्यावा. अशा रीतीनें तो किल्ला मराठ्याचे हातीं आला. वरील हकीगत डफ साहेबांचे इतिहासांत नमूद केलेली नाहीं. परंतु ' फिरंग्याचीं बायको हातीं लागली असतां चिमणाजी आप्पानें तिचा गौरव करून तिला परत किल्ल्यांत आपल्या नवऱ्याकडे पाठवून दिलें,' ही गोष्ट वसईचे किरिस्तांव लोक अद्यापि मोठ्या आवेशानें व कृतज्ञतापूर्वक सांगतात. वसई मराठ्याचे हातीं आली तेव्हां क्यापटन डी सौझा हा पोर्तुगीज सरदार तेथें होता.

वसईचा किल्ला व शहर मराठ्यांचे हातीं आल्यावर त्याला बाजीपूर असें नांव पडलें. मराठ्यांनीं तेथें आपला एक सुभेदार नेमला होता, व त्याच्या ताब्यांत बाणकोटच्या खाडीपासून दमणपर्यंत प्रांत दिलेला होता. त्या प्रांतांत पुनः हिंदूंची वस्ती करावी म्हणून पेशव्यांनीं पुष्कळ लोकांस फुकट जमिनी दिल्या, व पोर्तुगीज लोकांनीं जे हिंदु बाटविले होते, त्यांना शुद्ध करून पुनः जातींत घ्यावे म्हणून तेथें विद्वान् ब्राह्मण लोक नेऊन ठेविले, व त्यांच्या खर्चाबद्दल एक कर बसविला.

इ०स० १७६७त वसई येथें वखार घालविण्याची डच लोकांस ईच्छा उत्पन्न झाली. इ० स १७७४त इंग्लिश लोकांनीं वसई घेतली, परंतु लगेच त्यांनीं तें शहर पेशव्यांस परत दिलें. इ० स० १७८० त गोदर्दसाहेब आपल्या सैन्यासह सुरतेहून पायवाटेनें वसईस आला. वसईचा किल्ला अतिशय मजबूत असल्यामुळें त्याला तो घेण्यास बरेच प्रयास पडले. या वेळीं पेशव्यांचे घराण्यांत आपसांत तंटे लागले होते, व राघोबादादा मुंबई सरकारचे आश्रयास जाऊन राहिला होता. इंग्लिशांनीं राघोबास गादीवर बसविण्याचें वचन दिलें होतें, त्यामुळें इंग्लिश व मराठे यांच्यांत लढाई सुरू झाली होती. गोदर्दसाहेबानें तारीख २८ नोवेंबर रोजीं ९०० यार्ड अंतरावरून किल्ल्यावर आपल्या तोफखान्याचा मारा चालविला. प्रथमतः मराठे त्याला दाद देईनात; तेव्हां त्यानें आणखी मोठ मोठया ९ तोफा आणिल्या व ता० ९ दिंजबरपासून मोठ्या जोरानें किल्ल्यावर तोफांचा भडिमार चालविला. तारीख १० रोजीं तटाला खिंडार पडलें तेव्हां किल्लेदार किल्ला खालीं करून देण्यास कबूल झाला, परंतु इंग्लिश ती गोष्ट कबूल करीतात. दुसरे दिवशीं इंग्लिशांनीं ज्या अटी सांगितल्या त्या कबूल करून मराठ्यांनीं तो किल्ला त्यांच्या स्वाधीन गेला. पुढें सालबाईचा तह (इ० स० १८०२) झाल्यावर इंग्लिशांनीं तो किल्ला मराठयांस परत दिला. इ० स० १८०२ त यशवंतराव होळकर पुण्यावर चाल करून आला, त्या वेळीं दुसरा बाजीराव पुण्याहून पळून रत्नागिरी जिल्ह्यांत सुवर्णदुर्ग येथें गेला, व तेथून जल-

मार्गानें वसईस आला. या ठिकाणीं कर्नेल क्लोज व एल-फिन्सन हे इंग्लिशांचे सरदार होते, त्यांच्यांशीं त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें. हा तह ता० ३१ दिजंबर इ० स० १८०२ रोजीं झाला. बाजीराव एप्रिल महिन्यापर्यंत वसई येथें होता, व इंग्लिशांनीं त्या ठिकाणीं त्याचा फार उत्तम बंदोवस्त ठेविला होता.

पुढें बाजीराव हळूहळू इंग्लिशांविरुद्ध कारस्थानें करूं लागला, तेव्हां त्याचा बंदोबस्त करणें इंग्लिश सरकारास भाग पडलें, व इ० स० १८१७ त त्यांनीं त्याच्याशीं नवीन तह केला. हा तह झाल्यानंतर वसईसकट सर्व उत्तर कोंकण इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. इ० स० १८१८ त वसईच्या किल्ल्याचा खंदक बहुतेक भरून गेला होता. त्याच्या तटावर झाडेंझुडपें उगवलीं होतीं, व राहण्यासारखें असें किल्ल्यांत एकही घर नव्हतें. कांहीं वर्षेपर्यंत इंग्लिशांनीं एक लहानशी फौजेची तुकडी तेथें ठेविली होती. इ० स० १८२४ त किल्ल्याच्या एका दरवाज्याशीं पहारा असून त्या दरवाज्याला कुलूप घातलेलें होतें, व आंतील जागा ओसाड होती. इ० स० १८२५ त हेबर नांवाचा युरोपियन गृहस्थ हा किल्ला पाहण्यास गेला होता, त्या वेळीं किल्ल्यांत सर्व वस्तूंचा भयानक देखावा त्याचे दृष्टीस पडला. आंत मनुष्याची तर वस्ती नव्हतीच, परंतु पूर्वींच्या टोलेजंग इमारती, व मोठमोठीं खिस्ती देवालयें यांची पडापाड झालेली होती, व त्यांच्या भिंतींवर मोठ मोठीं झाडें वाढलीं होतीं. इ० स० १८३० त तेथें साखरेचा कारखाना काढावा असें लिंगार्ड नावाचे साहेबाचे

मनांत आलें, व त्यानें एक गिरणीही बांधली. परंतु तितक्यांतच तो साहेब मरण पावला, व सर्व त्याचे बेत जागच्या जागींच राहिले. इ० स० १८३८ पासून वसईचा किल्ला अगदींच ओसाड स्थितींत आहे. इ० स० १८९२ त किल्ल्यांतील एक चर्च दुरुस्त करून कांहीं लोकांनीं तेथें साखरेचा कारखाना सुरू केला. परंतु त्या व्यापारांत त्यांना बूड आली, त्यामुळें पुनः तो किल्ला ओसाड पडला, व हल्लीही तशाच स्थितींत आहे. किल्ल्यांत हनुमानाचें व त्रिविक्रमाचें अशीं दोन देवालयें आहेत. त्रिविक्रमाच्या देवालयास सरकारांतून सालीना १०६१ रुपयांची नेमणूक आहे. इ० स० १८८० त मेजर लिटलवूड नांवाच्या गृहस्थानें तीस वर्षांचे करारानें हा किल्ला घेतला, व त्यानें आंत लागवड वगैरे केली. पुढें त्या साहेबाची बायको व मुलगा हीं या किल्ल्यांत राहून आंत शेतीभाती करीत होतीं.

वसईच्या किल्ल्यांत पाहण्यासारखीं जीं स्थलें आहेत त्यांचें वर्णन येणेंप्रमाणें:--

समुद्राकडच्या बाजूनें आपण निघालों म्हणजे प्रथमतः किल्ल्याचा दुहेरी भक्कम दरवाजा लागतो. या दरवाज्याला एक लोखंडी व एक सागवानी अशीं दोन निरनिराळीं झडपें असून अद्यापि तीं फार चांगल्या स्थितींत आहेत. यांपैकीं एका झडपावर ' २० नवंबर १७२० ' असा पोर्तुगीज भाषेंत लिहिलेला लेख आहे. दरवाज्याचे आंत डाव्या बाजूस एक लहानसें मारुतीचें देवालय आहे. त्याच बाजूस सेंट जोसेफ याचें देवालय आहे. या इमारतीला एक मोठा भक्कम उंच मनोरा असून त्याच्या

भिंती वृक्षाच्छादित आहेत. दरवाज्यावर पोर्तुगीज भाषेंत एक लेख आहे त्याचें भाषांतर येणें प्रमाणें:—

"डान फ्री आलीक्झॉ डी मेनेझेस हा आर्चबिशप प्रिमेट होता, व रेवरेंड पेड्रोगालव्हाओ पेरीरा हा व्हिकार होता, तेव्हां इ० स० १६०१ या वर्षी या देवालयाचा जीर्णोद्धार झाला."

या इमारतीचे दर्शनी बुरूज, कमानदार दरवाजे, ऊंच परंतु अरुंद अशा तिच्या खिडक्या इत्यादि भाग अद्यापि फार चांगल्या स्थितींत आहे, परंतु तिचें छप्पर पडून गेलें आहे, व मनोऱ्याच्या पायऱ्या ढासळून पडल्या आहेत. मुख्य स्थंडिलाच्या उजवे बाजूस कठड्याच्या पलीकडे एका कबरीवर पोर्तुगीज भाषेंत खालीं दिलेला लेख लिहिलेला आहे:—

"ज्या प्रभूनें ह्या देवालयाचा जीर्णोद्धार करून त्याची उत्तम व्यवस्था केली त्याचा सेवक पेड्रो गालव्हाओ यास येथें मूठमाती दिलेली आहे." तो गोवें येथें ता. १० मार्च इ०स० १६१८ त मरण पावला.

पश्चिमेकडील कोपऱ्यास एक अर्धे बांधलेलें थडगें आहे, व त्यावर आंटोनियो डी आलमीडा साम-पायो सू" असें नांव खोदलेलें आहे. हें देवालय मूळ पोर्तुगालचा राजा तिसरा डॉम जोओ याच्या हुकुमावरून सुभेदार डाम जोओ डीकास्ट्रो यानें इ० स० १५४६ त बांधलें. हें देवालय व त्याच्या उजव्या अंगास दुसरी एक इमारत आहे यांच्यामध्यें एक बांधीव वाट असून तिच्यावर कमानी केलेल्या आहेत. "यावरून असा तर्क होतो कीं,

त्या वेळीं वसई येथें जे पोर्तुगीज बडे लोक होते त्यांना आपल्या बायका देवालयांत साधारण लोकांच्या नजरेस पडूं नयेत असें वाटत असे, व तेवढ्याकरितां त्यांनीं आपल्या बायकांकरितां म्हणून ती वाट मुद्दाम तयार केली होतीं, डा कुन्हा यानें वसईचें जें वर्णन केलें आहे त्यांतही असेंच लिहिलेलें आहे.

समुद्राकडे तोंड करूनउभें राहिलें म्हणजे वर सांगितलेल्या दरवाज्याच्या डाव्या बाजूस एका गल्लीच्या शेवटीं एक मोकळें पटांगण दृष्टीस पडतें, व त्याच्या सभोंवार नाश पावलेल्या उत्तम उत्तम इमारतींचा अवशेष भाग अद्यापि दृष्टीस पडतो. या पटांगणाचे पलीकडे एक दरवाजा आहे. त्याची हल्लीं पडापड झालेली आहे. पूर्वीं किल्ल्यांत एक वाटोळी गढी होती, तिचा हा दरवाजा होय. या दरवाज्याच्या दोन बाजूंस पूर्वीं दोन मोठे दगडी खांब होते. या खांबांच्या माथ्यावरील दगड मात्र हल्लीं दृष्टीस पडतात. बाकीचें काम नाहींसें झालें आहे दरवाज्याच्या शिरोभागीं एक क्रॉस, एक चिलखत, एक वर्तुळ अशा खुणा खोदलेल्या असून इ० स० १६०६ असा सन घातलेला आहे. दरवाज्याच्या आंत जिकडे तिकडे नाश पावलेला अवशेष भाग पडलेला आहे, व डाव्या अंगास एक बुरूज ढासळून पडलेला आहे. त्याच्या एका दगडावर एक लेख आहे, व तो वसईच्या किल्ल्यांतील सर्व लेखांत अगदीं जुना आहे, तो लेख येणेंप्रमाणें:—

" ज्या पहिल्या पोर्तुगीज कपतानानें हा किल्ला बांधला

त्याचें नांव गारशिया डी सा असें होतें, व त्यानें तो इ० स० १५३६ त बांधला."

वर सांगितली गढी पोर्तुगीज लोक वसई येथें येण्याचे पूर्वींच बांधलेली होती व ती मूर लोकांचे ताब्यांत होती, असें ओरिएंटल क्रानिकलमध्यें लिहिलेलें आहे.

या गढीच्या जरा मागच्या बाजूस कांहीं पडक्या भिंती दृष्टीस पडतात. तेथें पूर्वीं दोन भव्य वाडे होते. एक वसईच्या सुभेदाराचा व दुसरा पोर्तुगीज लोकांच्या उत्तरकोंकणांतील वसाहतींच्या मुख्य अधिकाऱ्याचा. गढीच्या दरवाजाच्या मागच्या बाजूस समुद्राकडील दरवाज्यापासून जी गल्ली लागते तिच्या शेवटाशीं एक मोठी टोलेजंग इमारत लागते. येथें पूर्वीं न्यायाधीशाची कचेरी होती. तेथें पूर्वीं आगस्टीनियन ह्मणून एक ख्रिस्ती धर्माचा पंथ आहे त्या पंथांतील लोकांचें देवालय व मठ हीं होतीं असेंही कांहींचें ह्मणणें आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या इमारतीच्या देवडीला पांच पायऱ्या आहेत, व पुढच्या अंगास तिला चार खांब असून तिला तीन कमानदार दरवाजे आहेत. जरा पुढें गेलें ह्मणजे दोन मोठाले दगड पडलेले आहेत व त्या प्रत्येकावर पोर्तुगीज भाषेंत शिलालेख लिहिलेला आहे. एकावर "ही देवडी लिनहारेसचा कौंट डॉम मिग्युऐल डी नोरोल्डा हा सुभेदार असतां बांधली, व तिच्यावर ग्रामदेवता ह्मणून सेंट फ्रान्सिस झेविअर याची प्रतिमा बसविलेली होती. ता. १० मे इ. स. १६३१," असा लेख लिहिलेला आहे, व दुसऱ्यावर जेव्हां गासपर डी मेली

हा वसईचा सुभेदार होता व त्याच्या मदतीस म्हणून गोंकालो कोएल्हो डा सिल्व्हा फेरीरा व जाओ बोटो माकाडो वगैरे सरदार होते, त्या वेळीं सेंट झेविअर याच्या आश्रयाखालीं इ. स. १६३१ त ही इमारत बांधली, " असा लेख आहे.

वर सांगितलेल्या इमारतीच्या शेजारींच दुसरी एक जमीनदोस्त झालेली इमारत आहे. तींत पूर्वीं वसईचा दुय्यम अधिकारी रहात असे. तिला लागून दुसरी एक मोठी पडकी इमारत आहे. ती पूर्वीं धान्याची कोठी होती. तेथून जरा पुढें गेलें म्हणजे एक चर्च (ख्रिस्ती देवालय) व हॉसपिटल आफ पिटी (गरीबांचा दवाखाना) अशा दोन इमारती लागतात. हॉसपिटल आफ पिटि ही इमारत लांबच लांब असून तिचा चौक फार मोठा आहे. देवालयाची इमारत लहानच आहे, परंतु तिचें बांधकाम फार सुरेख आहे. या देवालयांत दोन थडगीं आहेत. एकावर "केब्राल डी नाव्हीस व त्याचा पुत्र हीरोनिमो केब्राल, व त्यांचे वारस यांचें थडगें" असे शब्द आहेत, व दुसऱ्यावर कांहीं पोर्तुगीज अक्षरें आहेत. वर सांगितलेला दवाखाना ही फार जुनी संस्था असून तिला पोर्तुगीज सरकारांतून दरमहा सुमारें ९० रुपयांची नेमणूक होती; शिवाय गरीब लोकांकरितां तांदूळ खरेदी करण्याकरितां सालीना १७० रुपयांची नेमणूक होती. हल्लींच्या स्थितीशीं तुलना केली तर वरील नेमणूक अगदींच अल्प होती असें वाटेल, परंतु त्या वेळची देशस्थिति लक्ष्यांत आणिली असतां त्या नेमणुकींतून हजारों गरिबांस अन्न मिळत असे. मागें सांगितलेल्या देवालयापासून थोड्याच अंतरावर

महादेवाचें देवालय आहे. तें बहुधा पेशव्यांनीं बांधलें असावें. या देवालयाशीं समांतर असें नोसा सिनोरा डाव्हिडा याचें देवालय आहे. वसई प्रांतांत जीं ख्रिस्ती देवालयें आहेत त्या सर्वांत हें जुनें देवालय आहे. गेमेली क्यारेरी यानें इ० स० १६९५ त या देवाळयाचें असें वर्णन केलें आहे कीं, "या देवाळयांत तीन उत्तम स्थंडीलें आहेत." अलीकडे या देवाळयाच्या गाभाऱ्यावर नवीन इमारत उभारून तेथें साखर तयार करण्याचा कारखाना सुरू केला होता. परंतु त्यांतील पुढारी मंडळीस त्या कामांत फारसें यश न आल्यामुळें तो इ. स. १८७४त बंद पडला. वर सांगितलेली इमारत बांधली त्या वेळीं पाया खोदतांना एक थडगें उकरलें, त्या वेळीं त्यांत मनुष्याचा व घोड्याचा असें दोन सांगाडे सांपडले. पूर्वीं युरोप खंडांत अशी एक चाल होती कीं, एखादा सरदार मरण पावला तर त्याच्याबरोबर त्याचा घोडाही जिवंत पुरीत असत. अशाच प्रकारची एक गोष्ट इ० स० १७८१ त जर्मनी देशांत ट्रीञ्ज येथें घडून आली होती.

वर सांगितलेल्या देवालयाच्या उजव्या बाजूस एक इमारत ढासळून पडलेली आहे. तेथें पूर्वीं हासपिटलर्स म्हणून पोर्तुगीज लोकांमध्यें एका पंथाचे लोक होते त्यांचा मठ होता (इ० स० १६८१). परंतु ह्या पंथांतील लोक वसई येथें मुळींच उदयास आले नाहींत

थोडेंसें पुढें गेलें म्हणजे जेसूईट लोकांचा पडापड झालेला पूर्वींचा मठ लागतो. या मठाचें दर्शनी काम इतकें सुबक आहे कीं, तशा मासल्याचें काम वसईस जुन्या

इमारतींतून कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. या मठाला लागूनच पूर्वींची जेसूईट लोकांची पाठशालेची इमारत आहे. या पाठशाळेच्या भिंती अद्यापि फार मजबूत आहेत, परंतु हल्लीं त्या वेली व इतर झाडेंझुडपें यांनीं आच्छादून गेल्या आहेत. जेसूईट लोकांच्या मठाचा पाया सेंट झेवियर याचा मालचियर गॉन सालवेस म्हणून एक परम स्नेही होता त्यानें इ० स० १५४८ त म्हणजे जेसूईट लोक वसई येथें येण्याचे आदले वर्षीं घातला. इ० स० १५७३ पासून इ० स० १५८८ पर्यंत पोर्तुगीज लोकांनीं पुष्कळ हिंदूंस या मठांत ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. इ० स० १५८८ मध्यें तर ९४०० हिंदू लोकांस फक्त वसईस बाप्तिस्मा घ्यावा लागला. वरील संख्येवरून त्या काळीं एकंदर कोकण प्रांतांत पोर्तुगीज लोकांनीं किती हिंदू लोकांस बाटविलें असेल याची कल्पनाही होणें अशक्य आहे. सतराव्या शतकांत वसई येथील जेसूईट लोकांचा अतिशय भरभराट झाला होता, असें फ्रायर साहेबानें इ० स० १६७५ त लिहून ठेविलेलें आहे.

वर सांगितलेल्या मठांत दोन थडगीं आहेत. त्यापैकीं एकावर "पाठशालेची आश्रयदाती इसाबेल डी आगुइर विधवा हिचें हें थडगें" असें लिहिलें आहे, व दुसऱ्यावर "हें थडगें डोना फिलिपा डा फॉन्सीका विधवा हिचें आहे. या दानशूर बाईनें आपली सर्व संपत्ति आपल्या हयातींत या मठास दिली. ही बाई इ० स० १६२८ च्या जुलै महिनाच्या २० व्या तारखेस मरण पावली" असें लिहिलेलें आहे.

वर सांगितलेल्या जेसूईट लोकांच्या मठाच्या कांहींसें पलीकडे 'फ्रान्सिसकन चर्च आफ इनव्होकेशन आफ सांटो आंटोनियो' नांवाचें एक ख्रिस्ती देवालय आहे. हें देवालय वसई येथें जीं ख्रिस्ती देवालयें आहेत, त्या सर्वांत अतिशय मोठें असून फार जुनें आहे. मुख्य गाभाऱ्याचें छत मेहराबदार असून त्याचे सुंदर कंगोरे अद्यापि कायम आहेत. बाप्तिस्मा देण्याचें पाणी जेथें ठेवीत असत, त्या-च्याजवळ एक मोठी कमान आहे ती, व चौकाच्या चारही बाजूंस ज्या कोठड्या आहेत त्यांच्या सभोवार जो बोळ आहे तो, हे दोन्ही भाग अद्यापि फार चांगल्या स्थितींत आहेत. ह्या देवालयाचें बांधकाम घडींव दगडांनीं केलेलें आहे. तसेंच त्याचा एक जिना, कांहीं खिडक्या, व दरवाज्यांच्या चौकटी अद्यापि कायम आहेत. आंटोनि-यो डी पोर्टो नावांच्या एका ख्रिस्ती धर्मोपदेशकानें इ० स० १५३० ते ४० या कालांत वसई व साष्टी या दोन ठिकांणीं पुष्कळ देवालयें स्थापन केलीं. त्या सर्वांत वर सांगितलेलें देवालय मुख्य होतें. इ० स० १५५० च्या सुमारास जेसूईट पंथाचे लोक प्रथमतः वसई येथें आले. त्या वेळीं फ्रान्सिसकन लोकांचे आपसांत तंटे माजल्या-मुळें त्यांचें महत्त्व कमी झालें होतें. या देवालयांत पुष्कळ थडगीं आहेत. त्यांपैकीं एकावर "महाराजांचा मंत्रीः— हा तारीख २४ आगष्ट इ० स० १८५८ रोजीं मरण पा-वला. तो, त्याची पत्नी डोना लुईसा डा सिलव्हा, व त्याचे वंशज यांना या ठिकाणीं पुरलें आहे," असा पोर्तु-गीज भाषेंत लिहिलेला लेख आहे. याशिवाय दुसऱ्या पुष्कळ

थडग्यांवर लेख लिहिलेले आहेत. पूर्वीं फ्रान्सिसकन पंथांतील लोकांना राजाश्रय होता, परंतु इ० स० १६३४ त त्या लोकांचें प्राबल्य अगदीं कमी होऊन जेसूईट लोकांचें प्रस्थ बरेंच माजलें होतें. तथापि अशा वेळींही वसई येथें ३० फ्रान्सिसकन्स, १५ जेसूईट्स, १० डोमीनिफन्स व ८ आगस्टिन्स असे निरनिराळ्या पंथांचे लोक होते.

फ्रान्सिसकन पंथाच्या लोकांचें देवालय किंवा मठ आणि जेसूईट पंथाच्या लोकांचीं देवालयें यांच्या मध्यंतरीं डॉमिनिकन पंथाच्या लोकांचें देवालय आहे, व सान गोंकालो नांवाचा त्यांचा मठ आहे. ह्या दोन्ही इमारतींची हल्लीं पडापड झालेली आहे. देवालयाच्या कांहीं भित्ती, व त्याचा मनोरा एवढाच कायतो भाग हल्लीं उभा आहे. तसेंच त्या देवालयांतील मुख्य भजनाची जागाही अद्यापि बऱ्याच चांगल्या स्थितींत आहे. वर सांगितलेल्या मठाची स्थापना इ० स० १५८३ त झाली. या मठाचा हल्लीं पूर्ण नाश झालेला आहे. फ्रान्सिसकन व डॉमिनिकन लोकांच्या नाश पावलेल्या इमारती व किल्ल्याचा तट यांच्यामध्यें एक रस्ता आहे. या रस्त्यानें गेलें म्हणजे साम सेबास्टियन नांवाचा एक बुरूज लागतो. या बुरुजाला पूर्वीं एक चोरदरवाजा होता, तो हल्लीं बुजवून टाकलेला आहे. या बुरुजाच्या मुख्य दरवाज्यापाशीं एक शिला पडलेली आहे, तिच्यावर खालीं दिलेला लेख लिहिलेला आहे:—

"पोर्तुगाल देशाचा अति उच्च व बलाढ्य राजा तिसरा

डॉम जोआम याच्या कारकीर्दींत व्हिलारियलच्या मार्किसाचा पुत्र आलफन्सो डी नोरोन्हा हा सुभेदार असतां व फ्रान्सिस्को डीसा हा वसईच्या किल्ल्याचा कप्तान असतां हा साम सेबास्टियन नांवाचा बुरूज तारीख २२ फेब्रुवारी इ० स० १६५४रोजीं बांधला." इ०स० १७३९त मराठे लोक ज्या बुरुजांतून किल्ल्यांत घुसले तो हाच बुरूज.

हल्लीं वसईच्या किल्ल्यांतून समुद्राच्या बाजूस असलेल्या दरवाज्याकडे जाण्याकरितां नवीन रस्ता केलेला आहे. या रस्त्याला समांतर असा जुना रस्ता अद्यापि किल्ल्यांत कायम आहे. या रस्त्यानें निघालें म्हणजे त्याच्या दोन्ही बाजूंस पुष्कळ नाश पावलेल्या जुन्या इमारती दृष्टीस पडतात. हल्लीं त्या इमारतींच्या पडक्या भिंतींवरून वेली व दुसरीं झाडेंझुडपें वाढलेलीं आहेत. मराठ्यांचे हातीं हा किल्ला आल्यावर त्याचें वैभव कमी झालें. परंतु वर दिलेल्या वर्णनावरून हा किल्ला पोर्तुगीज अमलाखालीं असतां त्याचें वैभव काय असेल त्याची कल्पना सहज होण्यासारखी आहे.

साष्टी तालुका.

—:*:—

२४ **बेलापूरचा किल्ला**:—हा किल्ला पनवेलच्या पश्चिमेस ५मैलांवर पनवेलच्या खाडीच्या मुखाशीं बेलापूर नांवाच्या एक मैल लांब व एक मैल रुंद अशा बेटावर बांधलेला आहे. क्यापटन डिकिनसन यानें इ०स० १८१८त याचें असें वर्णन केलें आहे कीं, या किल्ल्याची उत्तरदक्षिण लांबी ४०० फूट व पूर्वपश्चिम रुंदी सुमारें २००फूट आहे. उत्तरेच्या बाजूस

खाडीपासून ८०० फूट अंतरावर व सुमारें ७५ फूट उंचीच्या उंचवट्यावर एक पडापड झालेला मेढेकोट आहे. त्याचप्रमाणें नदीच्या मुखाशीं सपाट जागेवर दुसरा एक मेढेकोट आहे व त्याच्या दोन्ही बाजूंस छाती इतक्या उंचीच्या मोडकळीस आलेल्या भिंती आहेत. हे दोन्ही मेढेकोट किल्ल्यांतील तोफांच्या माऱ्याच्या संरक्षणाखालीं बांधलेले आहेत. किल्ल्याची दर्शनी बाजू इ० स० १८१८ त अतिवृष्टि होऊन पडून गेली. त्या वेळीं किल्ल्यांत एक लहानशी झोपडी व एक विहीर एवढेंच कायतें शिल्लक राहिलें. किल्ल्याच्या आंतील भागाची सर्वत्र पडापड झालेली होती. बेलापूरचें बंदर किल्ल्यापासून सुमारें ९२ फूट लांबीवर असून त्याच्या संरक्षणाकरितां त्या बाजूनें तट घातलेला होता. त्या तटाला दोन बुरूज असून त्यांपैकीं एक ७० फूट उंचीचा होता, व त्याच्या एकंदर स्थितीवरून तो एक निराळाच लहानसा स्वतंत्र किल्ला होता असें म्हटलें तरी चालेल. त्याच्यावर जो मेढेकोट होता त्यावर खपरेल असून तो नीट दुरुस्त होता. बुरुजाच्या आकाराचीच एक जमिनींत जागा तयार केलेली होती व तिच्यांत कैदी लोक ठेवीत असत. तटबंदीच्या आंत येण्यास खाडीच्या बाजूनें एक दरवाजा ठेवलेला होता.

पोर्तुगीज लोकांच्या अमलाखालीं बेलापूर हा वसई प्रांताखालीं मोडणाऱ्या सात पेट्यांपैकीं एक पेटा होता, व त्याचे अमलांत एकंदर ६४ खेडीं होतीं. तारीख २३ जून इ० स० १८१७ रोजीं इंग्लिशांचा सरदार क्यापटन चार्लस ग्रे ह्यानें हा किल्ला घेतला.

२५ धारावी किल्ला.—हा किल्ला वसईच्या खाडीच्या मुखाशीं धारावी नांवाच्या बेटांतील एका टेकडीवर बांधलेला होता. हल्लीं या किल्ल्याची पडापड झालेली आहे. पोर्तुगीज लोकांचे वेळीं किल्ल्यांत एक चर्च होतें. इ० स० १७३९ त चिमणाजी आप्पानें पोर्तुगीज लोकांपासून हा किल्ला घेतला. इ० स० १८१८ त त्याचें स्वामित्व इंग्लिशांकडे गेलें. धारावी येथें उत्तम दगडाच्या खाणी आहेत. वसई प्रांतांतील बहुतेक किल्ले याच दगडाचे बांधलेले आहेत, व पोर्तुगीजांचे वेळीं ते वसईहून गोव्यांस घरें बांधण्याकरितां जो दगड नेत असत तो याच खाणीपैकीं होता. धारावी येथील डोंगरांत उत्तम पाण्याचे पुष्कळ झरे आहेत.

२६ परसिकचा किल्ला.—हा एक लहानसा किल्ला कल्याणच्या खाडीच्या मुखाशीं आहे. हल्लीं याची पडापड झालेली आहे. हा किल्ला पाण्यापासून सुमारें २५ फूट उंचीच्या चोहोंकडून सारख्या तुटलेल्या एका खडकावर बांधलेला आहे. किल्ल्यांत जाण्याचा दरवाजा खाडीच्या बाजूस असून वर चढण्यास खडक फोडून पायऱ्या तयार केलेल्या आहेत. या किल्ल्याची तटबंदी फार जुनी आहे असें म्हणतात. इ० स० १८१८ त या किल्ल्याची तटबंदी सर्व बाजूंनीं पडूं लागली होती. तटाची उंची १२ पासून २० फुटांपर्यंत होती, व नदीच्या अंगास मेढेकोट बांधलेला असून तेथें सहा तोफा ठेवितां येतील अशी व्यवस्था केलेली होती. बाकीच्या बाजूंनीं तटाला बंदुका मारण्याकरितां फक्त भोंकें ठेविलेलीं

होती. इ० स० १८८१ त या किल्ल्याचा मागमूसही शिल्लक राहिला नव्हता. त्याचे दगड काढून त्यांचा उपयोग बहुधा आगगाडीचा रस्ता बांधण्याकडे केला असावा असें क्यांबेल साहेब लिहितात. ठाणें स्टेशन सोडून पुढें गेलें म्हणजे जे दोन बोगदे लागतात ते परसीक डोंगरांतले आहेत. त्यांपैकीं एक १०३ यार्ड लांब, व दुसरा ११५ यार्ड लांब आहे.

२७ ठाण्याचा किल्ला.—हा किल्ला बांधण्यास पोर्तुगीज लोकांनीं इ० स० १७३० त सुरवात केली, व त्याचें काम अपुरें होतें तरी इ० स० १७३७ त मराठ्यांनीं या किल्ल्यावर हल्ला केला तेव्हां पोर्तुगीज लोकांनीं बरेच दिवस त्यांस दाद दिली नाहीं. परंतु पुढें तो मराठ्यांचे हातांत गेला व त्यांनीं त्याच्या तटबंदीचें काम पुरें केलें. त्याचा तट १६ फुटांपासून २१ फुटांपर्यंत उंच होता व त्याला मधून मधून पुष्कळ बुरूज व मेढेकोट होते. किल्ल्यांत एकंदर १३॥ एकर जागा होती. इ० स० १७३८ त पेड्रो डी लो नांवाचा पोर्तुगीज सरदार बरोबर ५००० युरोपीयन व ४००० बाटे लोक घेऊन ठाण्याचा किल्ला घेण्याकरितां आला. त्यानें प्रथमतः आशिरीच्या किल्ल्यावर हल्ला करून मराठ्यांचे मेढेकोट पाडून टाकिले, व तो ठाण्याच्या किल्ल्यावर चाल करून आला. परंतु मुंबईच्या इंग्लिशांच्या गव्हरनरानें ह्या गोष्टीची बातमी मराठ्यांस अगोदरच दिली होती. तेव्हां पहिले बाजीराव पेशव्यानें मल्हारराव होळकरास सैन्यासह ठाण्यास पाठवून दिलें. पोर्तुगीज सरदार डान आन्टोनिओ फ्रॉयस यानें

ठाण्याच्या किल्ल्यावर हल्ला केला. परंतु मल्हारराव होळकरानें त्यास मागें हटविलें. इतक्यांत फ्रॉयस साहेब गोळी लागून पडला व पोर्तुगीज सैन्य पळून गेलें. पुढच्या वर्षीं (इ. स. १७३९) चिमणाजी आप्पानें वसई घेतली, त्यामुळें पोर्तुगीज लोकांची उत्तर-कोंकणांतील सत्ता नाहींशी झाली. तेव्हां वसई व ठाणें येथील श्रीमान पोर्तुगीज लोक आपले मोठमोठाले वाडे सोडून देऊन गोवें व मुंबई येथें जाऊन राहिले. मराठ्यांनीं पोर्तुगीज बाटे लोकांस मुळींच उपद्रव दिला नाहीं, व ते मराठ्यांचे अमलाखालीं बिनधास्त रीतीनें राहत असत असें डफ साहेब लिहितात.

इ. स. १७७१ त ठाणें व वसई मराठ्यांपासून परत घेण्याकरितां पोर्तुगीज लोकांचें आरमार येत आहे अशी बातमी इंग्लिशांस कळतांच त्यांनीं आपणास ठाणें द्यावें असें बोलणें लावण्याकरितां पेशव्यांचे दरबारीं आपला वकील पाठविला. पेशव्यांनीं ती गोष्ट कबूल केली नाहीं. तेव्हां जोरानें तो किल्ला घेण्याचा इंग्लिशांनीं निश्चय केला. ता. १२ दिजंबर १७७४ रोजीं जनरल राबर्ट गारडन साहेब बरोबर ६०० इंग्लिश लोक व १२०० काळे लोक घेऊन मुंबईहून निघाला व ठाण्यास आला. त्यानें तारीख २० रोजीं किल्ल्यावर आपला तोफखाना सुरू केला व ता० २४ रोजीं किल्ल्याच्या तटास खिंडार पाडिलें. ता० २७ रोजीं इंग्लिशांनीं किल्ल्यासभोंवतालचा खंदक भरून काढण्याचा प्रयत्न चालविला. परंतु मराठ्यांनीं त्यांस मागें हटविलें. त्या वेळीं १०० युरोपियन लोक ठार झाले. दुसऱ्या दि-

वर्शी इंग्लिशांनीं हल्ला करून किल्ला सर केला, व आंतील बहुतेक शिबंदीस ठार मारिलें. या लढाईत इंग्लिशांच्या आरमाराचा सरदार कमोदर वाटसन हा तोफेचा गोळा लागून मरण पावला. नंतर इंग्लिशांनीं किल्ल्याच्या सभोंतालचीं घरें पाडून टाकिलीं, व बागायत तोडून टाकिलें, व किल्ल्याची नीट दुरुस्ती केली. मराठ्यांचे वेळीं किल्ल्यावर एकंदर १०० तोफा असत. गंगाधर शास्त्री पटवर्धन याचा खून करणारा दुसरे बाजीराव पेशव्याचा मंत्री त्रिंबकजी डेंगळे यास इ. स. १८१६ त इंग्लिशांनीं ठाण्याचे किल्ल्यांत कैदेंत ठेविलें, व त्याच्यावर युरोपियन लोकांचा पहारा ठेविला. परंतु बाजीरावाच्या मदतीनें त्यानें इंग्लिशांच्या हातावर तुरी दिल्या व तेथून तो पळून गेला. इ० स० १८३३ पर्यंत या किल्ल्यांत इंग्लिशांचे फौजेचें ठाणें होतें. पुढें त्यांनीं तो किल्ला पाडून टाकिला, व ती जागा तुरुंगाकरितां तयार केली.

२८ **वरसोवाः**—हा किल्ला वरसोवा खेडें व माढ बेट यांच्यामध्यें खाडीच्या मुखाशीं आहे. तो साधारण उंचवट्यावर बांधलेला आहे. हा किल्ला बहुधा पोर्तुगीज लोकांनीं बांधला असावा, व मराठ्यांनीं त्याची दुरस्ती केली असावी असें अनुमान होतें. इ. स. १६९५ त गेमेली क्यारेरी यानें या किल्ल्याचें वर्णन केलेलें आहे. इ. स. १७२८ त याच्या संबंधानें असा लेख सांपडतो कीं, हा किल्ला जुना असून मोडकळीस आलेला आहे. आंत ५० शिबंदी आहे, व दहा तोफा आहेत. त्यांपैकीं फक्त २ उपयोगाच्या आहेत. इ० स० १७८७ त डाक्तर डोव्ह साहेब यानेंही या कि-

ल्याचें वर्णन केलेलें आढळतें. तो ह्मणतो कीं, 'समुद्राच्या बाजूनें खडक असल्यामुळें हा किल्ला सर करण्यास फार अवघड आहे.' जमिनकिडच्या बाजूनें किल्ल्याची विशेष मजबुती केलेली नव्हती.

इ० स० १६५९ त सुरत येथील इंग्लिशांच्या काउन्सिलांतील मंडळीनें हिंदुस्तानांत स्वतःच्या अमलाखालचें असें एक ठाणें पाहिजे अशा उद्देशानें कोर्ट आफ डायरेक्टर्स यांस असें लिहिलें कीं, "काय पाहिजे तें होऊं द्या, परंतु हिंदुस्तानांत पोर्तुगीज लोकांच्या अमलापैकीं दंडाराजपुरी, मुंबई किंवा वरसोवा यांपैकीं एक ठिकाण पोर्तुगालच्या राजापासून मिळवा." इ० स० १६९४त मस्कत येथील अरब लोक वरसोवा येथें उतरले, व त्यांनीं तेथील लोकांची कत्तल केली. इ०स० १७३९ त मराठ्यांनीं तो किल्ला, पोर्तुगीज लोकांपासून जिंकून घेतला. इ० स० १७७४ त कर्नल कीटिंग यानें वरसोवा मराठ्यांपासून घेतला. इ० स० १८०० पासून १८७४ पर्यंत इंग्लिशांचा तेथें तोफखाना होता; व इ० स० १८१८ पर्यंत इंग्लिशांची कांहीं फौजही तेथें राहत असे.

२९ जिवधनचा किल्ला.--जिवधन नांवाची टेकडी विरार स्टेशनाच्या पूर्वेस एक मैलावर असून तिच्या माथ्यावर पूर्वीं एक किल्ला बांधलेला होता. त्याची हल्लीं पडापड होऊन गेली आहे. किल्ल्यांत कांहीं जुनीं भुयारें व टांकीं आहेत. यांना पांडवकृत्यें असें ह्मणतात. पर्जन्यकाळ शिवाय करून इतर काळीं आसपासच्या खेड्यांतील मंडळी व विशेषतः स्त्रिया या तळघरांत आपले नवस फेडण्या-

करितां जातात. त्यांच्या संबंधानें अशी दंतकथा आहे कीं, पूर्वीं एका तळघराच्या कोनाड्यांत देवीची मूर्ति बसविलेली होती. परंतु तिला महाराचा विटाळ झाला तेव्हां ती तेथेंच अदृश्य झाली. या कोन्हाड्याला एक छिद्र आहे व त्यांत जाऊन ती देवी बसली आहे, अशी तिकडील भोळ्या लोकांची समजूत झाली आहे, व त्यांना जो नवस फेडावयाचा असेल तो ते या छिद्राजवळ फेडतात. या किल्ल्याच्या संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

३० **कामनदुर्ग.**- हा किल्ला तुंगारच्या डोंगराच्या अगदीं दक्षिणेकडच्या टोंकावर एका २१६० फूट उंचीच्या टेंकडीवर कामन नांवाच्या खेड्याशेजारीं बांधलेला आहे. हल्लीं त्या किल्ल्याचा कांहीं थोडा भाग अवशेष राहिलेला आहे. या टेंकडीवर ट्रिग्नामेटिकल सर्वेचें ठाणें असतें. याच्या संबंधानें इतिहासप्रसिद्ध अशी गोष्ट उपलब्ध नाहीं.

वाडें तालुका.

—:*:—

३१ **कोंजचा किल्ला**:—हा किल्ला वाडयांच्या पश्चिमेस १० मैलांवर एका १९०१ फूट उंचीच्या टेंकडीवर बांधलेला आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता दोन सुळक्यांच्या मध्यें एक दरी आहे तिच्यांतून आहे. हा किल्ला इ० स० १६९२ त मराठ्यांनीं बांधला अशी दंतकथा आहे. इ०स० १८१८ त या किल्ल्याची स्थिति पुढें दिल्याप्रमाणें होती:— वरच्या किल्ल्याच्या दक्षिणेकडच्या बाजूस सुमारें ४०० याडींवर त्याचे माऱ्यांत असा एक दरवाजा होता. त्याच्या

दोन्ही बाजूंस तट घातलेला असून तो डोंगराच्या सुळक्यापर्यंत बांधलेला होता. हा दरवाजा व वरचा किल्ला यांचे निमे अंतरावर बाहेरच्या कोटाच्या कांहीं खुणा होत्या. पश्चिमेच्या बाजूस वरच्या किल्ल्याचेखालीं सुमारें १५० पासून २०० फुटांवर खालच्या सपाट प्रदेशावर उतरण्याकरितां पूर्वीं रस्ता होता अशा बद्दलच्या खुणा होत्या. त्या वेळीं तो रस्ता उपयोगांतून गेलेला होता. वरच्या किल्ल्यावर जाण्याचा रस्ता फार उभा होता, व तो वरच्या किल्ल्याचे माऱ्यांत होता. वरच्या किल्ल्याचा माथा ४०० यार्ड लांब व साधारण ४० यार्ड रुंद होता. टेंकडीच्या सभोंवार बहुतेक तुटलेला कडा असल्यामुळें फक्त दक्षिण व पश्चिम या बाजूंस मात्र तटबंदी केलेली होती; व जागेच्या सवघड व अवघड मानाप्रमाणें तटाची उंची १० फुटांपासून २० फुटांपर्यंत होती. तटबंदीच्या एकंदर स्थितीवरून तिची पुष्कळ वर्षांत दुरस्ती केलेली नव्हती असें दिसत होतें. बहुतेक ठिकाणचा तटाचा चुना धुवून गेलेला होता, व तटाच्या भिंती जेमतेम जीव धरून उभ्या होत्या. किल्ल्यांत साधारण महत्त्वाच्या इमारती ह्मटल्या म्हणजे एक धान्याची कोठी, एक खजिन्याची कोठी, व शिबंदीकरितां बांधलेली एक इमारत इतक्या होत्या. किल्ल्यांतील मंडळीस पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून वरच्या किल्ल्याचे पश्चिमेस सपाट जागेवर खडकांत नऊ टांकीं खोदलेलीं होतीं, व दहावें टांकें दरवाज्याच्या बाहेरच्या अंगास होतें. इ० स० १८६२ त या किल्ल्याची सर्वत्र पडापड झालेली होती. किल्ल्यांत पाण्याचा पुरवठा होता, परंतु

आसपास धान्यसामग्री वगैरे पोटगीचे जिन्नस मिळण्याची फार मारामार होती. या किल्ल्याचे संबंधानें प्रसिद्ध अशी एखादी गोष्ट इतिहासांत मिळत नाहीं.

भिवंडी तालुका.

—:*:—

३२ गूमतरा किल्ला:—हा किल्ला भिवंडी तालुक्यांत टकमक नांवाच्या किल्ल्याच्या दक्षिणेश १९ मैलांवर दुगड नांवाच्या गांवाशेजारीं १९४९ फूट उंचीच्या एका टेंकडीवर बांधलेला आहे. ज्या टेंकडीवर हा किल्ला बांधलेला आहे, ती स्वतःसिद्धच अतिशय अवघड आहे. ज्या ठिकाणीं शत्रु वर चढून येण्याची भीति होती, तेथें तटबंदी घालून नीट बंदोबस्त केलेला होता. परंतु इ० स० १८१८ त ह्या तटबंदीचा पुष्कळ ठिकाणचा भाग कोसळून गेला होता, व पुष्कळ ठिकाणीं फक्त दगडांच्या राशी पडलेल्या होत्या. किल्ल्याचा दरवाजा टेंकडीच्या माथ्यापासून ४०० फूट उंचीवर एका अरुंद व एक सारख्या तुटत गेलेल्या अशा वहाळीच्या तोंडाशीं होता. हल्लीं या ठिकाणीं मात्र तटबंदीचा कांहीं थोडा अवशेष भाग दृष्टीस पडतो. ह्या दरवाज्याशेजारीं खडकांत खोदलेलीं ७ पाण्याचीं टांकीं आहेत. पूर्वीं गडकरी लोकांस पाण्याचा पुरवठा या टांक्यांपासून होत असे.

शहापूर तालुका.

—:*:—

३३ भोपटगड:—हा किल्ला शहापूर तालुक्यांत माहुली-

च्या उत्तरेस पंचवीस तीस मैलांवर, व मोखाड्याच्या नैऋत्येत सुमारें ८ मैलांवर एका सातशें फूट उंचीच्या टेंकडीवर बांधलेला आहे. हा कुरलोट नांवाच्या खेड्यांत मोडतो. याची लांबी १५०० फूट व रुंदी ३०० फूट आहे. टेंकडीच्या पायथ्यापासून किल्ल्यांत येण्याचा रस्ता २ मैल लांबीचा आहे. इ० स० १८१८ त ह्या किल्ल्याची बहुतेक पडापड झालेली होती. फक्त आग्नेईच्या कोपऱ्याजवळ तटबंदीचा कांहीं भाग शिल्लक होता. तसेंच किल्ल्याचा दरवाजा व त्याच्या दोन्ही बाजूंचे बुरूज शिल्लक होते. परंतु ह्या बुरुजांवर पडभिंत वगैरे कांहीं नव्हतें; व माथ्यावर एका उंच ठिकाणीं सुमारें १० फूट उंच व ६॥ फूट जाड असा एक लहानसा बुरूज होता. त्रिंबकाहून वाड्यांस जो रस्ता येतो त्यानें आलें तर हा किल्ला दृष्टीस पडतो.

३४ **माहुलीचा किल्ला.**—हा किल्ला शहापूर तालुक्यांत शहापूरच्या वायव्येस सुमारें ४ मैलांवर माहुली नांवाच्या डोंगरावर बांधलेला आहे. या डोंगराची उंची २८१५ फूट आहे. या डोंगराच्या दक्षिणेकडील टोंकास एक सुमारें ८०० फूट खोल अशी भयंकर दरी आहे. किल्ल्यावर जाण्याचा जुना रस्ता पूर्वेच्या बाजूस माची नांवाच्या खेड्यावरून होता. त्याचा दरवाजा एका तुटलेल्या दरीच्या तोंडाशीं आहे, व ह्या दरीच्या माथ्यावर दरवाजाच्या रक्षणार्थ ह्मणून जी भिंत घातलेली आहे, ती अद्यापि आतिशय मजबूत आहे. हा किल्ला मोंगलांनीं असें सांगतात. त्याच्या माथ्यावर एक मशीद

आहे, व नमाज पढण्याची जागा आहे. हल्लीं ह्या दोन्ही इमारतींची पडापड झालेली *आहे. टकमक किंवा मलंगगड या किल्ल्यांप्रमाणें या किल्ल्याच्याही सभोंवार पांच-सहाशें फूट खोल एकसारखा तुटलेला कडा आहे. दक्षिणेच्या बाजूस एक मोठी भेग आहे. ही पूर्वीं तुरुंगाची जागा होती. एकदा आंत मनुष्य गेलें म्हणजे त्याला मुळींच वर चढतां येत नसे, व यदाकदाचित् वर चढलेंच तर वरच्या टोकांवरून खालीं उडी टाकणें म्हणजे आपण होऊन मृत्यूला पदरीं बांधून घेण्यासारखें होतें.

इ० स० १८१८ त क्यापटन डिकिनसन यानें या किल्ल्याचें असें वर्णन केलें आहे कीं, "हा किल्ला २५०० फुटांहून जास्त उंचीच्या एका टेंकडीवर बांधलेला असून तो ठाणें जिल्ह्यांतील सर्व किल्ल्यांहून उंच आहे. ह्या टेंकडीला तीन शिखरें असून त्यांना तटबंदी केलेली आहे. उत्तरेकडील शिखराला पळसगड, मध्यशिखराला माहुली, व दक्षिणेकडील शिखराला भंडारगड असें ह्मणतात. या तिहींत माहुलीचा किल्ला मोठा आहे.ह्मणजे तो सुमारें अर्धा मैल लांब व जवळ जवळ तितकाच रुंद आहे. या किल्ल्याला पाण्याचा पुरवठा फार चांगला आहे, व आंतील जमीनही फार उत्तम आहे. किल्ल्याची चढण फारच अवघड आहे. माथ्याजवळची चढण एका भयंकर दरींतून आहे. या दरीच्या माथ्याशीं एक अतिशय मजबूत दरवाजा आहे.

---

* ज्यांना हल्लीं नाशीकचे नवाब असें ह्मणतात त्यांचें कुटुंब पूर्वीं भिवंडी येथें राहत असे. त्या कुळांतील पुरुषांकडे पूर्वीं या किल्ल्याची व्यवस्था होती; व त्या संबंधाची सनद अद्यापि त्यांचेपाशीं आहे.

त्याच्या दोन्ही बाजूंस दोन व माथ्यावर एक असे बुरूज आहेत, व दरवाज्याच्या भिंती तशाच बाहेरच्या बाजूस तुटलेल्या कडच्यापर्यंत वाढवीत नेलेल्या आहेत. दरवाज्याच्या जरा पलीकडे टेंकडीच्या माथ्यावर एका उंचवट्याच्या जागेवर एक बुरूज आहे, त्याला परथळगड असें म्हणतात. हा बुरूज अतिशय ठेंगणा असून हल्लीं नादुरुस्त आहे. उत्तरेस पळसगड व दक्षिणेस भंडारगड येथें या किल्ल्यावरून जातां येतें. फक्त मध्यंतरी लहानशा दरी आहेत. खालच्या सपाट प्रदेशाकडून फक्त पळसगडावर जातां येतें. माहुली व भंडारगड या किल्ल्यांत कांहीं इमारती आहेत, परंतु त्यांची दागदुजी केली पाहिजे. पळसगड, व दुसऱ्या ठिकाणची तटबंदी कोसळत चालली आहे. इ० स० १८६२ त ह्या किल्ल्याची सर्वत्र पडापड झालेली होती व कालांतरानें पूर्वी येथें किल्ला होता किंवा नाहीं याचीच शंका उत्पन्न होईल असें वाटतें.

इ. स. १४८९ त अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचा मूळ पुरुष मालिक अहमद यानें कोंकणांतले पुष्कळ किल्ले सर केले,त्या वेळीं माहुलीचा किल्लाही त्याचे हातीं आला. इ. स. १६६१ त शिवाजीनें हा किल्ला मोंगलांपासून सर केला. शहाजीचे वेळीं शिवाजीची मातुश्री जिजाबाई शिवाजीसह मधून मधून या किल्ल्यावर राहत असे. नंतर शिवाजीनें इ. स. १६६५ त जयसिंगाशीं जो तह केला त्या अन्वयें त्याचें स्वामित्व फिरून मोंगलांकडे गेलें. पुढें मोंगलांचा व शिवाजीचा बेबनाव झाल्यावर इ. स. १६७० त शिवाजीनें मोरोपंत पिंगळे

पेशवे यास तो किल्ला घेण्याकरितां पाठवून दिलें. मोरोपंत दोन महिनेपर्यंत या किल्ल्यास वेढा घालून बसला होता, व तितक्या अवकाशांत त्याचें नुकसानही बरेंच झालें. तथापि शेवटीं त्यानें तो किल्ला सर केला. तेव्हांपासून इ. स. १८१७ त पुणें येथें इंग्लिश व पेशवे यांच्यामध्यें जो तह झाला तोंपर्यंत त्याचें स्वामित्व मराठ्यांकडे होतें. पुढें तो इंग्लिशांचे हातीं गेला. इंग्लिशांचे हातीं आल्यापासून हा किल्ला ओसाड स्थितींत आहे.

३५ बळवंतगड—हा किल्ला शहापूरच्या ईशान्येस थोड्या मैलांवर विहीगांव नांवाच्या खेड्यांत मोडतो. ज्या टेंकडीवर हा किल्ला बांधलेला आहे, त्याची उंची १००० फूट आहे. पूर्वीं या किल्ल्यावरून तळघांटावर चांगला मारा लागू पडत असावा असें वाटतें. किल्ल्याचा तट दगड व चुना यांनीं बांधलेला असून त्याची उंची ६ पासून १० फुटांपर्यंत व रुंदी सुमारें ८ फूट आहे. तटाची एकंदर लांबी सुमारें एक मैल आहे. किल्ल्यांत एक मोठी इमारत, व दुसरें एक लहानसें घर यांच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात. हल्लीं हा किल्ला बहुतेक मोडकळीस आलेला आहे. ठाणें जिल्ह्यांतील बहुतेक किल्ल्यांप्रमाणें ह्या ठिकाणीं मोंगल, मराठे, किंवा इंग्लिश यांचे कारकीर्दींत एखादी विशेष महत्त्वाची गोष्ट घडून आल्याचा दाखला कोठेंही उपलब्ध नाहीं.

मुरबाड तालुका.

—:※:—

३६ बहिरवगड:—ह्या किल्ल्याला बैराम असेंही म्ह-

णतात. हा किल्ला मुरबाड तालुक्यांत मुरबाडच्या पूर्वेस २२ मैलांवर मोरोशी नांवाच्या खेड्या शेजारीं नाणें घाटाच्या कांहींसा ईशान्येस सह्याद्रीच्या एका १०० फूट उंचीच्या फांट्यावर बांधलेला आहे. किल्ल्याचा पायथा फारच अरुंद आहे, व त्याची १०० फूट चढण फार अवघड आहे. चढावाच्या ४० पायऱ्या सरळ उंच होत्या व त्या दगड खोदून तयार केलेल्या होत्या. ह्या पायऱ्यांवर २७ फुट उंचीची एक भक्कम लांकडी शिडी लाविलेली होती. ही शिडी वरच्या अंगास लोखंडी सांखळदंडानें बांधलेली होती. या शिडीच्या माथ्यावर आलें म्हणजे तिच्या वरचा रस्ता तळाजवळच्या पायऱ्यांप्रमाणेंच खडक फोडून तयार केलेला होता, व मध्यंतरीं एक अवघड व भयंकर चोरदरवाजा होता. वर सांगितलेली लांकडी शिडी इ० स० १८१८ त क्यापटन डिकिन्सन यानें मोडून टाकिली. त्या वेळीं त्या साहेबानें ता० ६ जानेवारी इ. स. १८१८ रोजीं एका इंजीनियरास पत्र लिहिलें त्यांत तो असें लिहितो कीं " मी बैरामगड येथें असतां पेशवा (बाजीराव) बऱ्याच फौजेसह जवळपास येऊन पोहोंचला आहे अशी बातमी मला समजली. किल्ल्याला वेढा देण्याकरितां जे लोक पाठविलेले होते ते किल्ल्याच्या पायथ्याशीं होते, त्यांना वर जातां येईना. तसेंच बाजीरावाचे बेत काय होते त्यांचाही अजमास लागेना, तेव्हां किल्ल्यावर जाण्याकरितां ३० फूट उंचीची जी भक्कम शिडी होती ती मोडून टाकावी असें मला वाटलें, व त्याप्रमाणें मीं केलें. हा किल्ला एका निमुळत्या होत गेलेल्या उंच शिखरावर बांधलेला आहे. शेजारच्या खेड्यापाड्यांतून निरनिराळ्या

प्रकारचीं हत्यारें गोळा करून शिडीच्या खालीं ज्या पायऱ्या होत्या त्या मी पाडून टाकल्या. ह्या पायऱ्या एका ४० फूट उंचीच्या खडकांत खोदलेल्या होत्या, व त्या अगदीं उभ्या होत्या. "

ह्या किल्ल्याच्या दोन्ही बाजूंस खोल दऱ्या आहेत व याच्या आसपासचा प्रदेश अगदीं मोकळा आहे. या किल्ल्याच्या पिछाडीस सह्याद्रिचीं जीं अगम्य किंवा दुर्गम शिखरें आहेत त्यांवर येथून जातां येत असे. टेंकडीच्या माथ्यावर एक तळें आहे, व आंत राहण्याकरतां ह्मणून खडकांत खोदलेल्या कांहीं कोठड्या आहेत. खालच्या सपाट प्रदेशांत कांहीं घरें होतीं व तेंथें शिबंदी राहत असे. तसेंच तेथें दोन पाण्याचे झरे होते, त्यांचे पाणी शिबंदीस पुरत असे. या किल्ल्याची अवघड चढण व त्याच्या माथ्यावरील प्रदेश यांची स्थिति लक्ष्यांत आणिली म्हणजे हा किल्ला कधींच सर करतां यावयाचा नाहीं असें दिसून येईल. इ० स० १८६२ त याची सर्वत्र पडापड झालेली होती. महत्त्वाची अशी ऐतिहासिक गोष्ट येथें घडून आल्याचें आढळून येत नाहीं.

३७ गोरखगडः—हा किल्ला मुरबाडच्या आग्नेयीस सुमारें १२ मैलांवर, व सिदगडापासून सुमारें २ मैलांवर खोपवली घांटाच्या पायथ्याशीं सह्याद्रीच्या एका बाहेर झुकलेल्या ४०० फूट उंचीच्या खडकावर बांधलेला आहे. ह्या किल्ल्याचें क्याप्टन डिकिनसन यानें इ० स० १८१८ त जें वर्णन केलें आहे, त्यावरून पूर्वी या किल्ल्याचे वरचा किल्ला व खालचा किल्ला असे दोन भाग होते असें दिसतें. टेंकडीच्या पायथ्यापासून वर जाऊं लागलें ह्मणजे पहिला

१०० फूट चढाव बराच बिकट आहे, म्हणजे कांहीं ठिकाणीं केवळ शीर हातावर घेऊन तुटलेल्या भयंकर कडयांच्या अगदीं कांठावरून जावें लागतें. हा चढाव जेथें संपतो तेथें पूर्वीं पहिला दरवाजा होता. याच्या मागच्या बाजूस खडकांत आंतून खोदलेला बोगद्याप्रमाणें एक जिना लागतो. ह्या जिन्याच्या माथ्याशीं पूर्वीं दुसरा दरवाजा होता, व त्याच्यावर कांहीं पाण्याचीं टाकीं व कांहीं झोपडीं होतीं. येथून पहिल्याहून बिकट व भयंकर असा दुसरा ३०० फुटांचा चढाव लागतो. हा चढून वर गेलें ह्मणजे एक १० १६ फूट रुंदीचा माळ लागतो. येथें खडकांत खोदलेलीं कांहीं मोठमोठीं टांकीं व सामान सुमान ठेवण्याकरितां म्हणून कांहीं भुयारें आहेत. या भुयारांवरील खडकाची उंची सुमारें १०० फूट आहे. येथून वर माथ्यावर जाण्याचा रस्ता फारच बिकट आहे. हा रस्ता अरुंद असून अगदीं उभा आहे, व तो खडक फोडून तयार केलेला आहे. हा वरचा किल्ला हल्ला करून कधींच घेतां येणार नाहीं. असें डिकिनसन साहेबांचें मत होतें. इ० स० १८६२ त याची पडापड झालेली होती. वर पाणी होतें, परंतु जवळपास धान्यसामग्री मिळण्याची फारच पंचाईत होती. येथें ज्या गुहा व जीं टांकीं खोदलेलीं, आहेत त्यांवरून प्राचीन काळीं तेथें जैन लोकांची वस्ती असावी असें अनुमान होतें.

३८ नळदुर्गः--हा किल्ला मुरबाडच्या आग्नेयीस सुमारें ९ मैलांवर नारिवली नांवाच्या खेड्यांत मोडतो. तो सह्याद्रीच्या एका फांट्यावर बांधलेला आहे. इ. स. १८६२ त त्याची सर्वत्र पडापड झालेली होती.

३९ सिद्‌गड:—हा किल्ला मुरबाडच्या अग्नेयीस ९० मैलांवर आहे. या किल्ल्याचे आंतला व बाहेरला असे दोन भाग आहेत. बाहेरचा किंवा खालचा किल्ला गायधरा घांटाच्या वर ९०० फूट उंच आहे, व समुद्राच्या सपाटी-पासून २४०० फूट उंच आहे. त्याचा तट विशेष उंच नसून त्याची दागदुजीही नीट रीतीनें केलेली नव्हती. वरच्या किंवा आंतल्या किल्ल्यावर जाण्यास या खालच्या किल्ल्यास फक्त एकच दरवाजा आहे. वरचा किल्ला समुद्राच्या सपाटीपासून ३२३६ फूट आहे, व खालच्या किल्ल्यापेक्षां ९०० फूट उंच आहे. वर जाण्याचा रस्ता फार अवघड आहे. ह्याची लांबी २४९ फूट व रुंदी ७५ फूट आहे. हा किल्ला एका सुमारें सवा मैल लांबीच्या टेंकडीच्या एका अरुंद शिखरावर बांधलेला आहे. याच्या प्रत्येक बाजूस तुटलेला कडा आहे. इ. स. १८१८ त ह्या किल्ल्याची बहुतेक पडापड झालेली होती. फक्त एक लहानशी भिंत शिल्लक राहिलेली होती, व तिचीही पडापड सुरू झालेली होती; जागोजाग कांटेरी झाडेंझुडपें उगवलेलीं होतीं, व आंत पूर्वीं एखादी इमारत होती किंवा नव्हती याचा पत्ताही लागत नव्हता. जरी या वरच्या किल्ल्याची पडापड झालेली होती, तरी त्याची चढण फारच बिकट असल्यामुळें, व तो सुळक्यासारखा उंच असल्यामुळ त्यावर जाण्याचें काम फारच मुष्किलाच होतें. किल्ल्याचे माथ्यावर पडापड झालेल्या भिंताडांच्या शेजारीं खडकांत खोदलेलीं पुष्कळ टांकीं आहेत, व त्यांचें पाणीही फार उत्तम आहे. खालच्या किल्ल्यालाही पाण्याचा पुरवठा फार चांगला आहे. इ० स० १८१८ त या किल्ल्यांत एक

धान्याची कोठी, व शिपायांकरितां बांधलेली इमारत व दुसरीं लहान लहान घरें होतीं, व तीं नीट दुरुस्त होतीं. इ० स० १८६७ च्या सुमारास भिवाजी नाईक नांवाचा एक पुंड या किल्ल्यांतील एका गुहेंत राहूं लागला. या अट्टल चोरानें पोलीस लोकांस अगदीं भंडावून सोडलें होतें. किल्ल्याचे पायथ्याशीं नांदगांव म्हणून एक खेडें आहे, तेथच्या एका न्हाव्याच्या बायकोस त्यानें पळवून नेलें होतें. या बाईचें नांव आवडी असें होतें, व तो तिच्यासह वर सांगितलेल्या गुहेंत राहत असे. तो तेथें बरेच महिने होता. तथापि पोलिसास त्याची दाद लागली नाहीं. त्यानें हरी या नांवाचा एक मनुष्य आपल्या नौकरीस ठेविला होता; व तो बाहेर पडला म्हणजे आवडीच संरक्षण करण्याकरितां तो त्याला नेहमीं तिच्याजवळ ठेवीत असे. पुढें कांहीं कारणावरून हरीच्या वर्तणुकीच्या संबंधानें त्याला मत्सर उत्पन्न होऊन त्यानें त्या गरीब बिचाऱ्या मनुष्याला किल्ल्याच्या कडयावरून खालीं ढकलून दिलें. पुढें तो म्हासें नांवाच्या शेजारच्या खेडयांत लग्नाकीरतां गेला होता, तेथें मागचा पुढचा विचार न पाहतां तो यथेच्छ दारू प्याला व त्या स्थितींत बेशुद्ध पडला. त्या गांवच्या लोकांनांहीं त्यानें फार त्रास दिला होता. त्यामुळें त्यांनीं त्याला लगेच कैद केलें, व ते त्याला मुरबाड येथें घेऊन आले. तो मुरबाडास आला त्या वेळीं तो अर्धमेला झालेलाच होता, व पुढें लौकरच तो मरण पावला. मरणाचें पूर्वीं त्यानें आपला सर्व वृत्तांत सांगितला; त्यावरून पोलीसचे लोक सिदगडावर गेले, व

त्यांनीं आवडीस धरून आणिलें. तसेंच चोरीचा बराच माल त्या ठिकाणीं पोलिसास मिळला. ज्या कडयावरून हरीला ढकलून दिलें ह्मणून त्यानें सांगितलें त्या ठिकाणीं जातां, लोकांना त्या बिचाऱ्याचा सांगाडा मात्र सांपडला. इ० स० १८६२ त एकंदर किल्ल्यांची जी पाहणी झाली, त्या वेळीं "हा किल्ला हल्लीं मोडून गेला आहे" असा या किल्ल्यावर शेरा दिलेला आहे. वर सांगिलेल्या गोष्टीशिवाय दुसरी एखादी ऐतिहासिक गोष्ट या किल्ल्याचे संबंधानें उपलब्ध नाहीं.

कल्ल्याण तालुका.

—:*:—

४० **कल्ल्याणचा किल्ला**:–कल्ल्याण हें शहर कल्ल्याण तालुक्याचें मुख्य ठाणें आहे. तें मुंबईच्या ईशान्येस ३३ मैलांवर कल्ल्याणच्या खाडीच्या कांठीं आहे. पुण्याहून जाणारी आगगाडी व नाशिकाहून येणारी आगगाडी या कल्ल्याण येथें येऊन मिळतात.

शहाजहान बादशाहाचे कारकीर्दींत (इ० स० १६२८–१६५८) त्याचा सरदार नबाब मोहतवारखान यानें कल्ल्याणच्या सभोंवार दगडी तट बांधण्याचें काम सुरू केलें. तो तट पुढें औरंगजेब बादशाहाचे कारकीर्दींत इ० स० १६९४ त पुरा झाला. त्या तटाला एकंदर ११ बुरूज व ४ दरवाजे होते, व त्याचें क्षेत्रफळ ७० एकर होतें. या तटाच्या ईशान्येस कोपऱ्यावर खाडीच्या किनाऱ्यास एका उंचवट्याच्या जागीं एक दुसरा किल्ला बांधलेला होता. प्रथमतः हा किल्ला शहरापासून अलग होता. नंतर त्या दोहोंच्यामध्यें एक २०० फूट लांब

व जवळजवळ तितकीच रुंद अशी अर्धवर्तुलाकृति भिंत बांधली. किल्ल्याच्या वायव्य कोपऱ्यास जुन्या तटाच्यावर सुमारें ३० फूट उंचीच्या धक्क्यावर एक मुसलमानाचें थडगें, एक नमाज पढावयाची जागा व दुसरीं कांहीं घरें होतीं.

शहराचा तट एकंदर २१३३ यार्ड लांब होता. त्याच्या ११ बुरुजांपैकीं ४ बुरूज फार मोठे होते. या चोहोंपैकीं एक ईशान्य कोपऱ्यावर होता, दुसरा पूर्वेकडील बाजूच्या मध्यावर होता, तिसरा आग्नेयी कोपऱ्यावर होता, व चवथा जेथें गलबतें लागतात तेथें होता. चार दरवाज्यांपैकीं अधार दरवाजा हा उत्तरेकडील तटाच्या मध्यभागीं होता. ह्या बाजूस अधार नांवाचें खेडें आहे, त्यावरून त्याला अधार दरवाजा असें नांव पडलें होतें. दुसरा गणेश दरवाजा हा पूर्वेकडील तटाच्या मध्यावर होता, तिसरा पनवेल दरवाजा हा दक्षिणेकडील तटाच्या मध्यावर होता, व चवथा बंदर दरवाजा हा पश्चिमेकडील तटाच्या मध्यावर होता. किल्ला व शहर यांच्यामध्यें खंदक होता. किल्ल्याचा दरवाजा किल्ल्याच्या उत्तर टोंकास होता. त्याला दिल्लीदरवाजा असें म्हणत असत. किल्ल्यांत जाण्याला शहराच्या उत्तरेकडील तटाकडून वाट होती. किल्ल्याचे आंतील जागा खोलगट होती, व एक उथळ असें लहानसें तळें होतें. किल्ल्याच्या वायव्येकडील कोपऱ्यास एक ३० फूट उंचीचा उंचवटयाचा प्रदेश आहे. ह्या जागेवर ६४ फूट लांब, १३ फूट उंच, व सात फूट जाड असें एक आवार आहे. त्याला इदगा असें म्हणतात. तसेंच त्याच्या पूर्व बाजूस एक मशीद आहे. तिची लांबी २२ फूट व रुंदी २२ फूट

आहे. या मशिदीपासून ३० यार्डांवर एक खोल विहीर आहे.

मराठ्यांचे कारकीर्दींत गणेश दरवाज्याचे दक्षिणेस १६० फुटांवर त्या वेळचा पेशव्यांचा कल्याणचा सुभेदार रामाजी महादेव त्रिवलकर यानें एक नवीन दरवाजा पाडला, व किल्ल्यांत मशिदीचे मागचे अंगास दुर्गा देवीचें एक लहानसें देवालय बांधलें. या देवीच्या नांवावरून ह्या किल्याला पुढें दुर्गादेवीचा किल्ला असें ह्मणूं लागले. तसेंच आंतील मशिदींत मराठ्यांनीं रामाची मूर्ति बसविली, व तेव्हांपासून तिला रामजीचें देऊळ असें नांव पडलें. इ० स० १८१८ त कल्याणची तटबंदी नीट दुरस्त होती. किल्ल्याची लांबी २२० फूट व रुंदीही जवळजवळ तितकीच होती, व तटाची उंची २२ फूट व रुंदी सुमारें ११ फूट होती. त्याचा दरवाजा बळकट होता, व आंत २ उत्तम इमारती, व एक देवालय होतें.

इंग्लिशांचे कारकीर्दींत इ० स० १८६५ त कल्याण शहराच्या पूर्व व दक्षिण या बाजूंकडील तट इंग्लिशांनीं पाडून टाकला, व तिकडून सडक बांधिली. तसेंच त्याचा पश्चिमेकडील तट पाडून त्याचे दगड कल्याण व ठाणें येथें पुलांच्या कमानी वगैरे बांधण्याकरतां नेले, व किल्ल्याच्या पश्चिमबाजूस कस्टम खात्याच्या इन्स्पेक्टराकरतां एक इमारत बांधिली. हल्लीं किल्ल्याच्या वायव्येकडील उंचवट्यावर फक्त इदगा व देवालय एवढीं मात्र शिलक आहेत. परंतु त्या देवालयांतील मूर्ति इ० स० १८७६ त कोणीं चोरून नेली, तेव्हांपासून तें देवालयही ओसाड पडलेलें आहे.. दक्षि-

णच्या बाजूस कस्टमची कचेरी आहे, व एक बुजत आलेली विहीर आहे. किल्ल्याच्या तटाचा अवशेष भाग म्हटला म्हणजे फक्त दरवाजा कायतो दृष्टीस पडतो. किल्ल्याचा खंदक २० फूट खोल व ३३ फूट रूंद आहे

कल्याणच्या किल्ल्याच्या संबंधानें घडून आलेल्या ऐतिहासिक गोष्टी म्हणजे कल्याणचा इतिहास देण्यासारखेंच आहे. तो इतिहास येणेंप्रमाणें:—

कान्हेरी येथील निरनिराळ्या ९ लेखांत कल्याणचें नांव लिहिलेलें आहे. त्यावरून इ०सनाच्या पहिल्या शतकापासून कल्याण शहर व्यापारासंबंधानें प्रसिद्ध होतें. पुढें व्यापारासंबंधानें कल्याणचें नांव मागें पडून ठाण्याचें नांव पुढें आलें. दहा, अकरा व बारा या शतकांत अरब लोक हिंदुस्तानावर स्वाऱ्या करीतच होते. तेथपर्यंत मुसलमान लोक कल्याणास आले नव्हते. चवदाव्या शतकाच्या आरंभीं ते लोक कल्याणास आले, व त्यांनीं त्या शहराला इसलामाबाद असें नांव दिलें. पंधराव्या शतकांत कल्याणच्या संबंधानें कोठें उल्लेख नाहीं. परंतु त्या वेळीं तेथें बहामणी राजांचा अमल होता, व बहामणी राज्याचे तुकडे झाल्यावर तें शहर अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचे अमलाखालीं गेलें. इ० स० १५३६ त पोर्तुगीज लोकांनीं तें मुसलमानांपासून घेतलें. त्यांनीं त्याचा बंदोबस्त वगैरे कांहींएक केलें नाहीं, व ते तसेच निघून गेले. इ० स० १५७०त त्यांनीं कल्याणावर पुनः स्वारी केली, व आसपासच्या वाड्या जाळून तेथून पुष्कळ लूट नेली. या वेळीं कल्याण येथें किल्ला बांधलेला होता. परंतु तो कोणी

बांधला हें समजत नाहीं. त्या वेळीं " कल्लायणचा किल्ला फार उत्तम असून वर १५०० लोकांचा पहारा आहे " असें वर्णन केलेलें आहे. तसेंच तें अहमदनगरच्या राजांच्या अमलाखालीं असून त्या राज्याच्या एका प्रांताचें मुख्य शहर होतें. इ० स० १६३१ त तें विजापुरकरांचे ताब्यांत गेलें, व भिवंडीपासून नागोठण्यापर्यंतच्या प्रांताचें तें मुख्य शहर होतें. इ० स० १६४८ त शिवाजीचा सरदार आबाजी सोनदेव यानें कल्ल्याणवर स्वारी करून तें घेतलें व तेथील सुभेदारास कैद केलें. इ० स० १६६० त मोंगलांनीं तें घेतलें, परंतु इ० स० १६६२ त शिवाजीनें तें परत घेतलें. इ० स० १६७४ त शिवाजीनें इंग्लिशांस कल्ल्याण येथें वखार घालण्यास परवानगी दिली.

रत्नागिरी जिल्हा.

—:०:—

रत्नागिरी हा जिल्हा उत्तर अक्षांश १५° ४०′ व १८° ५′ व पूर्व रेखांश ७३° ५′ व ७३° ५५′ यांच्यामध्यें आहे. याचें क्षेत्रफळ ३९२२ चौरसमैल, लोकसंख्या ११०५९२६ व उत्पन्न सुमारें १०१३४२० रुपये आहे.

सावित्री नदीच्या उत्तरेस बागमांडलें व कोलमांडलें अशीं दोन खेडीं रत्नागिरी जिल्ह्यांत मोडतात. तीं सोडून रत्नागिरी जिल्ह्याच्या उत्तरेस समुद्रकिनाऱ्यापासून तों थेट महाप्रलपर्यंत ह्मणजे सुमारें २४मैल सावित्री नदी आहे. तिच्या पलीकडे जंजिरा संस्थान लागतें. ईशान्य दिशेस महाप्रलपासून हातलोट घाटापर्यंत कुलाबा जिल्ह्याचा

भाग आहे. पूर्वेस हातलोट घाटापासून नरदुवा घाटापर्यंत सह्याद्रीची ओळ पसरली आहे. या ओळी पलीकडे सातारा व कोल्हापूर हे प्रांत आहेत, व रत्नागिरी जिल्ह्यापैकीं संगमेश्वर तालुक्यांतील गोठणें नांवाचें खेडें आहे. त्याची दक्षिणसीमा नागमोडी आहे. ह्मणजे त्याच्या आग्नेयी दिशेस सावंतवाडी संस्थान आहे, व थेट दक्षिणेस तेरेखोलची खाडी आहे. तिच्या पलीकडे गोवें प्रांत लागतो; व पश्चिमेस बाणकोटच्या खाडीपासून तों थेट तेरेखोलच्या खाडीपर्यंत आरबी समुद्र आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत एकंदर १६० मैल लांबीचा समुद्रकिनारा मोडतो.

रत्नागिरी जिल्ह्याचे नऊ तालुके आहेतः—दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, राजापूर, देवगड, मालवण, व वेंगुर्लें.

या जिल्ह्यांतील किल्ल्यांचें साधारण वर्णनः—रत्नागिरी जिल्ह्यांतील कांहीं किल्ले समुद्रकिनाऱ्यावर आहेत व कांहीं अंतःप्रदेशांत आहेत. किनाऱ्यावर जे किल्ले आहेत, त्यांचे दोन प्रकार आहेत. कांहीं जंजिरे किंवा पाण्यांत बांधलेले आहेत, व कांहीं समुद्रकिनाऱ्याला लागून असणाऱ्या डोंगरांच्या शिखरांवर बांधलेले आहेत. या किल्ल्यांत बाणकोट, अंजनवेल किंवा गोपालगड, गोवळकोट, जयगड, रत्नागिरी, देवगड रामगड, रेडी वगैरे किल्ले मुख्य आहेत. अंतःप्रदेशांत जे किल्ले बांधलेले आहेत,. ते एखादी चांगली सोयीकर टेंकडी किंवा सपाट जागा पाहून बांधलेले आहेत. सपाट प्रदेशांतील किल्ले बहुतकरून एखाद्या डोंगराच्या उंच शिखरा-

वर बांधलेले असून कोणचीना कोणची तरी नदी किंवा खाडी त्यांचे माऱ्यांत असावयाचीच. सह्याद्रींतील सर्व किल्ले कोंकणच्या बाजूनें पुढें झुकलेल्या शिखरांवर बांधलेले आहेत. बहुतेक किल्ल्यांचें बांधकाम एकाच तऱ्हेचें आहे; म्हणजे प्रथमतः एखाद्या टेंकडीच्या माथ्यासभोंवार एक बळकट भिंत घातलेली असावयाची, तिला पुष्कळ बुरूज असावयाचे, जिकडून शत्रु येण्याची भींति त्या बाजूस एक मेढेकोट असून त्याच्या दोन्ही बाजूंस दोन मजबूत भिंती घालून त्या मुख्य किल्ल्यापर्यंत बांधलेल्या असावयाच्या, दरवाजा बहुतकरून एक असावयाचा, परंतु त्याचें बांधकाम मात्र अतिशय मजबूत असावयाचें. कांहीं ठिकाणीं जागा सोयिकर मिळाली तर एक आंतला व एक बाहेरला असे दोन दरवाजे असावयाचे. बाहेरच्या दरवाज्याच्या दोन बाजूंस दोन भक्कम बुरूज असावयाचे; बाहेरचा व आंतला या दोन दरवाज्यांमध्यें साधारण अंतर बरेंच असावयाचें, व त्या दोहोंच्या मध्यंतरीं दोन बाजूंस भक्कम भिंती असून मधील वाट नागमोडी असावयाची. अशा प्रकारच्या व्यवस्थेमुळें शत्रूला किल्ल्यांत सहसा प्रवेश करतां येत नसे. मुख्य किल्ल्याच्या आंत बहुधा बालेकिल्ला असावयाचाच.

या किल्ल्यांपैकीं कांहीं किल्ले कधीं बांधले असावे, याचा खातरीनें निर्णय करितां येत नाहीं. मंडणागड वगैरे किल्ले ख्रिस्तीशकाचे पूर्वींचे असावे असा तर्क होतो. कांहीं किल्ले पन्हाळ्याच्या भोजराजानें बांधले असें सांगतात, व कांहीं विजापूरच्या बादशाहांनीं (१५००–१६६०) बांधले असें सांगतात. सतराव्या शतकांत शिवाजीनें या सर्व किल्ल्यांची

नीट दुरस्ती केली. सातारचे राजांचे मागें पेशव्यांचे हातीं राज्यसत्ता आली, त्या वेळीं ज्याप्रमाणें त्यांनीं उत्तर कोकणांतील किल्ल्यांच्या दुरुस्तीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं, त्याचप्रमाणें दक्षिण-कोकणांतील किंवा रत्नागिरीजिल्ह्यांतील किल्ल्यांच्या दुरुस्तीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. सुमारें वीस वर्षांत या किल्ल्यांकडे पेशव्यांनीं एक दिवसाचे श्रम किंवा एक रुपयाही खर्च केला नाहीं, असें नैर्न साहेबानें आपल्या कोकणच्या इतिहासांत लिहिलेलें आहे. इ० स० १८१८त मराठ्यांचें राज्य लयास गेलें त्या वेळीं इंग्लिशांना हे किल्ले घेण्यास विशेष श्रम पडले नाहींत. बाणकोट, हर्णै, विजयदुर्ग, वगैरे किल्ल्यांची इंग्लिशांनीं मधून मधून दुरुस्ती केली. बाकीचे किल्ल्यांस त्यांनीं हातही लावला नाहीं. हल्लीं हे बहुतेक किल्ले कालातिक्षेपामुळें, व त्यांच्या तटांवरून झाडें झुडपें वाढून त्यांच्या मुळ्या आंत गेल्यामुळें ढांसळून पडले आहेत. फक्त रत्नागिरी जिल्ह्यांत पूर्वीं ३६५ किल्ले होते, परंतु हल्लीं फक्त ४० किल्ल्यांची माहिती मिळते. त्यांचें तालुकेनिहाय वर्णन येणेंप्रमाणें:—

दापोली तालुका.

—:०:—

१ **बाणकोट किंवा फोर्ट व्हिक्टोरिया.**—याला मराठ्यांचे वेळीं हिंमतगड असें म्हणत असत. हा किल्ला सावित्री नदीच्या किंवा बाणकोटच्या खाडीच्या मुखाशीं दक्षिणतीरावर एका उंच डोंगराच्या माथ्यावर बांधलेला आहे. या डोंगराचा रंग कांहींसा तांबूस आहे. हा किल्ला मुंबईच्या कांहींसा आग्नेयीस ७३ मैलां-

वर आहे. ह्या डोंगरावर झाडेंझुडपें बरींच आहेत. बाणकोटच्या किल्ल्याचा आकार चौकोनी आहे. त्याला जमिनीकडच्या बाजूस खंदक खे।दलेला आहे. शिवाय खाडीच्या अंगास मुख्य किल्ल्याचे बाहेर वर व खालीं असे दोन बुरूज बांधलेले आहेत, व मुख्य किल्ल्यापासून त्यांच्यापर्यंत एक मजबूत भिंत घातलेली आहे. खालचा किंवा पाणबुरूज हा हबशीनें बांधला, व वरचा आंग्रयांनीं बांधलेला आहे. खालच्या बुरुजापासून ३०० पायऱ्या चढून गेलें म्हणजे वरचा बुरूज लागतो, व तेथून ७०० पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे किल्ल्यांत प्रवेश होतो. हे दोन्ही बुरूज हल्लीं मोडकळीस आलेले आहेत; खालून वर किल्ल्यांत जाण्याचा रस्ता फरसबंदी असून तो अद्यापि दुरुस्त आहे. पूर्वीं हा किल्ला विजापुरकरांचे ताब्यांत होता. पुढें इ० स०. १५४८ त पोर्तुगीज लोकांनीं हा किल्ला घेतला व बाणकोट गांव जाळून टाकिला. नंतर त्याचें स्वामित्व मराठ्यांकडे आलें. इ० स० १७५५ त आंग्र्यांचें पारिपत्य करण्याकरितां पेशवे व इंग्लिश एक झाले, त्यावेळीं कमोडर जेम्स यानें हा किल्ला घेतला. परंतु पुढें इंग्लिशांनीं मराठ्यांस तो किल्ला परत दिला. पुढें त्याच वर्षाच्या आक्टोबर महिन्यांत तो किल्ला व आणखीं नऊ गांव पेशव्यांनीं इंग्लिशांस दिले. त्या वेळीं इंग्लिशांनीं या किल्ल्याचें पूर्वीचें हिंमतगड हें नांव बदलून त्याचें फोर्ट व्हिक्टोरिया असें नांव ठेविलें. व्यापाराचे कामीं आपणांस या किल्ल्याचा फार उपयोग होईल, असें इंग्लिशांस वाटलें होतें. परंतु तेथें इंग्लिशांचा व्यापार बरोबर रीतीनें जुळेना. या किल्ल्याचे संबंधानें विशेष अशी कांहींच

गोष्ट उपलब्ध नाहीं. आंत युरोपियन लोकांच्या बंगल्यांचे पाये, बागा, व युरोपियन लोकांचीं थडगीं यांच्या बऱ्याच खुणा आहेत.

२ हर्णै.—हा गांव आंजर्ल्यांच्या दक्षिणेस २ मैलांवर व दाभोळच्या उत्तरेस १५ मैलांवर समुद्रकांठीं आहे. हर्णै हें एक प्रसिद्ध बंदर आहे. या गांवाखालीं एकंदर ४ किल्ले मोडतात. त्यांचीं नांवें—सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग फत्तेगड आणि गोवा. यांपैकीं सुवर्णदुर्ग हा किल्ला जंजिरा (पाण्यांत) आहे, व तो फार प्रसिद्ध आहे. बाकीचे तीन जमिनीवर असून विशेष प्रसिद्ध नाहींत. त्यांचें वर्णन खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

३ सुवर्णदुर्ग—हा किल्ला हर्णैच्या कांहींसा उत्तरेस किनाऱ्यापासून सुमारें पाव मैलावर समुद्रांत एका खडकावर बांधलेला आहे. या किल्ल्याचा तट अतिशय उंच असून फार मजबूत आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील किल्ल्यांमध्यें हा किल्ला फार भव्य दिसतो. कांहीं ठिकाणीं निवळ खडक फोडून तटाचा भाग तयार केलेला आहे, व कांहीं ठिकाणीं १२ फुटांपर्यंत चौरस चिरे लावून तो बांधलेला आहे. किल्ल्याच्या तटास पुष्कळ बुरूज असून एक दरवाजा आहे. ह्या तटाच्या सभोंवार फक्त ओहोटीच्या वेळीं फिरतां येतें. ह्या तटावर हल्लीं अतिशय झाडझुडूप वाढलेलें आहे. किल्ल्यांत पुष्कळ विहिरी आहेत. त्यांपैकीं एका विहिरीस पायऱ्या बांधलेल्या आहेत. ह्या विहिरींतून पाणी विपुल आहे. दरवाज्याला लागूनच एका दगडावर कूर्माची प्रतिमा काढलेली आहे, व त्याच्या समोर डावे बाजूस भिंतीवर एक मारुतीची मूर्ति काढिलेली आहे. दरवाज्याच्या

दोन्ही बाजूंस दोन देवड्या आहेत. शिवाय आंत कांहीं बुरुजांच्या खालीं कोठड्या आहेत. दरवाज्यापासून थोड्याशा अंतरावर एक चुनेगच्ची केलेली इमारत आहे. येथें पूर्वीं दारूगोळा ठेवीत असत असें सांगतात. हल्लीं आंत मोठमोठ्या इमारतींचे पाये दृष्टीस पडतात. हे पाये पूर्वींच्या जुन्या राजवाड्यांचे होत. इ. स. १८६२ सालीं या किल्ल्याची पहाणी केली त्या वेळीं त्याचा तट व बुरूज हे नीट दुरुस्त होते. परंतु दरवाज्यापाशीं पडापड झालेली होती. आंत शिबंदी वगैरे कांहीं नव्हतें व जुन्या निरुपयोगी अशा ५।६ तोफा पडलेल्या होत्या.

हा किल्ला सोळाव्या शतकांत बहुधा विजापुरकरांनीं बांधला असावा. पुढें इ० स० १६६० च्या सुमारास तो शिवाजीच्या हातीं आला, व त्यानें त्याची नीट दुरुस्ती केली. नंतर शिवाजी आपलें आरमार या ठिकाणीं ठेवूं लागला. इ० स० १६९८ च्या सुमारास शिवाजीच्या आरमाराचा सरदार कान्होजी आंग्रे हा येथें राहूं लागला. पुढें इ०स० १७१३त साताराचे शाहूमहाराज यांचे पक्षास कान्होजी आंग्रे येऊन मिळाला त्या वेळीं शाहूमहाराजांनीं तो किल्ला कान्होजीस दिला. कान्होजीच्यामागें तुळाजीच्या कारकीर्दींत सुवर्णदुर्ग हें चांचेपणाचें एक मुख्य ठिकाण झालें. तुळाजीजवळ बळकट आरमार असल्यामुळें एतद्देशीय किंवा परकीय व्यापारी गलबतांस तो फारच त्रास देऊं लागला. पुढें तो इतका बेफाम झाला कीं, तो पेशव्यांसही जुमानीनासा झाला. पुढें इ० स० १७५५ च्या सुमारास पेशवे व इंग्लिश यांच्यामध्यें तह होऊन त्यांत आंग्र्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय ठरला. तारीख २२

मार्च इ०स० १८५५ रोजीं कमोदर जेम्स हा आपलें आरमार घेऊन बाहेर पडला. आंग्र्याच्या किल्लयांवर हल्ला न करतां समुद्राचे बाजूनें त्यांस वेढा द्यावा, असा त्यास मुंबई सरकाराचा हुकूम झाला होता. नंतर तीन दिवसांनीं त्याला पेशव्यांचें आरमार येऊन पोहोंचलें. या आरमारावर पेशव्यांचे एकंदर दहाहजार स्वार होते. नंतर आंग्र्याचें आरमार सुवर्णदुर्ग येथें आहे अशी बातमी समजली. तेव्हां कमोदर जेम्स यानें रात्रीच्या रात्रीस हर्णैस जाऊन त्या बंदराची नाकेबंदी करण्याचा निश्चय केला. परंतु नेमलेल्या वेळीं पेशव्यांचें आरमार येऊन पोहोंचलें नाहीं. प्रातःकाळीं आंग्र्याचे आरमारानें इंग्लिश व पेशवे यांचें आरमार पहातांच तें पळूं लागलें. इंग्लिशांचें आरमार व मराठ्यांचें आरमार त्याचा पाठलाग करूं लागलें. परंतु त्या वेळीं वारा अगदीं पडलेला होता. आंग्र्याच्या आरमारावरील लोकांनीं गलबतें हलकीं व्हावीं म्हणून त्यांतलें निरीम काढून टाकलें व सर्व शिडें उभारलीं. ते लोक इतकेंही करून राहिले नाहींत. ज्यास्त वारा सांपडून गलबतें जोरानें चालावीं म्हणून त्यांनीं आपलीं धोतरें व पागोटीं हींही वारा अडविण्याकरितां आपल्या गलबतांस लाविलीं होतीं. इंग्लिश व मराठे यांच्या आरमारानें संध्याकाळपर्यंत आंग्र्याच्या आरमाराचा पाठलाग केला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं अस्तमानसमयीं कमोदर जेम्सनें आंग्र्याचा पाठलाग सोडून दिला. नंतर सुवर्णदुर्ग येथें येऊन त्यानें वरवा केला. त्या वेळीं पेशव्यांचा सरदार रामाजीपंत हा

किनाऱ्यावरील तीन किल्ले घेण्याच्या कामांत गुंतलेला होता. तारीख २ एप्रिल रोजीं कमोदर जेम्स यानें सुवर्णदुर्गावर आपला तोफखाना सुरू केला. परंतु त्या बाजूस जबरदस्त खडक असल्यामुळें त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां तो किल्ल्याच्या ईशान्य दिशेकडे आपलें आरमार घेऊन गेला, व तेथून त्यानें किल्ल्यांत तोफखान्यावर जी शिबंदी होती, तीवर आपला गोळीबार सुरू केला. गोळ्यांचा एकसारखा वर्षाव होत असल्यामुळें व त्याच वेळीं किल्ल्यांतील दारूगोळ्यास आग लागून तो पेटल्यामुळें आंग्र्याचे लोक सुवर्णदुर्ग सोडून गोवा किल्ल्यावर पळून गेले. थोड्याच वेळांत सुवर्णदुर्गचा किल्लेदार कांहीं निवडक लोक बरोबर घेऊन परत किल्ल्यांत येऊन दाखल झाला. आपण आजचें काम उद्यांवर टाकिलें तर रात्रीस कदाचित् दाभोळेहून किल्ल्यांतील लोकांस मदत येईल असें जेम्स साहेबास वाटल्यावरून त्यानें लगेच आपले निमे लोक किनाऱ्यावर पाठवून दिले. त्यांनीं एकदम लगट करून किल्ल्याचा चोरदरवाजा कुऱ्हाडी घालून फोडून टाकिला व आंतील लोकांवर हल्ला करून किल्ला सर केला. नंतर तारीख ११ रोजीं कमोदर जेम्स यानें कराराप्रमाणें तो किल्ला पेशव्यांच्या स्वाधीन केला.

इ० स० १८०२ त दुसरा बाजीराव पेशवा यशवंतराव होळकराच्या भीतीनें इतस्ततः पलायन करूं लागला तेव्हां कांहीं कालपावेतों त्याचा वास या किल्ल्यावर होता. परंतु त्याला येथेंही स्वतःचे संरक्षण करतां येईना; तेव्हां त्यानें आपला कुटुंबवर्ग येथेंच टाकून दिला व स्वतः वसईस इंग्लिशांचे आश्रयास गेला.

होळकर बाजीरावाचा पाठलाग करीत सुवर्णदुर्ग येथें आला. परंतु तो येण्याचे पूर्वींच बाजीराव वसईस जाऊन पोहोंचला होता. नंतर त्यानें सुवर्णदुर्ग घेतला तेव्हां बाजीरावाचा कुटुंबवर्ग त्याच्या हातीं सांपडला. इ० स० १८०३ त इंग्लिशांनीं पेशव्याच्या वतीनें तो किल्ला एक मराठा सरदार बळकावून बसला होता त्याचेपासून घेतला. त्या वेळीं आंत ८०० अरब व मुसलमान लोकांची शिबंदी होती. परंतु सामन्यास उभे न राहतां त्यांनीं आपलीं शस्त्रें खालीं ठेविलीं व ते इंग्लिशांस शरण आले. इ० स० १८१८ त इंग्लिशांनीं पेशव्यांचें राज्य खालसा केलें त्या वेळीं कर्नल केनेडी यानें नोवेंबर महिन्यांत सुवर्णदुर्ग सर केला. त्या वेळीं त्याला तेथें थोडासा अडथळा झाला. त्याचा प्रकार येणेंप्रमाणें:--कपतान कर्याबेल व लेफ्टेनेंट डामीनिसेटी हे दोन सरदार बरोबर ५० शिपाई व ३० खलाशी घेऊन किल्ला घेण्याकरितां निघाले. किल्ल्यांतील शिबंदीनें त्यांच्यावर तोफांचा एकसारखा भडिमार चालविला होता. परंतु त्याला न जुमानतां इंग्लिशांचे लोक शिडया लावून वर चढले. इंग्लिश फौजेचें हें धाडस पाहून किल्ल्यांतील शिबंदी भिऊन गेली, व त्यांनीं किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन केला.

३।९कनकदुर्ग व फत्तेगड-हे किल्ले सुवर्णदुर्गाचे समोरासमोर किनाऱ्यावर बांधलेले आहेत. हे दोन किल्ले व सुवर्णदुर्ग यांचेमध्यें एक लहानसा खाडीचा फांटा आहे. जमिनीच्या बाजूनें सुवर्णदुर्गास शत्रूचा उपसर्ग लागूं नये म्हणूनच हे किल्ले बांधले असावे असें अनुमान होतें. परंतु एके ठिकाणीं असा वृत्तांत आढळतो कीं, इ. स. १७१०

च्या सुमारास सातारच्या शाहूमहाराजांनीं हे दोन किल्ले बांधले, व ते बांधण्यांत त्यांचा असा उद्देश होता कीं, सुवर्णदुर्ग आंग्र्याचे ताब्यांत होता तेव्हां त्याच्या शेजारीं आपण हे दोन किल्ले बांधले म्हणजे तेणेंकरून आंग्र्यावर आपला बराच दाब बसून त्याला विशेष हालचाल करतां येणार नाहीं. परंतु पुढें लवकरच ते त्यांनीं आंग्र्याचे स्वाधीन केले. परंतु हा वृत्तांत खरा असावा असें दिसत नाहीं. कारण इ. स. १७०८त शाहूमहाराजांचे पाय सातार्‍यास लागले. त्या वेळीं ते व ताराबाई यांच्यामध्यें फार जोरानें भांडणें सुरू होतीं, व तीं इ. स. १८११ पर्यंत एकसारखीं सुरू होतीं. या वेळीं कोंकणपट्टीचा बहुतेक भाग कान्होजी आंग्र्याचे ताब्यांत होता व तो ताराबाईच्या पक्षाकडे प्रथमतः होता. इ. स. १८१२ त तर त्यानें राजमाची वगैरे किल्ले घेऊन थेट सातार्‍यावर स्वारी करण्याचा घाट घातला होता. सारांश, त्या वेळीं कान्होजी फारच प्रबळ होता, व शाहूमहाराजांची सत्ता मुळींच बसली नव्हती. अशा वेळीं त्यांनीं कान्होजीस दाबांत ठेवण्याकरितां वरील दोन किल्ले बांधले, व कान्होजीसारख्या सरदारानें ते बांधूं दिले ही गोष्ट अगदीं असंभवनीय आहे.

दुसर्‍या एका वृत्तांतांत असें दिलें आहे कीं, इ० स० १७०० च्या सुमारास जंजिर्‍याचा हबशी खैरातखान यानें हे दोन किल्ले बांधले. हे बांधण्याचें कारण असें झालें कीं, इ. स. १७०० च्या पूर्वीं खैरातखान यानें सुवर्णदुर्गावर स्वारी केली होती, परंतु तींत त्याला यश मिळालें नाहीं. तथापि त्यानें त्याच्या लगत्याचा किनार्‍यावरील

प्रदेश घेतला, परंतु सुवर्णदुर्गाचे शेजारीं आसऱ्याची अशी त्याला जागा नव्हती. तेव्हां त्यानें हे दोन किल्ले बांधले, व इ० स० १७२७ पर्यंत ते त्याच्या ताब्यांत होते. त्या कालांत त्या प्रांताच्या संरक्षणाकरितां खैरातखान यानें जे सुभेदार नेमिले होते त्यांचीं नांवें:—धर्मराव सांवत, हिब्राव दळवी, सिद्दी मसाऊदखान, सिद्दी मसाऊद, सिद्दी सयद किंवा अलमगर, सिद्दी सयद वदेल व सिद्दी याकूब. वरील दोन्ही वृत्तांत ताडून पाहतां दुसरा वृत्तांत ज्यास्त विश्वासनीय आहे असें सहज दिसून येईल. इ. स. १७५५ त इंग्लिशांचा सरदार कमोदार जेम्स यानें सुवर्णदुर्ग काबीज केला त्याच वेळीं वरील दोन्ही किल्लेही त्यानें सर केले, व ते पेशव्यांचे हवालीं केले.

कनकदुर्ग हा किल्ला एका उंचवट्याच्या प्रदेशावर बांधलेला असून त्याच्या तीन बाजूंस समुद्र आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें अर्धा एकर आहे. इ० स० १८६२ त तो अगदीं मोडकळीस आलेला होता. इ० स० १८७९ त त्याचा सर्वभाग जमीनदोस्त झालेला होता. फक्त दोन टोंकांस दोन सज्जे मात्र शिलक राहिले होते. आंत पाण्याचीं एकंदर ९ टांकीं आहेत, व त्यांच्यांत पाणीही विपुल आहे. फत्तेगडाची तर हल्लीं अशी स्थिति झाली आहे कीं, पूर्वी तेथें किल्ला होता किंवा नव्हता याची शंकाच उत्पन्न होऊं लागली आहे.

९ **गोवा किल्ला.**—हा किल्ला एका लहानशा टेंकडीवर बांधलेला असून त्याच्या उत्तर व पश्चिम या दोन बाजूंस समुद्र आहे, व त्याचें क्षेत्रफळ दोन एकर आहे. इ० स० १८६२ त एकंदर किल्ल्यांची जी पहाणी झाली त्या वेळीं हा किल्ला नीट दुरुस्त होता. त्या वेळीं या कि-

ल्ल्यावर एकंदर १९ शिपयांचा पहारा होता व आंत ६९ जुन्या निरुपयोगी तोफा पडलेल्या होत्या. किल्ल्यांत पाण्याचा पुरवठा कमी आहे. इ० स० १७५६ त इंग्लिशांनीं सुवर्णदुर्ग काबीज केला, त्या वेळीं हा किल्लाही त्यांचे हातीं गेला. पुढें इ० स० १७५७ त इंग्लिशांनीं तो पेशव्यांचे हवाली केला. इ० स० १८१७ त पेशव्यांची सत्ता नष्ट झाली त्या वेळीं त्याचें स्वामित्व पुनः इंग्लिशांकडे आलें. कनकदुर्ग व फत्तेगड या किल्ल्यांपेक्षां हा किल्ला अधिक मोठा व अधिक बळकट आहे, व अद्यापि तो नीट दुरुस्त आहे. आंत दोन बंगले आहेत. एकांत फिरस्ते युरोपियन लोक उतरतात, व दुसऱ्यांत कलेक्टर साहेब स्वारीकरितां बाहेर पडले ह्मणजे उतरतात. आंत एका भिंतींत एक मारुतीची मूर्ति बसविलेली आहे, व दरवाज्याचे आंतले अंगास एक कासव काढलेलें आहे. किल्ल्याची दक्षिणबाजू समुद्राचे वर ९० फूट उंच आहे.

७ **मंडणगड.**—हा किल्ला दापोली तालुक्यांत बाणकोटच्या पूर्वेस १२ मैलांवर मंडणगड नांवाच्या एका उंच डोंगरावर बांधलेला आहे. दोन निरनिराळे किल्ले मिळून हा एक किल्ला झालेला आहे व त्याला तिहेरी तटबंदी आहे, व त्याचें क्षेत्रफळ सुमारें ८ एकर आहे.

खेड तालुका.

—:o:—

८ **सुमारगड.**— हा किल्ला खेड तालुक्यांत महिपतगड ज्या डोंगरावर बांधलेला आहे त्याच डोंगराच्या एका फांट्यावर बांधलेला आहे. हा किल्ला महिपतगडापेक्षां

सखल असून त्याच्या दक्षिणेस सुमारें चार मैलांवर आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें पाऊण एकर आहे. त्याच्या सभोंवार तट असून त्याची उंची १५पासून २२फुटांपर्यंत आहे. किल्ल्याच्या चार कोंपऱ्यांवर चार मोर्चे उभारलेले आहेत. शिड्या लाविल्याशिवाय किल्ल्यांत जातां येत नाहीं. इ० स० १८६२त एकंदर किल्ल्यांची पहाणी झाली, त्या वेळीं हा किल्ला मोडकळीस आलेला होता. आंत तोफा वगैरे कांहीं नव्हतें.

९ **माहिपतगड.**- हा किल्ला खेडापासून सुमारें १२ मैलांवर हातलोटचा घांट व मकरंदगड यांच्यासमोर आहे. हा किल्ला सह्याद्रीशीं समांतर जाणाऱ्या एका डोंगराच्या उंच शिखरावर बांधलेला असून माहिपतगड, सुमारगड रसाळगड हे किल्लेही त्याच डोंगराच्या निरनिराळ्या शिखरांवर बांधलेले आहेत. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता पोलादपूर नांवाच्या खेड्यावरून असून अतिशय अरुंद व बिकट आहे. किल्ल्याचा माथा साधारण सपाट असून त्याचें क्षेत्रफळ सुमारें १२० एकर आहे. या किल्ल्याला एकसारखा वाटोळा तट घातलेला नाहीं. याच्या सभोंवर बहुतेक तुटलेला कडा आहे. फक्त सहा ठिकाणीं किल्ल्यावर जातां येण्यासारखा डोंगराचा भाग आहे. परंतु त्या ठिकाणीं मजबूत तटबंदी करून भक्कम दरवाजे ठेविलेले आहेत हल्लीं दरवाजे वगैरे नाहींसे झाले आहेत व तटबंदीही पडून गेलेली आहे. किल्ल्याच्या सभोंवार बेलदारवाडी नांवाचें खेडें आहे. हें खेडें हा किल्ला बांधण्याकरितां शिवाजीनें जे बेलदार लोक आणिले होते, त्यांना इनाम करून दिलें होतें, व त्यावरून त्याला तसें अन्वर्थक नांव पडलें असावें. उत्त-

रेकडील दरवाज्यास कोतवाल दरबाजा असें ह्मणतात, ईशान्येकडील दरवाज्यास ढालदेवडी असें नांव आहे. पुर्वेच्या बाजूस पुसाती नांवाचा दरवाजा आहे. खालून वर जाण्यास पूर्वी येथें शिडी लावावी लागत असे. आग्नेयी दिशेस यशवंत दरवाजा आहे. येथील तटबंदीची उंची सुमारें ३० फूट आहे. दक्षिणेच्या बाजूस खेड दरवाजा आहे. पूर्वी किल्ल्यांतील लोकांस लागणारें सामानसुमान या रस्त्यानें आंत आणीत असत; व पश्चिमेस शिवगंगा नांवाचा दरवाजा आहे. या दरवाज्याजवळ एक लहानशा ओढ्याचा उगम असून तेथें एका लिंगाची स्थापना केलेली आहे, व त्यावरूनच त्या दरवाज्याला शिवगंगा हें नांव दिलें असावें. खेड दरवाजाच्या तोंडाशींच गणपतीचें व मारुतीचें अशीं दोन देवालयें आहेत. हल्लीं त्यांच्या भिंती पडून गेल्या आहेत. पूर्वी येथें सातशें तबेले बांधलेले होते असें सांगतात. याच्याच कांहींसें पुढें गेलें म्हणजे ४५ फूट लांब व ४४ फूट रुंद अशी एक इमारत लागते. तसेंच एक परेश्वर नांवाचें देवालय लागतें. याचें बांधकाम मोठें मजबूत असून त्याची लांबी ३८ फूट व रुंदी २० फूट आहे. या देवालयाला सालीना १५ रुपयांची सरकारांतून नेमणूक आहे. देवालयाच्या आवारांत दोन तळीं आहेत. या किल्ल्याचें काम शिवाजीनें सुरू केलें होतें व तें अपुरेंच राहिलें असें तेथील लोक सांगतात; हल्लीं किल्ल्यांत ठिकठिकाणीं कमावलेल्या चुन्याच्या ज्या मोठमोठ्या राशी पडलेल्या आहेत त्यावरून वरील गोष्टीस प्रमाण मिळतें. किल्ल्यांतील जमीन खडकाळ व उंच सखल आहे. हल्लीं आंत

कांटेरी झाडेंझुडपें वगैरे फार माजलेलीं आहेत. या किल्ल्याचे संबंधानें इतिहासप्रसिद्ध अशी गोष्ट उपलब्ध नाहीं.

१० पालगड.–खेडच्या वायव्येकडील सीमेवर जो एक उंच डोंगर आहे त्याच्या शिखरावर हा किल्ला बांधलेला आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें दीड एकर आहे. इ० स० १८६२ सालीं एकंदर किल्ल्यांची तपासणी झाली त्या वेळीं हा किल्ला अगदीं मोडकळीस आलेला होता, व आंत ९ जुन्या निरुपयोगी तोफा होत्या. हा किल्ला शिवाजीनें बांधला असें सांगतात. इ० स० १८१८ त कर्नल केनेडी यानें हा किल्ला सर केला. हा किल्ला घेतांना इंग्लिशांस बरेच श्रम पडले. किल्ल्यांतील मराठी शिबंदीनें इंग्लिशांवर एकसारखा तोफांचा भडिमार सुरू केला होता. परंतु अशा माराखालीं इंग्लिशांचे लोक डोंगर चढून वर गेले व त्यांनीं तो किल्ला घेतला. किल्ल्याचे उत्तरेकडील उतरणीवर हिरवी झाडी असून तिला देवरान असें ह्मणतात. किल्ल्याचे पायथ्याशींच दापोली तालुक्यांतील पाली नांवाचा प्रसिद्ध गांव आहे. त्यावरूनच या किल्ल्याला पालगड असें नांव पडलें असावें.

११ रसाळगड.–ज्या डोंगरावर सुमारगड व महिपतगड हे किल्ले बांधलेले आहेत, त्याच डोंगरावर हा किल्ला बांधलेला आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें ५ एकर आहे. सुमारगड व महिपतगड या किल्ल्यांहून याची उंची कमी आहे. किल्ल्यापासून तीन मैलांवर मांडव नांवाचें खेडें आहे, तेथून किल्ल्यावर जाण्याचा रस्ता आहे. उत्तरेच्या बाजूस हा किल्ला अरुंद असून तो दक्षिणेकडे रुंद होत गेलेला आहे व तेथें डोंगराचे दोन फांटे झालेले आहेत. एक

आग्नेयीकडे जातो व दुसरा नैर्ऋतीकडे जातो. किल्ल्याचा दरवाजा उत्तर दिशेस आहे. हा दरवाजा अतिशय मजबूत असून त्याच्या संरक्षणाकरतां तेथें एक बुरूज बांधलेला आहे. या दरवाज्याच्या समोर कोनाड्यांत एक मारुतीची मूर्ति बसविलेली आहे. या दरवाज्यांतून सुमारें ८० यार्ड आंत गेलें म्हणजे दुसरा दरवाजा लागतो. याही दरवाज्याच्या रक्षणाकरतां एक मजबूत बुरूज व तटबंदी बांधलेली आहे. तेथून दक्षिणेच्या बाजूस थोडेसें पुढें गेलें ह्मणजे जेथें किल्ला रुंद होण्यास प्रारंभ होतो तेथें सोलाई व वाघाई या देवींचें एक देवालय आहे. या देवालयाचें काम फार नक्षीदार आहे. येथें दरवर्षी आसपासच्या एकंदर १४ गांवची फार मोठी जत्रा भरत असते. या देवालयाच्यापुढें डोंगराचे दोन फांटे झाले आहेत व त्या दोहींनांही तटबंदी केलेली आहे. आग्नेयीकडील फांट्यावर एक इमारत आहे. हिला छप्पर वगैरे कांहीं नाहीं. ही पूर्वी कोठीची जागा होती असें सांगतात. या कोठीच्यापुढें कांहीं अंतरावर पाण्याचीं लहान लहान टांकीं आहेत. या टांक्यांच्या कांठावर दगड बसविलेले आहेत, व त्यांवर कांहीं लेख आहेत, परंतु हल्लीं ते वाचतां येत नाहींत. या फांट्याची लांबी सुमारें ३०० यार्ड आहे, व जेथें त्याचा शेवट होतो तेथील तटबंदीचें काम फारच मजबूत आहे. या भागाला बालेकिल्ला असें म्हणतात. याची लांबी १८६ फूट व रुंदी १२६ फूट आहे. बालेकिल्ल्यांत दारुगोळ्याची कोठी व किल्लेदाराचा वाडा अशा दोन इमारती आहेत. हल्लीं त्यांची पडापड झालेली आहे.

चिपळूण तालुका.

—:*:—

१२ अंजनवेलचा किल्ला.—हा किल्ला अंजनवेलच्या खाडीच्या दक्षिण तीरावर तिच्या मुखाशीं एका डोंगराच्या उंच टोंकावर बांधलेला आहे. येथून अंजनवेल गांव अर्ध्या मैलावर आहे. या किल्ल्यावरून खाडीच्या मुखावर चांगला मारा लागू पडतो. किल्ल्याचें एकंदर क्षेत्रफळ ७एकर आहे. त्याच्या तीन बाजूंस समुद्र असून एका बाजूस खंदक आहे. हल्लीं हा खंदक भरून गेला आहे. किल्ल्याचा तट एकसारखा बांधलेला नाहीं. फक्त दोन ठिकाणीं डोंगराच्या माथ्यापासून किनाऱ्यावरील तटापर्यंत एकसारखी भिंत बांधलेली आहे. तो तट चुन्यांत दगड बसवून अतिशय मजबूत केलेला आहे. याची उंची २० फूट व रुंदी ८ फूट आहे. किल्ल्याला एकंदर १२ बुरूज आहेत. दक्षिणेच्या बाजूस १८ फूट रुंदीचा खोल खंदक आहे. त्याला पूर्वेच्या बाजूस व पश्चिमेच्या बाजूस असे दोन दरवाजे आहेत. पश्चिमेकडील दरवाज्याच्या आंत दोन्ही अंगांस पाहारेकरी लोकांकरितां दोन देवड्या काढलेल्या आहेत. पूर्वीं किल्ल्यांत पुष्कळ इमारती होत्या. अद्यापिहीं कांहीं कांहीं घरांच्या खाणाखुणा दृष्टीस पडतात. आंत पाण्याच्या तीन विहिरी असून त्यांना पाणीही विपुल आहे. या विहिरीचे जवळ एक इमारत आहे, ती पूर्वीची कोठीची जागा होती असें सांगतात. तिला लागूनच धान्याच्या कोठीची जागा आहे, व तेथून थोड्याशा अंतरावर सुभेदाराचा वाडा आहे.

हा किल्ला सोळाव्या शतकांत विजापुरच्या बादशाहांनीं बांधला. तेव्हांपासून इ० स० १६६० पर्यंत तो विजापुरकरांकडे होता. पुढें त्याच वर्षी तो शिवाजीनें सर केला, व त्याला कांहीं नवा भाग जोडून तो नीट दुरुस्त केला. किल्ल्याच्या तटाच्या एका दगडावर एक फारशी शिलालेख आहे, त्याचा मतलब असा आहे कीं, " एखाद्यानें नवीन इमारत बांधिली, व ती बांधीत असतां त्याला मृत्यूचें बोलावणें आलें तर ती इमारत पुढें दुसऱ्याची होत नाहीं काय ? फक्त परमेश्वर अजरामर आहे. बाकी सर्व वस्तु नाशवंत आहेत. अखिलजगद्दीपक अशा महाराजांनीं हा किल्ला बांधण्यास आज्ञा केली, त्यावरून तो बांधला. परंतु तो पाहण्यास ते जिवंत राहिले नाहींत." हा लेख जिल्हेज ता. १० हिजरी सन १११९ त (इ. स. १७०७त) लिहिला. ह्या लेखावरून हा किल्ला कोणी बांधला याचें चांगलेंसें अनुमान करतां येत नाहीं. शिवाजीच्यामागें त्याचा पुत्र संभाजी यानें या किल्ल्याची नीट दुरुस्ती केली. इ. स. १६९९ त जंजिऱ्याचा हबशी खैरातखान यानें मराठ्यांपासून हा किल्ला घेतला, व त्याला पडकोट म्हणून खालचे अंगास एक कोट बांधला. इ. स. १७४४त तुळाजी आंग्रे यानें हबशीपासून हा किल्ला जिंकून घेतला, व बालेकोट ह्मणून एक वरच्या अंगास कोट बांधला. इ. स. १७५३त त्याचें स्वामित्व पेशव्यांकडे आलें. मराठयांचे वेळीं येथें एक सुभेदार रहात असे. इ. स. १८१८ त पेशव्यांचें राज्य लयास गेलें. तेव्हां कर्नल केनेडी यानें ता. १७ मे रोजीं हा किल्ला घेतला. इ. स. १८२९ पर्यंत या

किल्ल्यावर इंग्लिशांचे २०० काळे लोक, व दोन कामदार एवढी शिबंदी होती. पुढें ही शिबंदी तेथून काढून दापोलीस नेली. इ. स. १८६२ त या किल्ल्यावर एकंदर ८८ तोफा होत्या. परंतु त्या निरुपयोगी होत्या. अद्यापिही कांहीं तोफा शिलक आहेत.

१३ **बाहिरवगड**.:—हा किल्ला सह्याद्रीच्या एका उंच व त्रिकट अशा फांठ्यावर बांधलेला असून तो चिपळूण तालुक्यांत मोडतो. वर जाण्याचा रस्ता फारच अवघड आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें आठ एकर आहे. किल्ल्यांतील जागा खडकाळ व उंचसखल असून ती कांटेरी झाडांनीं भरून गेलेली आहे. किल्ल्यांत पाण्याचा पुरवठा चांगला आहे. परंतु आसपास धान्यसामग्री मिळण्यासारखी नाहीं. या किल्ल्याला रखवालदार वगैरे कोणी नाही. इ. स. १८६२ त आंत जुन्या निरुपयोगी अशा चार तोफा पडलेल्या होत्या.

१४ **गोवळकोट** * :—हा किल्ला चिपळूण तालुक्यांत आहे. तो एका साधारणशा उंच टेंकडीवर बांधलेला असून तिच्या पायथ्याशीं सभोंवार भातशेतीचीं खाचरें आहेत. या किल्ल्याच्या तीन बाजूंस वासिष्टी नदी किंवा चिपळूणची खाडी असून चवथ्या बाजूस पूर्वीं खंदक होता. हल्लीं तो भरून गेलेला आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें दोन एकर आहे. किल्ल्यांतील पाणी साचवणीचें असून एप्रिल महिन्यापर्यंत पुरतें. या किल्ल्यांत वस्ती वगैरे कांहीं एक नाहीं. इ. स १८६२ त या कि-

* तुळाजी आंग्रे यानें या किल्ल्यास **गोविंदगड** असें नांव दिलें होतें.

ल्याची पहाणी केली त्या वेळीं त्याचा तट व बुरूज यांची बहुतेक पडापड झालेली होती, व त्यावर २२ निरुपयोगी जुन्या तोफा होत्या. हा किल्ला स्वतःसिद्ध मजबूत नाहीं किंवा त्याचें बांधकामही मजबूत नाहीं: किल्याला दोन दरवाजे असून एक उत्तरेच्या बाजूस व दुसरा पूर्वेच्या बाजूस आहे. दक्षिणेकडील भिंतींत एक मूर्ति बसविलेली आहे तिला रेडजाजी असें ह्मणतात.

हा किल्ला इ. स. १६९० च्या सुमारास जंजिऱ्याच्या हबशानें बांधला अशी तेथील लोक दंतकथा सांगतात. परंतु हबशानें हा किल्ला नवीन बांधला नसून त्याची फक्त दुरुस्ती केली असावी असें वाटतें. कारण रेडजाजीची मूर्ति जेथें बसविलेली आहे, तें काम इ. स. १६९० च्या पूर्वींचें दिसतें. तेव्हां हा किल्ला हिंदू लोकांनीं त्या पूर्वीं बांधलेला असावा. कदाचित् शिवाजीनेंच हा किल्ला बांधला असेल. नंतर त्याचें स्वामित्व हबशाकडे गेलें. पुढें इ. स. १७४४ त तो किल्ला हबशाकडून आंग्र्यांनीं घेतला. नंतर इ. स. १७५५ त त्याचें स्वामित्व पेशव्यांकडे आलें, व पेशव्यांपासून इ. स. १८१७ त तो इंग्लिशांनीं घेतला. आंत जुन्या इमारतींचे कांहीं पाये आहेत, व ४८ फूट लांब, ४४ फूट रुंद व २२ फूट खोल असा एक तलाव आहे.

संगमेश्वर तालुका.

—:o:—

१९ भवनगड. हा किल्ला संगमेश्वर तालुक्यांत चिखली नांवाच्या खेड्याशेजारीं आहे. तो अतिशय ल्हान आहे, ह्मणजे त्याचें क्षेत्रफळ अवघें अर्धा एकर आहे. या कि-

ल्ल्यावर पाण्याचा पुरवठा मुळींच नाहीं. इ. स. १८६२ त एकंदर किल्ल्यांची तपासणी झाली त्या वेळीं हा किल्ला अगदीं मोडकळीस आलेला होता व आंत फक्त एक निरुपयोगी जुनी तोफ पडलेली होती.

१६ **मैमतगड.**—हा किल्ला सह्याद्रीच्या एका अतिशय उंच व अवघड अशा शिखरावर बांधलेला आहे. हा किल्ला संगमेश्वर तालुक्यांतील निगुडवाडी नांवाच्या एका खेड्यांत मोडतो. हा किल्ला कुंडी घाटाच्या दक्षणेस २॥ मैलांवर व देवरुखापासून सुमारें ६ मैलांवर आहे व त्याचें क्षेत्रफळ सुमारें ६० एकर आहे. या किल्ल्यांत पाण्याचा वगैरे मुळींच पुरवठा नाहीं. परंतु धान्याचा वगैरे पुरवठा आसपासच्या खेड्यांपाड्यांतून होण्यासारखा आहे. इ. स. १८६२ त या किल्ल्याची सर्वत्र पडापड झालेली होती व आंत चार जुन्या निरुपयोगी तोफा पडलेल्या होत्या.

१७ **उचितगड किंवा प्रचितगड.**--हा किल्ला संगमेश्वर तालुक्यांत शृंगारपूर नांवाच्या खेड्याशेजारीं सह्याद्रीच्या एका फांट्यावर बांधलेला आहे. ह्या किल्ल्याच्या एका अंगास मळे घाट व दुसऱ्या अंगास दक्षिण तिवरा घाट आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें तीन चार एकर आहे. शिड्या लावल्याशिवाय या किल्ल्यावर चढतां येत नाहीं. आंत पाण्याचा वगैरे कांहींच पुरवठा नाहीं. इ. स १८६२ त त्याची बहुतेक पडापड झालेली होती व आंत चार निरुपयोगी जुन्या तोफा पडलेल्या होत्या. इ. स. १८१८ च्या जानेवारी महिन्यांत कर्नल प्रोथर यानें हा किल्ला मराठ्यांपासून घेतला.

रत्नागिरी तालुका.

—:०:—

१८ जयगड.—हा किल्ला शास्त्री नदीच्या मुखाशीं समुद्र-किनाऱ्याला लागून सुमारें दोनशें फूट उंचीच्या एका टेंकडीवर बांधलेला आहे. हा किल्ला मुंबईच्या दक्षिणेस सुमारें ९९ मैलांवर असून त्याचें क्षेत्रफळ अजमासें ४ एकर आहे. त्याच्या तटाचा फार थोडा भाग व एक दोन बुरूज शिवाय करून बाकीचा भाग अद्यापि फार चांगल्या स्थितींत आहे. टेंकडीच्या माथ्यावरील तटबंदी फार मजबूत आहे व तिच्या संरक्षणाकरिता टेंकडीच्या पायथ्याशीं समुद्रकिनाऱ्याच्या बाजूनेंही बळकट तट घातलेला आहे. तसेंच टेंकडीच्या माथ्यापासून खालच्या तटबंदीपर्यंत मध्यंतरीं एक भिंत घातलेली असून तिला बुरूज घातलेले आहेत. वरचा किल्ला व पायथ्याशीं जी तटबंदी आहे तिच्यांत येणारा भाग यांचे क्षेत्रफळ फारच मोठें आहे. हल्लीं या जागेंत तेथील रहिवाशी लोकांच्या थोड्याशा झोपड्या आहेत. किल्ल्याचा वरचा भाग शिवाजीनें बांधला. या भागांत उत्तम इमारती असून पाण्याच्या विहिरीही फार चांगल्या आहेत. समुद्रकांठीं जी तटबंदी आहे, तिला एक चोरदरवाजा आहे. किल्ल्याच्या पूर्वेकडील उतरणीवर खालपासून वरपर्यंत एकसारख्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. या चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याचा मुख्य दरवाजा लागतो हल्लीं किल्ल्याच्या तटावर बरींच झाडेंझुडपें वाढलेलीं आहेत व त्यांचीं पाळेंमुळें आंत शिरल्यामुळें त्याची पडापड सुरू झाली आहे. हल्लीं जेथें गलबतें लागतात तेथें दोन उत्तम पाण्याच्या विहिरी आहेत.

किल्ल्यांतील लोक हल्लीं याच विहिरींचे पाणी पितात. इ० स० १८६२ त या किल्ल्यावर चार पोलीसच्या शिपायांचें एक गेट होतें, व ५५ निरुपयोगी जुन्या तोफा होत्या.

जयगडच्या समोरासमोर सुमारें दोन मैलांवर खाडीच्या पलीकडे डोंगरावर विजयगड नांवाचा एक लहानसा किल्ला आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें पाव एकर असून त्याच्या तीन बाजूंस खंदक आहे. आंत पाणी वगैरे कांहीं नाहीं. इ० स० १८६२त त्याची बहुतेक पडापड झालेली होती व आंत एक निरुपयोगी तोफ पडलेली होती. जयगड हा किल्ला विजापुरच्या बादशाहांनीं सोळाव्या शतकांत बांधला असें सांगतात. पुढें त्याच शतकाच्या अखेरीस नाईक नांवाचा चांचे लोकांचा एक सरदार संगमेश्वर येथें रहात असे, त्यानें तो विजापुरकरांपासून घेतला. हा नाईक बराच प्रबल होता. विजापुरकरांनीं पोर्तुगीज लोकांच्या मदतीनें इ० स०१५८३त व इ०स० १५८८ त त्याच्यापासून जयगड परत घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यानें त्या दोघांस दाद दिली नाहीं. पुढें कान्होजी आंग्र्यानें तो किल्ला सर केला. इ० स० १७१३ त कान्होजी बाळाजी विश्वनाथ याच्या मध्यस्थीनें शाहूमहाराजांच्या पक्षास मिळाला, त्या वेळीं महाराजांनीं कान्होजीला जे दहा अवघड किल्ले दिले, त्यांत या किल्ल्याचें नांव आहे. इ० स० १८१८त लढाईचा वगैरे प्रसंग न येतां हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला.

हल्लीं किल्ल्यांत दोन उत्तम इमारती असून मुलकी कामगार स्वारीमध्यें तेथें गेले ह्मणजे त्यांत राहतात. किल्ल्याचे

पश्चिमेस समुद्राकडचे बाजूस प्रसिद्ध कराटेश्वराचें देवालय आहे.

१९ पूर्णगड.—हा किल्ला मुचकुंदी नदी किंवा पूर्णगडची खाडी हिच्या मुखाशीं रत्नागिरीच्या दक्षिणेस बारा मैळांवर एका समुद्रकिनाऱ्याला लागून असणाऱ्या टेंकडीवर बांधलेला आहे. या किल्लयाचें क्षेत्रफळ सुमारें २२ एकर आहे. या किल्लयाचे आवारांत जी भातशेती आहे तिचें उत्पन्न पेशव्यांच्या कारकीर्दींत गडकरी लोकांना इनामादाखल दिलेलें होतें. इ० स० १८२९ त इंग्लिशांनीं गडकरी लोक काढून टाकिले, तथापि त्यांच्याकडे किल्लयांतील लागवडीची जमीन इनामी म्हणून कायम राहिली. किल्लयाचा सुमारें तीस फूट लांबीचा भाग कोसळून पडला आहे. बाकीचा सर्व किल्ला अद्यापि फार चांगल्या स्थितींत आहे. किल्लयांत कांहीं तोफा व कांहीं गोळे पडलेले आहेत. किल्लयाचे तोंडाशीं एक मारुतीची भव्य मूर्ति बसविलेली आहे. या किल्लयावरून आसमंतात् भागच्या प्रदेशाचा देखावा फार रमणीय दिसतो. शिवाजीनें जे किल्ले बांधले त्यांत हा शेवटीं बांधला व त्याचें नांव पूर्णगड असें ठेविलें अशी दंतकथा सांगतात.

२० रत्नागिरीचाकिल्ला.—हा किल्ला रत्नागिरी बंदराच्या उत्तरबाजूस एका उंच डोंगरावर बांधलेला आहे. या किल्लयाची लांबी १३२७ यार्ड व रुंदी सुमारें १००० यार्ड असून त्याचें क्षेत्रफळ सुमारें १२० एकर आहे. या किल्लयाच्या तीन बांजूंनीं समुद्र आहे. फक्त आग्नेयी बाजूस समुद्र नाहीं. ज्या डोंगरावर हा किल्ला बांधला आहे तो साधारण पूर्वपश्चिम असून त्याची पूर्वबाजू पायथ्यापासून

२०० फूट उंच असून पश्चिमबाजू ३०० फूट उंच आहे. अगदीं पश्चिमेकडील कोपऱ्यापासून ह्मणजे हल्लीं जेथें दीपगृह आहे तेथून उत्तरेकडे निघालें ह्मणजे समुद्राच्या बाजूकडील तुटलेल्या कडयाची उंची कमी होत होत १०० फुटांपर्यंत कमी होते व तेथून एकदम पुनः डोंगर वाढत गेलेला आहे. ह्या डोंगरालाही मजबूत तटबंदी केलेली आहे. त्याची उंची सुमारें २०० फूट आहे. याला बालेकिल्ला असें ह्मणतात. मुख्य किल्ल्याची उत्तरबाजू व बालेकिल्ल्याची दक्षिणबाजू यांच्यामधील प्रदेश अंतर्गोल असून समुद्रानें वेष्टित आहे. याला किल्लाबंदर असें म्हणतात. त्याला लागून किल्ल्यांत एक लहानसें खेडें आहे. तेथील पाणी सर्वोत्कृष्ट असून तेथें माड व इतर झाडें पुष्कळ आहेत. किल्ल्यांत ब्राह्मण, परभू, मराठे, भंडारी, मुसलमान, दालदी, सुतार, तेली, न्हावी, कुळवाडी, गुरव वगैरे लोकांची सुमारें ४०।५० घरें आहेत. हे लोक पूर्वींच्या गडकरी लोकांचे वंशज आहेत.

या किल्ल्याचे बाहेरला व आंतला असे दोन भाग आहेत. किल्ल्यांत जाण्याचा रस्ता आग्नेयी दिशेकडून रत्नागिरी शहरांतून येतो. त्याचा दरवाजा साधारण मध्यावर असून त्याचें तोंड रत्नागिरी शहराकडे आहे. हा दरवाजा दुरुस्त असून त्याला बाहेरच्या बाजूनें मोठमोठे लांब चोंचीचे खिळे मारलेले आहेत. पूर्वीं किल्ल्यांतील लोकांची वाग याच दरवाज्यानें असे. परंतु अलीकडे वर सांगितलेल्या दरवाज्याच्या कांहींसें अलीकडे डोंगर फोडून फार उत्तम सडक बांधली आहे. मुख्य दरवाज्याच्या पश्चिम बाजूस दीपगृहापर्यंत मोठा मजबूत

उंच व रुंद तट घातलेला आहे. दीपगृहापासून बालेकिल्लयापर्यंतची उत्तरेच्या अंगची बाजू सखल होत गेलेली आहे. या बाजूनें एकसारखा तुटलेला कडा आहे. ज्या ठिकाणीं कड्याची उंची अगदीं कमी झालेली आहे, तेथें मात्र तटबंदी केलेली आहे. पुढें बालेकिल्ला लागतो. ज्या टेंकाडावर बालेकिल्ला बांधलेला आहे, तें मुख्य डोंगरापासून अगदीं अलग आहे. उत्तरेच्या बाजूस मुख्य किल्लयाची बाजू व बालेकिल्ला यांचे दरम्यान् जेथें समुद्राचें फासूं आहे, तेथें किनाऱ्याच्या बाजूनें अतिशय मजबूत, रुंद व उंच असा तट घातलेला आहे. ह्या तटाला ठिकठिकाणीं बुरूज ठेविलेले आहेत. बंदराच्या तोंडाशींच किल्लयांतील लोकांची वस्ती असून जेथें वरव्याची जागा आहे तेथें एक भक्कम दरवाजा आहे. ही सर्व तटबंदी धोंडो भास्कर प्रतिनिधि यानें इ० स० १७९० च्या सुमारास बांधली, अशी दंतकथा सांगतात. उत्तर दिशेकडून पूर्वेकडे निघालें म्हणजे पुनः चढाव सुरू होतो, व त्या बाजूनें खालच्या भागापासून वर डोंगराच्या माथ्यावर येईपर्यंत एकसारखी भिंत बांधलेली आहे. या ठिकाणीं एक मोठा भक्कम बुरूज बांधलेला आहे, व तेथून डोंगराच्या माथ्यावरून मुख्य दरवाज्यापर्यंत एकसारखा मजबूत तट घातलेला आहे.

बालेकिल्ला मुख्य किल्लयापासून अगदीं अलग असून त्याचें क्षेत्रफळ ६॥ एकर आहे. ज्या टेंकाडावर हा किल्ला बांधलेला आहे, त्याचा माथा सपाट असून तें मुख्य किल्लयाच्या उत्तर दिशेस आहे. मुख्य किल्ला शत्रूच्या हातांत गेला, तथापि बालेकिल्लयांत सामानसुमानाचा पुर-

वठा असेल तर शत्रूला दाद न देतां पुष्कळ दिवस तेथें तग काढितां येईल. त्याची तटबंदी अतिशय मजबूत आहे. आंत जाण्यास फक्त एकच दरवाजा आहे. परंतु तो फार मजबूत आहे, उत्तर व पश्चिम या दिशांस तुटलेले भयंकर कडे असल्यामुळें त्या बाजूस तटबंदी नाहीं, व बाकीच्या दोन बाजूंची तटबंदी फारच भक्कम रीतीनें बांधलेली आहे. हल्लीं या तटबंदीचा कांहीं भाग ढांसळला आहे. आंत भगवतीचें देवालय असून त्याला सालीना सरकारांतून ५२ रुपयांची नेमणूक आहे. देवालयाशिवाय आंत एक लहानसें तळें, एक खोल विहीर, व एक अतिशय जुनाट पिंपळाचा वृक्ष आहे. विहीरीचें पाणी उन्हाळ्यांत आटतें. पिंपळाचा वृक्ष खालच्या सपाट प्रदेशापासून जरी सुमारें ३०० फूट उंचीवर निवळ खडकावर वाढलेला आहे तरी तो नेहमीं विलक्षण टवटवीत दिसतो. किल्ल्याच्या पायथ्याशीं नैऋत्य व वायव्य कोपऱ्यांत कांहीं बोगदे आहेत. व त्यांतून वर किल्लयांत जातां येतें असें सांगतात; व कदाचित् ती गोष्ट खरीही असेल. कारण ज्या ठिकाणीं किल्ल्यांत विहीर आहे तेथून उत्तम पायऱ्या बांधलेलें असें एक भुयार असून तो रस्ता वर सांगितलेल्या बोगद्यांत जाऊन मिळत असावा असा पुष्कळ संभव आहे. किल्ला कदाचित् शत्रूच्या हातांत जाण्याचा प्रसंग आला तर आपली सुटका करून घेतां यावी एवढ्याकरितां ती तजवीज केलेली असावी असें वाटतें.

किल्ल्याच्या बांधणीचें काम कांहीं मुसलमानी तऱ्हेचें व कांहीं मराठी तऱ्हेचें आहे. किल्ल्याचा मूळचा भाग म्हटला म्हणजे बालेकिल्ल्याचा पायथा व किल्लामंदर यांचे

दरम्यान् जी भिंत आहे ती व बालेकिल्ल्याची कांहीं तटबंदी हा होय. हें काम बहामणी राजांच्या कारकीर्दींत (इ० स० १३४३–१५००) झालें अशी दंतकथा सांगतात. परंतु तिकडील प्रदेश बहामणी राजांच्या तांब्यांत होता असा दाखला क्वचित् सांपडतो. तेव्हां तें काम विजापुरच्या राजांनीं (इ.स.१५००-१६६०)बांधलें असावें असें अनुमान होतें. इ० स १६७०त शिवाजीनें हा किल्ला जिंकून घेतला, व त्यानें बाहेरच्या मुख्य किल्ल्याचें काम केलें, व त्याच्या संरक्षणाकरितां ह्मणून मिऱ्या डोंगरावर एक व हल्लीं अदालत किंवा डिस्ट्रिक्ट जज्जाची कचेरी आहे तेथें एक असे दोन मजबूत बुरूज बांधले. ज्या बुरुजावर हल्लीं दीपगृह आहे, त्याला सिद्दबुरूज असें म्हणतात. याचें कारण असें आहे कीं, एकदा विजयदुर्गाच्या धुलपाशीं लढाई चालली असतां किल्ल्याचा सिद्दी सरदार त्या बुरुजावर पडला. बालेकिल्ल्याची विशेष मजबुती आंग्र्यांनीं केली असें सांगतात (इ० स. १७१०–१७५५). इ० स० १८६२त या किल्ल्याची स्थिति बरीशी नसून आंत ११७ निरुपयोगी तोफा पडलेल्या होत्या. हल्लींही या किल्ल्याची तीच स्थिति आहे.

रत्नागिरीच्या बंदरांत खडक असल्यामुळें खलाशी लोकांस त्याची वर्दी मिळावी म्हणून रत्नागिरी किल्ल्याच्या अगदीं पश्चिम टोंकावर सिद्दबुरुजावर इंग्लिश सरकारानें एक दीपगृह ठेवलेलें आहे. या दीपगृहाची उंची समुद्रापासून सुमारें ३०० फूट आहे. त्यांत रात्रीस दिवा जळत असतो. हा दिवा सुमारें १० मैलांवरून दिसतो. रत्नागिरी येथील आगबोटीवर जाणाऱ्या उतारूंस वर्दी देण्या-

करितां याच बुरुजावर बावटा लावण्याकरितां एक उंच काठी पुरलेली आहे.

बालेकिल्ल्यांतील भगवती देवीचा उत्साह नवरात्रांत होत असतो, त्या वेळीं तेथें बरीच यात्रा जमते. या देवीचे जे मानकरी आहेत, त्यांत तिचा भालदार मुसलमान आहे, व त्याबद्दल त्याला मराठ्यांच्या वेळेपासून सनद मिळालेली आहे. किल्ल्यांतील मराठ्यांच्या बायका मोठ्या उद्योगी असून दररोज सडीक बांदूळ तयार करून ते रत्नागिरी शहरांत आणून विकतात व त्या धंद्यावर आपला उदरनिर्वाह करितात.

२१ विजयगड:--हा किल्ला शास्त्रीनदीच्या किंवा जयगडच्या खाडीच्या उत्तरतीरावर जयगडापासून २ मैलांवर नदीच्या पलीकडे आहे. हा किल्ला फारच लहान आहे. याच्या तीन बाजूंस खंदक आहे. आंत एक निरुपयोगी जुनी तोफ आहे. त्याची बहुतेक पडापड झालेली आहे. धान्य व पाणी यांचा पुरवठा आसपासच्या खेड्यांतून होण्यासारखा आहे.

राजापुर तालुका.

२२ आंबोळगड.—हा किल्ला जैतापुरच्या खाडीच्या मुखाशीं उत्तरेच बाजूस आहे. समुद्राच्या सपाटीपासून थोड्याशा उंचवट्याच्या जागेवर हा किल्ला बांधलेला आहे. त्याच्या उत्तर व पश्चिम या दोन बाजूंस खंदक आहे. किल्ल्याचें क्षेत्रफळ १२१० चौरस यार्ड आहे. इ०स० १८१८ त कर्नल इम्लाक यानें हा किल्ला मराठयांपासून घेतला. इ० स० १८६२ त या किल्ल्यांतील घरें, त्याचा तट, त्याचे बुरूज या सर्वांची

पडापड झालेली होती. या किल्ल्याचे संबंधानें ऐतिहासिक अशी कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. परंतु जैतापुरच्या खाडीचें मुख त्याच्या माऱ्यांत असल्यामुळें मराठयांचे वेळीं त्याचा फार उपयोग झाला असेल असें वाटतें. रत्नागिरी जिल्ह्यांतील प्रत्येक खाडीच्या मुखाशीं एक किल्ला आहेच.

२३ **यशवंतगड**.—हा किल्ला राजापूर किंवा जैतापूर या खाडीच्या उत्तरेकडील तीरावर तिच्या मुखाशीं आहे. दक्षिणेच्या बाजूस समुद्र आहे, व उत्तर व पश्चिम या बाजूंस खंदक आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें सात एकर आहे. किल्ल्याच्या तटाला एकंदर १७ बुरूज आहेत. इ० स० १८६२ त किल्ल्यांची जी पहाणी झाली, त्या वेळीं किल्ल्याचे दरवाजे व त्याचा तट मोडकळीस आलेला होता, व आंत २८ निरुपयोगी जुन्या तोफा पडलेल्या होत्या. हल्लींही या किल्ल्यावर कांहीं तोफा पडलेल्या आहेत, व त्याचा तटही नादुरुस्त झालेला आहे. आंत पाण्याचा वगैरे चांगला पुरवठा आहे. येथें इतिहासप्रसिद्ध अशी विशेष गोष्ट घडून आल्याचें दिसत नाहीं.

२४ **राजापुरचा किल्ला**--हा किल्ला राजापुरच्या किंवा जैतापुरच्या खाडीच्या कांठीं राजापूर शहरांत बांधलेला आहे. त्याला किल्ला म्हणण्यापेक्षां गढी असें म्हटलें तर चांगलें शोभेल. हल्लीं या गढींत मामलेदाराची कचेरी आहे. ही गढी साधारण उंचवटयाच्या जागीं बांधलेली असून पूर्वीं तिच्या दक्षिणेकडील बाजूस खंदक होता. हल्लीं तो खंदक भरून गेलेला आहे. या गढीचा तट मजबूत असून तिला दोन बुरूज आहेत. ती इ० स० १८१८ त कर्नल इम्लाक साहेबानें घेतली. इ० स०

१८६२ त तिची साधारण पडापड झालेली होती, व आंत ४ जुन्या निरुपयोगी तोफा पडलेल्या होत्या. इ० स० १७१३ त कान्होजी आंग्रे शाहूच्या पक्षास मिळाल्यामुळें त्यानें त्याला कोकणांत जे सोळा सवघड किल्ले बक्षिस दिले त्यांत या किल्लयाचें नांव आहे. या गोष्टीवरून पूर्वीं याला बरेंच महत्त्व असावें असें वाटतें.

२५ **साठवलीचा किल्ला.**—साठवली हा गांव मुचकुंदी नदी किंवा पूर्णगडची खाडी हिच्या कांठीं तिच्या मुखापासून सुमारें १२मैलांवर आहे. या गावीं नदीच्या कांठीं एक लहानसा किल्ला बांधलेला आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें॰ $\frac{1}{2}$ एकर आहे. त्याच्या तटाला एकंदर सहा बुरूज आहेत. साठवली या गांवीं मुसलमान लोकांची बरीच वस्ती आहे व तेथें बरींच जुनीं घराणीं आहेत. ते लोक असें सांगतात कीं, पूर्वीं साठवली येथें फार मोठा व्यापार चालत असे व त्याच्या संरक्षणाकरतांच तेथील किल्ला बांधलेला होता. शाहूमहाराजांनीं कान्होजी आंग्र्यास इ० स० १७१३त जे सोळा सवघड किल्ले दिले, त्यांत या किल्लयाचें नांव मोडतें. इ० स० १८१८ त त्याचें स्वामित्व इंग्लिशांकडे आले. हल्लीं या किल्लयाची सर्वत्र पडापड झालेली आहे, व आंत एक जुनी निरूपयोगी तोफ पडलेली आहे.

देवगड तालुका

—:*:—

विजयदुर्ग किंवा घेरिया—हा किल्ला देवगड तालुक्यांत मुंबईच्या दक्षिणेस १७० मैलांवर आहे. हा

किल्ला फार मजबूत असून फार प्रसिद्ध आहे. हा किल्ला एका खडकावर बांधलेला आहे. समुद्राच्या बाजूनें पाहिलें तर सकृद्दर्शनीं हा किल्ला फार मजबूत असावा असा तर्क होत नाहीं. खाडीच्या बाजूनें या किल्लयाची चढण सुमारें १०० फूट आहे. त्याचा तट अतिशय मजबूत असून त्याला २७ बुरूज आहेत. पश्चिमेकडील तटावर त्याची दागदुजी नसल्यामुळें समुद्राच्या लाटा नेहमीं आदळत असल्यामुळें त्याला कांहीं ठिकाणीं खिंडारें पडलीं आहेत, व त्यावर मोठमोठीं झाडेंझुडपें वाढून त्यांचीं पाळेंमुळें तटांत शिरल्यामुळें तो ढिला झाला आहे. किल्लयाचा तट तिहेरी असून त्याचें क्षेत्रफळ सुमारें २० एकर आहे. ततटावर झाडेंझुडपें बरींच वाढलेलीं आहेत. या किल्लयांत उत्तम पाण्याच्या विहिरी, व वसति करण्यासारख्या इमारतीही बऱ्याच आहेत. या किल्लयाच्या एकंदर स्थितीवरून पाहतां तो फार प्राचीन असावा असा तर्क होतो. प्रथमतः विजपुरच्या बादशाहांनीं तो वाढविला. पुढें इ० स० १६५४ च्या सुमारास शिवाजीनें त्याची फारच उत्तम रीतीनें दागदुजी केली. किल्लयाचा तिहेरी तट, त्याचे बुरूज, व त्यांतील भव्य इमारती इत्यादि सर्व गोष्टी शिवाजीनें केलेल्या आहेत. नंतर सुमारें ४० वर्षांनीं म्हणजे इ० स० १६९८ त मराठ्यांच्या आरमाराचा सरदार कान्होजी आंग्रे यानें १५० मैल लांब व ४० पासून ६० मैलांपर्यंत रुंद एवढा कोंकणपट्टीचा प्रदेश आपले अमलांत आणून त्या प्रांताचें मुख्य ठाणें विजयदुर्ग येथें ठेविलें. सुमारें २० वर्षपर्यंत आंग्र्यांनीं समुद्रावर आपली सत्ता अनियंत्रित चालविली,

व सर्व व्यापारी मंडळ्यांस आंग्रयांची अतिशय दहशत बसून गेलेली होती. केवळ आंग्र्यांपासून आपणांस त्रास पोहोंचूं नये एवढ्याच कामाकरितां इंग्लिशांनीं त्या वेळीं एक निराळेंच आरमार ठेविलें होतें. इ० स० १७१७ च्या एप्रिल महिन्यांत इंग्लिशांचें आरमार विजयदुर्ग किल्ल्यावर चाल करून गेलें. या आरमाराबरोबर इंग्लिशांचे पुष्कळ घोडेस्वार होते. इंग्लिशांनीं किल्ल्याचा तट फोडण्याकरितां आपला तोफखाना सुरू केला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इंग्लिशांनीं किल्ल्यावर हल्ला केला, परंतु आंग्र्यांनीं त्यांना पिटाळून लाविलें. या स्वारींत इंग्लिशांचें अतिशय नुकसान झालें, व त्यांचें आरमार विजयदुर्ग येथून पळून गेलें. नंतर तीन वर्षांनीं म्हणजे इ० स० १७२० त इंग्लिश व पोर्तुगीज हे दोघे मिळून त्यांनीं विजयदुर्गावर हल्ला करून आंग्र्यांचीं १६ लढाऊ गलबतें फोडून टाकिलीं; त्यांनीं किल्ल्याच्या तटाला खिंडार पाडण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या कामांत त्यांना यश आलें नाहीं. या स्वारींत वालटर ब्राऊन हा इंग्लिश अमलदार होता. त्याच वर्षाच्या एप्रिल महिन्यांत आंग्र्यांनीं इंग्लिशांच्या चारलोटी नांवाच्या लढाऊ जहाजावर हल्ला केला. गलवतावरील लोकांनीं आपली शिकस्त केली. परंतु आंग्रयांच्या लोकांनीं त्यांचा पराभव करून तें गलबत विजयदुर्ग येथें आणिलें. इ० स० १७२४ त बटेविया येथून डच लोकांनीं विजयदुर्गावर आपलें आरमार पाठऊन दिलें. परंतु आंग्र्यांनीं त्याचा पराभव करून त्यास पिटाळून लाविलें. इ० स० १७३६ त आंग्र्यांनीं इंग्लिशांचें डरबी नांवाचें

मालानें भरलेलें एक गलबत, रेस्टोरेशन नांवाचें एक लढाऊ गलबत, व दुसरीं लहान सहान पुष्कळ गलबतें धरिलीं. इ० स० १७३८ त इंग्लिशांचा सरदार कमोडर बागवेल व आंग्रे यांच्यामध्यें समुद्रांत युद्ध होऊन आंग्र्यांचें आरमार राजापुरच्या खाडीपर्यंत हटत गेलें. परंतु त्यांत आंग्र्यांचें फारसें नुकसान झालें नाहीं. विजयदुर्ग येथें राहून आंग्रे वरचेवर बाहेरील लोकांचीं गलबतें धरून नेत असत. त्यांनीं डच लोकांचीं बरींच गलबतें धरलीं होतीं. तसेंच इ० स० १७४० च्या सुमारास त्यांनीं फ्रेंचांचें जुपीटर नांवाचें लढाऊ जहाज धरून नेलें. या गलबतावर ४० तोफा असून फ्रेंचांचे ४०० गुलाम होते. इ० स० १७४९ त आंग्र्यांनीं सर वुलियम जेम्स याच्या आरमारावर हल्ला केला. या ठिकाणीं उभय पक्षांची मोठी निकराची लढाई होऊन तींत आंग्र्यांस विजयदुर्गास पळून यावें लागलें, व त्यांचें फार नुकसान झालें. इ० स० १७५० त आंग्र्यांनीं पुनः कमोदर लिसल याच्या हाताखालील आरमारावर हल्ला केला. हें आरमार फार मोठें होतें, व त्यांत विजिलंट नांवाचें एक जहाज असून त्यावर ६४ तोफा होत्या, व दुसरें रूबी नांवाचें जहाज असून त्यावर ५० तोफा होत्या. इ० स० १७५४ त आंग्र्यांनीं डच लोकांच्या तीन जहाजांवर हल्ला करून त्यांपैकीं दोन बुडविलीं, व एक धरून आणिलें. त्यांपैकीं एकावर ५० दुसऱ्यावर ३६ व तिसऱ्यावर १८ तोफा होत्या. ह्या विजयामुळें आंग्र्यांस जोर येऊन त्यांनीं आपलें आरमार ज्यास्त वाढविलें. या पूर्वींच आंग्रे व पेशवे यांच्यामध्यें कांहीं तेढ उत्पन्न झाली होती. मुंबईसरकारास

आंग्र्यांचें भय होतेंच. तेव्हां पेशव्यांच्या मदतीनें त्यांनीं आंग्र्यांचें पारिपत्य करण्याचा विचार केला. त्या उभयतांत जो तह झाला त्यांत असें ठरलें कीं, पेशव्यांनीं जमिनीकडून व इंग्लिशांनीं समुद्रावरून आंग्र्यांवर स्वारी करावी. इ. स. १७५५च्या दिजंबर महिन्याच्या २२व्या तारखेस कमोदार जेम्स हा विजयदुर्ग किंवा घेरिया या किल्ल्याची टेहेळणी करण्याकरितां गेला. त्या वेळीं घेरिया किल्ला अतिशय दुर्गम अशी त्याची प्रसिद्धि होती. तपासणीच्या अंतीं पूर्वीं त्या सरदाराला तो किल्ला जितका बिकट वाटला होता तितका बिकट दिसून आला नाहीं. त्या वेळीं मुंबईस अडमिरल वाटसन याच्या हाताखालीं विलायतेहून गलबतें आलेलीं होतीं, व लार्ड क्लाईव्ह याच्या हाताखालीं एक जंगी स्वारांची टोळी होती. तारीख ७ अप्रील इ. स. १७५६रोजीं इंग्लिशांचीं १२ लढाऊ जहाजें, पांच बांब जहाजें, ४ देशी गलबतें, ४० होड्या, ८०० युरोपियन लोक व ६०० काळे लोक इतकें सैन्य घेरिया किल्ला सर करण्याकरितां निघालें. प्रथमतः किल्ल्यांतील लोकांना बंदराबाहेर पडूं देऊं नये ह्मणून इंग्लिशांनीं कांहीं जहाजें पुढें पाठवून बंदरांतून बाहेर पडण्याचा रस्ता रोंखून टाकिला. बाकीचें आरमार तारीख ११ रोजीं विजयदुर्गास येऊन पोहोंचलें. काळे लोकांनीं जमिनीच्या बाजूनें किल्ल्यास वेढा दिला. इंग्लिशांची कडेकोट तयारी पाहून तुळाजी आंग्र्या भिऊन गेला, व विजयदुर्ग आपल्या भावाच्या स्वाधीन करून आपण पेशव्यांच्या सरदाराच्या स्वाधीन झाला. त्या सरदारानें किल्ला खालीं करून द्यावा असा हुकूम तुळाजीपासून जोरानें घेतला. दुसऱ्या दिवशीं ह्मणजे तारीख

१२ रोजीं अडमिरल वाटसन यास ती बातमी समजतांच त्यानें किल्ला खालीं करून द्यावा ह्मणून आंग्र्यांस निरोप पाठविला. परंतु आंतून त्यांचें कांहींच उत्तर आलें नाहीं. तेव्हां वाटसन आपलीं गलबतें घेऊन पुढें गेला. किल्ल्यां-तील लोकांनीं इंग्लिशांच्या आरमारावर तोफांचा भडिमार चालविला; परंतु त्यास न जुमानतां वाटसन साहेब उ-त्तरेकडील तटापासून ५० कदमांच्या अंतरावर आपलीं गलबतें घेऊन गेला. आंग्र्यांचें आरमार किल्ल्याचे पाय-थ्यांशीं असून त्यांतील सर्व जहाजें एकमेकांस बांधून टाकिलेलीं होतीं. इंग्लिशांनीं आपला तोफखाना सुरू केला त्या वेळीं एक गोळा आंग्र्यांच्या आरमारापैकीं एका गलबतावर पडून त्यानें पेट घेतला; त्यामुळें तें सर्व आरमार जळून गेलें. या वेळीं आंग्र्यांचीं एकंदर ६९ गलबतें जळलीं. दुसरा एक गोळा किल्ल्यांतील इमारतींवर जाऊन पडल्यामुळें त्यांनींही पेट घेतला, व सर्व किल्ल्यांत आगीचा डोंबाळा होऊन गेला. इतकें झालें तरी किल्ले-दारानें किल्ला सोडिला नाहीं. आंग्र्यांचे मनांतून तो किल्ला पेशव्याचे हवालीं करावयाचें होतें. परंतु क्लाईव्ह साहेबास ती बातमी कळतांच तो जमीनीवर आपले लोक घेऊन उतरला व पेशव्याची फौज व किल्ला यांचे दरम्यान् त्यानें आपला तळ दिला. दुसरे दिवशीं सकाळीं किल्ला खालीं करून देण्याविषयीं वाटसन साहे-बानें पुनः निरोप पाठविला. किल्लेदारानें विचार कर-ण्याकरितां कांहीं वेळ मागून घेतला, परंतु तितक्या मुद-तींत त्यानें कांहींच उत्तर पाठविलें नाहीं. तेव्हां किल्ल्यावर पुनः तोफांचा भडिमार होऊं लागला. शेवटीं नाइलाज

होऊन तारीख १३ रोजीं संध्याकाळचे पांच वाजण्याचे सुमारास किल्लेदारानें तो किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन केला. इंग्लिशांनीं आंग्र्यांचे १५०० लोक कैद केले. किल्ल्यांत ८ इंग्लिश व ३ डच लोक आंग्र्यांनीं कैदेंत ठेविलेले होते त्यांची सुटका झाली. किल्ल्यांत एकंदर १२॥ लाख रुपयांची लूट इंग्लिशांस मिळाली. नंतर इंग्लिशांनीं आपलीं ४ जहाजें व ६०० लोक विजयदुर्ग येथें बंदोबस्ताकरितां ठेविले. तुळाजी आंग्रे मरेपर्यंत कैदेंतच होता. तुळाजी कोठें मरण पावला या संबंधानें निरनिराळे लेख आहेत. एके ठिकाणीं तो विजयदुर्गच्या किल्ल्यांत मरण पावला असें लिहिलें आहे; एके ठिकाणीं तो रायगडाजवळ मरण पावला असें लिहिलें आहे; व एके ठिकाणीं त्याला प्रथमतः सातारा जिल्ह्यांत वंदन येथें कैदेंत ठेविलें होतें. नंतर त्याला सोलापुरास पाठवून दिलें; तेथें तो मरण पावला, असेंही लिहिलेलें आहे. तथापि त्याचें थडगें व त्याच्या सहा बायकांचीं थडगीं विजयदुर्ग येथें बांधलेलीं आहेत, त्यावरून तो तेथेंच मेला असावा असें वाटतें.

आंग्र्यांचें बंड मोडण्याकरितां या वेळीं पेशवे व इंग्लिश एक झालेले होते. विजयदुर्ग हातीं आल्यावर तो किल्ला व तें बंदर आपले ताब्यांत असावें व त्याबद्दल इंग्लिशांचें बाणकोट बंदर पेशव्यांनीं घ्यावें असें इंग्लिशांनीं पेशव्यांचे दरबारीं बोलणें चालविलें. परंतु पेशवे त्या गोष्टीस कबूल झाले नाहींत, त्यामुळें इ० स० १७५७ च्या आक्टोबर महिन्यांत इंग्लिशांस विजयदुर्ग पेशव्यांचे हवालीं करणें भाग पडलें. पुढें पेशव्यांनीं आपल्या तिकडील राज्याचें तें मुख्य ठाणें करून त्यांचा आरमाराचा सरदार

आनंदराव धुळप यास तेथें ठेविलें. विजयदुर्ग येथें आनंदरावाचे वंशज अद्यापि आहेत. धुलपांनींही समुद्रांत पुढें इंग्लिशांना फार त्रास दिला. आनंदरावानें इ० स० १७८० त इंग्लिशांचें एक गलबत पकडलें, व त्यावरील अमलदारास कैद करून महाबळेश्वराजवळच रसाळगडावर पाठवून दिलें. इ० स० १७८२ त त्यानें दुसरें एक इंग्लिशांचें जहाज धरिलें. इ० स० १८०० त लेफटेनेंट हेयीस यास मराठ्यांच्या आरमाराचा नाश करण्याकरितां इंग्लिशांनीं पाठवून दिलें. त्या साहेबानें पुष्कळ ठिकाणीं मराठ्यांच्या आरमाराचा नाश केला. परंतु थोड्याच वेळांत मराठे पुनः बळावले, व पूर्वींप्रमाणें चांचे-पणा करून त्यांनीं इंग्लिशांस त्राहि त्राहि करून सोडिलें. इ.स.१८१८ त कर्नल इम्लाक साहेब विजयदुर्ग घेण्याकरितां गेला. त्या वेळीं धुलपानें त्याच्यावर तोफांचा असा भडिमार चालविला कीं, त्याला आपल्या गलबतांचे दोर कापून पळून जावें लागलें. परंतु त्या वेळीं किल्ल्याच्या सभोंवतालचा सर्व प्रदेश इंग्लिशांचे ताब्यांत आला होता त्यामुळें नाइलाज होऊन त्या वर्षाच्या जून महिन्यांत धुलपांनीं तो किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन केला.

२७ **बहिरवगड**.—हा किल्ला सह्याद्रीच्या एका शिखरावर बांधलेला असून तो देवगड तालुक्यांत दिग-वलें नांवाच्या खेड्यांत मोडतो. त्याचें क्षेत्रफळ चार पा-सून पांच एकरांपर्यंत आहे. इ० स० १८६२ त त्याची पहाणी झाली तेव्हां पूर्वीं तेथें किल्ला होता किंवा नव्हता याची खूण सुद्धां उरली नव्हती.

२८ **देवगड**.—हा किल्ला विजयदुर्गाच्या दक्षिणेस

१२ मैलांवर देवगड शहराच्या दक्षिणेच्या अंगास आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें १२० एकर आहे, व सुमारें १७५ वर्षांपूर्वी तो आंग्रचांनीं बांधला असावा असें सांगतात. हा किल्ला इंग्लिशांचा सरदार कर्नल इम्लाक यानें इ० स० १८१८ च्या एप्रिल महिन्यांत मराठ्यांपासून घेतला. ता. ७ एप्रिल रोजीं कर्नल इम्लाक याची टोळी देवगड येथें येऊन पोहोंचली. त्या रात्रीस किल्ल्यांतील लोकांनीं इंग्लिशांवर मोठ्या जोरानें मारा चालविला होता. परंतु त्यापासून इंग्लिशांचें मुळींच नुकसान झालें नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं किल्ल्यांतील लोक किल्ला सोडून गलबतांत बसून पळून गेले.

ह्या किल्ल्यावरून देवगडच्या बंदरावर चांगला मारा लागू पडतो. देवगडच्या खाडीवर एखादें विशेष महत्त्वाचें ठिकाण नसल्यामुळें पूर्वीपासून या किल्ल्याला फारसें महत्त्व नव्हतें. समुद्र व बंदर यांचे दरम्यान् जो डोंगर आहे, त्याच्या उत्तर व दक्षिण या टोंकांस पूर्वी दोन किल्ले असून त्यांच्यामध्यें एक तट होता व त्याला चार बुरूज होते. हल्लीं या किल्ल्यांचा मागमूस राहिला नाहीं. इ० स० १८६२ त देवगड किल्ल्याची फार पडापड झालेली होती व आंत शिबंदी वगैरे कांहीं एक नव्हतें. आंत पाणी विपुल होतें, परंतु धान्याचा फारसा पुरवठा नव्हता. तसेंच आंत ४१ जुन्या निरुपयोगी तोफा पडलेल्या होत्या.

२९ खारेपाटणचा किल्ला.—खारेपाटण हा गांव विजयदुर्गच्या खाडीच्या उत्तर तीरावर आहे. हा गांव मराठ्यांचे

वेळीं फार प्रसिद्ध होता. इ. स. १८१८ पासून इ. स. १८७५ पर्यंत तेथें देवगड तालुक्याचें मुख्य ठाणें होतें. त्या गांवाला लागूनच एक लहान डोंगर आहे,त्यावर एक किल्ला बांधलेला आहे, त्याला खारेपाटणचा किल्ला असें ह्मणतात. इ.स.१८९० त या किल्ल्याचा तट व बुरूज पाडून ते दगड वाघोटण येथें उतारू लोक उतरण्याकरितां खाडीवर धक्का बांधण्याकरितां नेले. किल्ल्यांत अद्यापि बारा तेरा मशिदींच्या खाणाखुणा दृष्टीस पडतात. जाम नांवाची ह्मणून जी एक मशीद दाखवितात तिचें क्षेत्रफळ फारच मोठें आहे.

मुसलमानांचे ताब्यांत हा किल्ला बरेच दिवस असावा असें दिसतें. सतराव्या शतकाच्या अखेरीस तो कान्होजी आंग्रे यानें मुसलमानांपासून घेतला. इ. स. १७१३त बाळाजी विश्वनाथ याच्या मध्यस्थीनें शाहूमहाराज व कान्होजी आंग्रे यांच्यामध्यें सलोखा होऊन महाराजांनीं त्याला जे १६ सवघड किल्ले दिले, त्यांत खारेपाटणचा किल्ला हा एक होता. इ. स. १७५६ पर्यंत त्याचें स्वामित्व आंग्र्यांकडे होतें. पुढें पेशवे व आंग्रे यांच्यांत बेबनाव होऊन इंग्लिश व पेशवे मिळून त्यांनीं आंग्र्यांचीं बरींच ठाणीं घेतलीं; त्या वेळीं खारेपाटणचा किल्ला पेशव्यांनीं घेतला. तो इ. स. १८१८ पर्यंत पेशव्यांचे ताब्यांत होता. पुढें त्याचें स्वामित्व इंग्लिशांकडे आलें. पूर्वीं तेथें किल्ला होता किंवा नव्हता याचीच हल्लीं भ्रांति पडूं लागली आहे.

३० कोटकामतें:--कामतें हा गांव देवगड तालुक्यांत आहे. येथें पूर्वीं एक लहान किल्ला किंवा कोट होता. त्यावरून हल्लीं त्या गांवाला कोटकामतें असें ह्मणण्याचा

प्रघात पडलेला आहे. हा किल्ला भुईकोट आहे, व त्याचें क्षेत्रफळ ¾ एकर आहे. या किल्लयाला पूर्वी खंदक होता. हल्लीं तो भरून गेलेला आहे, व तेथें हल्लीं लागवड करितात. इ० स० १८६२ त या किल्लयाची सर्वत्र पडापड झालेली होती, व भगवतीच्या देवालयाजवळ जुन्या निरुपयोगी अशा चार तोफा पडलेल्या होत्या.

मालवण तालुका

—:*:—

२१ भरतगड.—हा किल्ला मालवण तालुक्यांत मसुरें नांवाच्या गांवा शेजारीं एका उंच डोंगरावर बांधलेला आहे. ह्याचें क्षेत्रफळ सुमारें ५।६ एकर आहे. आंत बालेकिल्ला आहे त्याचा आकार लांबोळा आहे. त्याची लांबी १५० यार्ड व रुंदी ६० यार्ड आहे, व त्याचा तट सुमारें १८ फूट लांब व ५ फूट रुंद आहे. तसेंच उत्तरेच्या व दक्षिणेच्या टोंकांस दोन बुरूज आहेत. याशिवाय मध्यंतरीं एक बुरुज असून त्याला वर जाण्यास पायऱ्या बांधलेल्या आहेत. उत्तरेकडील तटाजवळ एक लहानसें देवालय असून त्याच्याजवळ एक विहीर आहे. ही विहीर २२८ फूट खोल आहे. किल्लयाच्या मुख्य तटाला अर्धचंद्राकृति असे सुमारें १० बुरूज आहेत. ह्या तटाची उंची सुमारें १२ फुट आहे, व त्याच्या बाहेर खंदक आहे. हा तट विशेष मजबूत नाहीं.

ह्या डोंगरावर किल्ला बांधावा अशा हेतूनें इ० स०

१६७० त शिवाजीनें त्याची पाहणी केली, परंतु तेथें पाण्याची कांहींच सोय न दिसल्यामुळें त्यानें तो बेत रहित केला. पुढें इ० स० १६८० च्या सुमारास वाडीकर फोंड सावंत व कोल्हापुरचे पंतप्रतिनिधि (बावडेकर) यांचेमध्यें तंटा लागला. तेव्हां संकटसमयीं आपल्या रक्षणाकरतां ह्मणून या डोंगरावर किल्ला बांधावा असें फोंड सावंत याचे मनांत आलें. नंतर त्यानें प्रथमतः तेथें विहीर पाडण्यास आरंभ केला, व तिला पाणी लागलें तेव्हां त्यानें तेथें किल्ला बांधला(इ० स० १७०१). इ० स० १८६२ त या किल्ल्याचे तट वगैरे नीट दुरस्त होते, व आंत निरुपयोगी अशा १८ तोफा पडलेल्या होत्या. सावंतांचे ताब्यांत असतां येथें बऱ्याच झटापटी झालेल्या आहेत.

३२ भगवंतगड—हा किल्ला मालवण तालुक्यांत एका उंच डोंगरावर बांधलेला आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें १॥ एकर आहे. आंत पाण्याचा पुरवठा नाहीं, व निरुपयोगी अशा १४ तोफा पडलेल्या आहेत. आंत एक लहानसें देवालय आहे. फोंड सावंत यानें इ० स० १७०१ त भरतगड बांधला त्याच सुमारास त्याचे प्रतिस्पर्धि बावडेकर यांनीं हा किल्ला बांधला. इ० स० १८१८ त कर्नल इम्लाक यानें मराठ्यांपासून हा किल्ला घेतला. या संबंधाची हकीगत अशी आहे कीं, " इम्लाक साहेब आपल्या फौजेनिशीं तारीख २९ मार्च रोजीं येथें येऊन पोहोंचला व रात्रीच्या रात्रीस मेढेकोट तयार करून सकाळच्या प्रहरीं त्यानें किल्ल्यावर तोफांचा मारा चालविला. इंग्लिशांची फौज कालावली नदीच्या पलीकडे असल्यामुळें

त्यांच्या तोफांचा कांहीं उपयोग होईना. नंतर शिड्या लावून किल्ल्यावर हल्ला करावा अशा हेतूनें इम्लाक साहेबानें आपल्या फौजेच्या दोन टोळ्या केल्या व त्यांवर क्यापटन ग्रे व पियरसन या दोन साहेबांस नेमून त्या पाठवून दिल्या. नंतर ते लोक नदी उतरून अलीकडे आले. किल्ल्यावरील शिबंदीनें इंग्लिशांची फौज नदी उतरून अलीकडे येत आहे असें पाहतांच ते किल्ला सोडून निघून गेले, व ता० ३० मार्च रोजीं तो इंग्लिशांचे हातीं आला.

३३ **वेताळगड**.—हा किल्ला मालवण तालुक्यांत वराड पेट्यांत पेंडूर नांवाच्या खेड्यांत एका टेंकडीवर बांधलेला आहे. या किल्ल्याचें एकंदर क्षेत्रफळ सुमारें २२ एकर आहे. इ. स. १८६२ सालीं या किल्ल्याची पहाणी झाली त्या वेळीं आंत शिबंदी वगैरे कांहीं नसून त्याचा तट अगदीं मोडकळीस आलेला होता. किल्ल्यांत धान्य व पाणी यांचा पुरवठा चांगला आहे. या ठिकाणीं विशेष ऐतिहासिक महत्त्वाची गोष्ट घडून आलेली दिसत नाहीं.

३४ **सिधगड**.-हा किल्ला मालवण तालुक्यांत मालवणच्या ईशान्येस १६ मैलांवर एका डोंगरावर बांधलेला आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें अडीच एकर आहे. इ० स० १८१८ त कर्नल इम्लाक साहेबास प्रथमतः किल्ल्यांतील शिबंदीनें दाद दिली नाहीं. परंतु पुढें त्यानें जास्त मदत बोलावून तो किल्ला घेतला. हल्लीं हा किल्ला मोडकळीस आलेला आहे.

३५ **मालवणचा किल्ला किंवा सिंधुदुर्ग**.—मालवण येथें गेल्यावर तेथें पहाण्यासारखी मुख्य गोष्ट ह्मटली

म्हणजे तेथचा जंजिरा किल्ला होय. त्याला सिंधुदुर्ग असें म्हणतात. समुद्रकिनाऱ्यावरील एकंदर किल्ल्यांचा तो राजा आहे असें ह्मटलें तरी चालेल. सुवर्णदुर्ग किल्ला ज्याप्रमाणें बाहेरून अतिशय भव्य दिसतो त्याप्रमाणें हा किल्ला दिसत नाहीं. तथापि त्याच्यापेक्षां ह्या किल्ल्याचा घेर फार मोठा म्हणजे जवळजवळ दोन मैल आहे. हा किल्ला एका बेटावर बांधलेला असून तें बेट किनाऱ्यापासून सुमोरें एक मैलावर आहे. ह्या बेटाचा आकार उंचसखल व वांकडातिकडा असल्यामुळें किल्ल्याचें बांधकामही तसेंच करावें लागलें. पुष्कळ ठिकाणीं त्याचीं टोंकें बाहेर आलेलीं आहेत. या गोष्टीमुळें ज्याचे हातीं किल्ला असेल त्याला एक असा मोठा फायदा आहे कीं, शत्रु एखाद्या टोंकाशीं आल्यास त्याच्यावर दुसऱ्या एखाद्या टोंकावरून फार चांगला मारा करितां येतो. किल्ल्याच्या तटाची उंची २९ पासून ३० फुटांपर्यंत आहे. परंतु आंतील जागा सखल असल्यामुळें कांहीं ठिकाणची तटबंदी फारच सखल दिसते. विशेषतः समुद्राच्या बाजूनें ही तटबंदी फारच सखल दिसते; म्हणजे ती समुद्राच्या जवळजवळ समपातळींत आहे असें म्हटलें तरी चालेल. किल्ल्याच्या तटाची रुंदी १२ फुटांवर आहे. या तटाला एकंदर ४२ बुरूज आहेत व एका बुरुजापासून दुसऱ्या बुरुजापर्यंत ४० यार्डांपासून १३० यार्डांपर्यंत अंतर आहे. या बुरुजांचा आकार अर्धवर्तुलाकृति असून त्यांना तोफा मारण्याकरितां भोंकें ठेविलेलीं आहेत. पुष्कळ ठिकाणीं पायथ्यापासून तटाच्या माथ्यावर जाण्याकरितां दगडी जिने केलेले आहेत. किल्ल्याचा दरवाजा ईशान्य कोपऱ्यास आहे. इ० स० १८२८ त उत्तर व पूर्व या

बाजूंकडील तटबंदी दुरुस्त होती. या तटबंदीवर लहान लहान उंबराचीं झाडें वाढलेलीं होतीं. परंतु त्यांचा मुख्य तटाला धक्का पोहोंचला नव्हता. दक्षिण व पश्चिम या बाजूंकडील तटबंदीची स्थिति मात्र फार भयंकर झाली होती. ह्या दोन्हीं तटांवरील पडभिंत किंवा सफेली पावसाच्या योगानें झिरपून जाऊन बहुतेक नाहींशी झालेली होती. किल्ल्यांतील इमारतींची जरी दुरुस्ती होत होती तरी दारूखाना व मुख्य दरवाजा हे दोन भाग शिवाय करून बाकीच्या इमारती डोकें खालीं टेंकण्याच्या बेतांत आलेल्या होत्या. परंतु पुढें दरवर्षी आंतील इमारतींची दागदुजी काळजीनें होत गेल्यामुळें इ० स० १८६२ पर्यंत आंतील बहुतेक भाग बऱ्याच चांगल्या स्थितींत होता. त्या वेळीं आंत पहारा वगैरे कांहीं नव्हतें. फक्त १९ निरुपयोगी तोफा पडलेल्या होत्या.

या किल्ल्याचें क्षेत्रफळ सुमारें ४८ एकर आहे. पूर्वीच्या इमारतींपैकीं कांहीं देवालयें शिवायकरून बाकी सर्व इमारती हल्लीं जमीनदोस्त झाल्या आहेत असें म्हटलें तरी चालेल. शिवाजीनें समुद्र किनाऱ्यावर जे किल्ले बांधले, त्या सर्वांत हा सिंधुदुर्ग किल्ला प्रमुख आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आंत शिवाजी महाराजाचें एक देवालय आहे. ह्या देवालयांत महाराजांच्या मूर्तीची स्थापना केली असून सणवारीं तिला रुप्याचा किंवा सोन्याचा मुखवटा घालतात. देवालयाच्या एका भिंतीच्या दगडावर शिवाजी महाराजांच्या हातांचीं व पायांची चिन्हें काढलेलीं आहेत, व

त्यांवर लहानलहान घुमट बांधलेले आहेत. हल्लीं किल्ल्यांत गाबीत लोकांच्या कांहीं झोंपड्या आहेत. ह्या लोकांनीं किल्ल्यांत जीं माडाचीं झाडें आहेत त्यांचा मक्ता सरकाराकडून ठरवून घेतलेला आहे. देवालयाला लागूनच एक गोरख चिंचेचा वृक्ष आहे. या देवालयाला कोल्हापुरच्या महाराजांनीं इ. स. १८१२ त त्यांचा दिवाण रत्नाकर आपा याच्या सूचनेवरून सालीना १५२२ रुपयांची नेमणूक करून दिलेली आहे. शिवाजी महाराजांचा पूजेचा मुख्य दिवस आदित्यवार आहे.

जंजिऱ्याचा किल्ला घेण्याकरितां शिवाजी शिद्दीबरोबर बरेच दिवस झगडत होता. परंतु त्या कामीं त्याला फारसें यश आलें नाहीं. पुढें इ. स. १६६५ त समुद्रकिनाऱ्यावर कोठें तरी आपलें मुख्य ठाणें असलें पाहिजे, असा विचार त्याचे मनांत येऊन, **मालवणचें** बंदर त्याचे मनांत भरलें, व त्यानें बाहेरच्या किंवा मोठ्या बेटावर मजबूत किल्ला बांधून त्याचें नांव सिंधदुर्ग असें ठेविलें. हा किल्ला बांधीत असतां शिवाजीनें स्वतः आंगमेहनतीनें पुष्कळ काम केलें आहे असें सांगतात. सिंधुदुर्गाचें काम पुरें झाल्यावर त्याच्या कांहींसें आंतल्या बाजूस दुसरें एक लहानसें बेट होतें त्यावर त्यानें दुसरा एक किल्ला बांधून त्याचें नांव पद्मगड असें ठेविलें. समुद्राच्या बाजूनें अशा रीतीनें पक्का बंदोबस्त केल्यावर जमीनीच्या बाजूनें खाडीच्या मुखाशीं त्यानें आणखीं दोन किल्ले बांधले. त्यांपैकीं एकाला राजकोट व दुसऱ्याला सर्जेकोट असें ह्मणतात. इ० स० १७१३ त शिवाजी महाराजांच्या राज्याच्या सातारा व कोल्हापूर अशा दोन शाखा

झाल्या. त्यावेळीं मालवणचा किल्ला कोल्हापूर सरकारचे ताब्यांत गेला, व तेव्हांपासून मालवण हें चांचे लोकांचें एक मुख्य ठाणें झालें. तेथील लोक समुद्रांत फारच त्रास देत असत. इ० स० १७१० त हामिलटन नांवाच्या साहेबानें असें वर्णन केलें आहे कीं, " मालवण येथें चांचे लोकांचा एक स्वतंत्र सरदार असून त्याचे जवळ तीन चार गलबतें आहेत, व जो त्याच्या सपाट्यांत येतो त्याला तो बुचाडल्याशिवाय सोडीतच नाहीं." इ० स० १७१९ त या चांचे लोकांनीं इंग्लिशांच्या दोन गलबतांवर झडप घातली. त्यांपैकीं एकावर त्या वेळेचा इंग्लिशांचा मुंबईचा डेपुटी गव्हरनर स्टूट साहेब होता. परंतु इंग्लिशानीं त्या लोकांवर आपली तोफ सुरू केल्यामुळें ते लोक पळून गेले. इ०स०१७३०त त्या लोकांनीं इंग्लिशांचें एक जहाज फुटलें होतें तें धरून नेलें. या संबंधानें मालवणच्या कोल्हापूरकरांचा सरदार शंकरपंत व इंग्लिश यांच्यामध्यें बराच वादविवाद होऊन शेवटीं उभयपक्षीं तह ठरला. इ० स० १७६९ त इंग्लिशांचे सरदार मेजर गॉर्डन व कपतान जान वाटसन हे आरमार घेऊन सिंधुदुर्गावर चाल करून गेले. पुढें लौकरच तो किल्ला त्यांचे हातीं आला, व त्यांनीं त्याचें नांव फोर्ट आगष्टस असें ठेविलें. इंग्लिशांचे मनांत तो किल्ला आपणांकडे रहावा असें होतें. परंतु तो किल्ला आपणांकडे ठेवण्यापासून विशेष फायदा नाहीं, व तो जमीनदोस्तही करतां यावयाचा नाहीं, असें पाहून त्यांनीं तो कोल्हापूरकरांस परत दिला. त्या वेळीं त्या उभयतांत जो तह झाला त्यांतील कलमें येणें प्रमाणें:—१ कोल्हापुरच्या राजानें समुद्रांत व्यापारी गलबतांस त्रास देऊं नये; २

आपण यापुढें तसें करणार नाहीं अशाबद्दल त्यानें हमी द्यावी; ३ मुंबई सरकारास नुकसानीबद्दल ३८२८९० रुपये द्यावे; ४ इंग्लिशांस मालवण येथें वखार घालण्यास परवानगी द्यावी; व ५ इंग्लिशांनीं सिंधुदुर्ग किल्ला त्यास परत द्यावा. तरी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत मालवण येथील मराठे लोक अतिशय उपद्रव देत होते. पुढें इ० स० १८१२ त कर्नल लायोनल स्मिथ साहेब बरोबर आरमार घेऊन मालवण येथें गेला व त्यानें सिंधुदुर्ग किल्ला घेऊन तेथील यांचे लोकांचा बीमोड करून टाकिला.

सिंधुदुर्गापासून थोड्याशा अंतरावर दुसरा एक किल्ला एका लहानशा बेटावर बांधलेला आहे, व त्याला पद्मगड असें ह्मणतात, हें मागें सांगितलेंच आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें एक एकर आहे. तेथें शिवाजी आपलीं गलबतें बांधीत असे असें सांगतात. इ. स. १८६२ त या किल्ल्याची बहुतेक पडापड झालेली होती.

शिवाजीनें सिंधुदुर्ग बांधिला त्याच वेळीं किनाऱ्यावरही त्यानें दोन किल्ले बांधले. त्यांपैकीं एकाला राजकोट व दुसऱ्याला सर्जेकोट असें म्हणतात. हेंही मागें आलेंच आहे. राजकोट मालवण शहराच्या हद्दींत असून त्याच्या तीन बाजूंस समुद्र आहे. या कोटाच्या भिंती विशेष मजबूत नाहींत. त्याच्या तीन कोंपऱ्यांस तीन बुरूज आहेत. त्यांची हल्लीं पडापड झालेली आहे. या कोटाजवळ हल्लीं कांहीं इमारती आहेत, त्यांपैकीं बराकी इ. स. १८१२ त बांधल्या, तसेंच आंत मामलतदाराची कचेरी आहे, व इ० स० १७९२ त इंग्लिशांनीं

जेथें आपली वखार बांधिली होती, त्या जागेला हल्लीं ओल्ड रेसिडेन्सी असें म्हणतात. इ० स० १८६२ त राजकोटाची बहुतेक भिंत पडलेली होती व आंत एक जुनी निरुपयोगी तोफ होती.

सर्जेकोटः–हा किल्ला राजकोटाच्या उत्तरेस सुमारें पावणे दोन मैलांवर आहे. तो रुंडी नांवाचें समुद्रकाठीं एक खेडें आहे त्यांत मोडतो. त्याच्या उत्तरेस समुद्र असून बाकीच्या तीन बाजूंस खंदक आहे- इ. ड. १८६२ त तटाची पडापड सुरू झालेली होती व आंत पाण्याची वगैरे कांहीं सोय नव्हती.

३७ नांदोसचा किल्लाः—हा किल्ला मालवण तालुक्यांत नांदोस नांवाच्या खेड्यांत मोडतो. त्याचें क्षेत्रफळ सुमारें पाव एकर आहे. इ. स. १८६२ त हा किल्ला फार चांगल्या स्थितींत होता. या किल्लयाच्या सभोंवार खंदक आहे. आंत शिबंदी वगैरे कांहीं नाहीं. या किल्लयास धान्य, पाणी वगैरेचा पुरवठा चांगला आहे.

३८ निवतीचा किल्लाः–हा किल्ला मालवणच्या दक्षिणेस साडेसहा मैलांवर व वेंगुर्ल्याच्या उत्तरेस सुमारें९ मैलांवर कोचरें या नांवाच्या खेड्यांत मोडतो. तो एका लहानशा खाडीच्या मुखाशीं बांधलेला आहे. ज्या टेंकडीवर हा किल्ला बांधलेला आहे तिची उंची सुमारें १५० फूट असून तिच्यावर पुष्कळ झाडी आहे. हा मूळ वाडीच्या सावंतांच्या ताब्यांत होता. इ. स. १७८६ त कोल्हापुरच्या राजाच्या सैन्यानें तो सावंतांपासून घेतला; परंतु पुढें कोल्हापुरच्या राजानें तो किल्ला सावंतांस परत दिला. इ. स. १८०३ पासून इ. स. १८१० पर्यंत या किल्लयाचे

संबंधानें कोल्हापुरचा राजा व वाडीचे सावंत यांच्यामध्यें बराच झगडा चालला होता. शेवटीं त्याचें स्वामित्व सावंतांकडेच कायम राहिलें. इ. स. १८१८त इंग्लिशांचा त्या प्रांतांत कायमचा अमल बसल्यावर निवती व रेडी हे दोन किल्ले त्या वेळीं सावंतांच्या ताब्यांत असल्यामुळें त्यांचे लोक आसपासच्या इंग्लिशांच्या अमलांतील खेड्यांना बराच त्रास देऊं लागले. त्या वेळीं कीर साहेब बरोबर सैन्य घेऊन कोकणांत आला. तो तारीख २ फेब्रुवारी इ. स. १८१९ रोजीं निवती किल्ल्याजवळ येऊन पोहोंचला. तिसऱ्या तारखेस त्यानें किल्ल्यावर आपला तोफखाना सुरू केला, व चवथ्या तारखेस तो किल्ला इंग्लिशांचे हस्तगत झाला.

३९ **रामगड**:—हा किल्ला मालवण तालुक्यांत बेलें बुद्रुक नांवाच्या खेड्यांत मोडतो. हा किल्ला एका टेंकडीवर बांधलेला असून त्याचें क्षेत्रफळ सुमारें आठ एकर आहे. त्याच्या तटाची उंची ८ फूट असून त्याची रुंदी सुमारें १० फूट आहे व त्याचा परीघ सुमारें ७०० यार्ड आहे. तटाला एकंदर १५ बुरूज असून त्यांपैकीं बहुतेकांना तोफा मारण्याकरितां तीन तीन भोकें ठेविलेलीं आहेत. किल्ल्याचा दरवाजा पश्चिमेच्या अंगास असून त्याची रुंदी ८ फूट व लांबी १५ फूट आहे. दरवाज्यांतून वर जाण्यास उत्तम फरसबंदी पायऱ्या बांधलेल्या आहेत. आंत किल्लेदाराचा राहण्याचा वाडा असून शिवाय एक देवालय आहे. या देवालयाचें बांधकाम फार सुरेख असून तें औरसचौरस ३६ यार्ड आहे. इ. स. १८६२ त या किल्ल्याची पहाणी झाली तेव्हां त्याच्या तटाच्या भिंती अगदीं पडावयास

झालेल्या होत्या. तसेंच आंत शिबंदी नसून पाण्याचा पुरवठाही मुळींच नव्हता. आंत जुन्या व निरुपयोगी अशा २६ तोफा व तोफांचे १०६ गोळे पडलेले होते. हा किल्ला कपतान पियरसन यानें तारीख ६ एप्रील १८१८ रोजीं मराठ्यांपासून घेतला.

वेंगुर्लें तालुका.

—:०:—

४० किल्ला रेडी किंवा यशवंतगड—हा किल्ला फार म-जबूत असून मुसलमानांच्या सत्तेचा ऱ्हास होण्यास ज्या वेळीं प्रारंभ झाला त्या वेळीं बांधला (इ. स. १६६०). इ. स. १६६२ त शिवाजीनें मालवण येथील प्रसिद्ध सिंधुदुर्ग किल्ला बांधला त्याच सुमारास हा किल्ला बांधला असें डफ-साहेबांच्या इतिहासांत लिहिलेलें आहे. परंतु त्या प्रांतावर विजापुरसरकारचा अमल असतां तेथें मुळचा एक लहा-नसा किल्ला होता व तो वाडीच्या सावंतांच्या ताब्यांत होता. पुढें शिवाजीनें तो मुलूख काबीज केल्यावर त्या किल्ल्याची फार उत्तम रीतीनें दुरुस्ती केली. इ. स. १८१७ त हा किल्ला सावंतांच्या ताब्यांत होता त्या वेळीं गोव्यांहून सैन्य येऊन त्यानें या किल्ल्यास वेढा दिला, व किल्ल्याच्या शेजारीं हस्त नांवाचा डोंगर आहे, तेथून किल्ल्यावर तोफांचा मारा चालविला.परंतु त्यापासून किल्ल्या-चें कांहींच नुकसान झालें नाहीं. तोफांचे गोळे लागून पड-लेल्या त्या वेळच्या खुणा बालेकिल्ल्याच्या दक्षिणेकडील भिंतीवर अद्यापि दृष्टीस पडतात. तोफ लावून किल्ला

आपल्या हातीं येत नाहीं, अशी त्या सैन्याची निराशा झाली, तेव्हां त्यानें किल्ल्याच्या आसपासचीं हजारों माडाचीं झाडें तोडून टाकिलीं व अशा रीतीनें विनाकारण नुकसान करून ते लोक वेढा उठवून निघून गेले. पुढें इ. स. १८१९ त पूर्वी फोंड सावंताशीं इ. स. १८१२त करार झाला होता त्याप्रमाणें तो किल्ला घेण्याकरितां इंग्लिशांचें सैन्य रेडी येथें आलें. त्या वेळीं तो किल्ला संभाजी सावंताचे ताब्यांत होता. पूर्वीचा करार असा होता कीं, सावंतवाडी येथील लोकांनीं यापुढें समुद्रावर चांचेपणा केल्यास फोंड सावंत यानें कंपनीस नुकसानीबद्दल रेडी व निवती हे दोन किल्ले द्यावे. संभाजी किल्ला देईना तेव्हां इंग्लिशांनीं किल्ल्यावर आपला तोफखाना सुरू केला व एका दिवसांत तो किल्ला सर केला.

हा किल्ला खाडीच्या मुखाशीं दक्षिणेच्या बाजूस बांधलेला आहे. ह्या किल्ल्याला बालेकिल्ला असून तो एका टेंकडीवर बांधलेला आहे. या टेंकडीच्या पायथ्याशीं सभोंवार सपाट मैदान असून त्याच्या वाटोळा किल्ल्याचा मुख्य तट घातलेला आहे. किल्ल्याच्या पूर्व व दक्षिण या बाजूंस खाडीचें पाणी आहे. पूर्वी किल्ल्याच्या आग्नेयी कोपऱ्यास मोठी दलदल असावी असें वाटतें. कारण या बाजूकडची तटबंदी इतर बाजूंकडील तटबंदीच्या मानानें कच्ची दिसते. किल्ल्याच्या नैर्ऋत्य दिशेकडची तटबंदी विशेष उंच नसून त्या बाजूस एक दरवाजा आहे. या दरवाज्यापासून समुद्रापर्यंत मजबूत तट घातलेला असून त्याला मधून मधून बुरूज आहेत. किल्ल्याच्या सभोंवतालच्या तटबंदीचा एकंदर घेर सुमारें दीड मैल आहे. कि-

ल्ल्याच्या पश्चिमेकडील भागांत हल्लीं माडाचीं पुष्कळ झाडें असून तेथें वस्तीही बरीच आहे. किल्ल्याच्या बाहेरच्या तटाला बुरूज आहेत. त्याला आंतून गोळ्या मारतां याव्या म्हणून भोंकें ठेविलेलीं आहेत. त्याची उंची सुमारें १७ फूट आहे. तटाच्या दरवाज्यांतून बालेकिल्ल्यावर जाण्याकरितां पाखाडी किंवा बांधींव रस्ता केलेला आहे. बालेकिल्ल्यावर जातांना मध्यंतरीं दुसरा एक तट व दरवाजा लागतो. या दरवाज्यांतून आंत गेलें ह्मणजे पुनः पायऱ्या लागतात व त्या चढून वर गेलें ह्मणजे तिसऱ्या किंवा बालेकिल्ल्याच्या दरवाज्यांत मनुष्य येऊन पोहोंचतें. बालेकिल्ल्याच्या तटाची उंची सुमारें २९ फूट आहे; व तटाच्या सभोंवार आग्नेयीकडील कोपरा शिवाय करून खंदक आहे. हा खंदक कोरडा असून त्याची रुंदी सुमारें २४ फूट व खोली अजमासें १३ फूट आहे. बालेकिल्ल्याच्या तटाचा माथा सुमारें १२ फूट रुंद असून त्याला अर्धवर्तुलाकृति बुरूज आहेत. बालेकिल्ल्याचा घेर सुमारें $\frac{1}{3}$ मैल आहे. बालेकिल्ल्यांतील वाडा दोन चौकी असून त्याच्या दोन कोपऱ्यांवर दोन बुरूज आहेत. हा वाडा पडून त्याचें सामान नाहींसें झालें आहे. किल्ल्याच्या भिंती अद्यापि मजबूत असून त्यांतील इमारतींपैकीं कांहीं अद्यापि वसति करण्यसारख्या आहेत. कांहीं वर्षांपूर्वी बेळगांव येथील लष्करी लोकांस चांगल्या हवेवर ह्मणून वारंवार या किल्ल्यांत आणून ठेवीत असत. हल्लीं किल्ल्यांत पोलीस लोकांचें ठाणें आहे.

———

सांवतवाडी संस्थान.

—:०:—

सावंतवाडी हें संस्थान उत्तर अक्षांश १६° १५′ ३०″ व १६° ३६′ ५३″ आणि पूर्व रेखांश ७४° २०′ ९१″ व ७३° ३६′ ११″ यांच्यामध्यें आहे. या संस्थानाचें क्षेत्रफळ सुमारें ९२६ चौरस मैल आहे, लोकसंख्या १९२९४८ आहे व वसूल २८३११ रुपये आहे. याच्या उत्तरेस मालवण तालुका, ईशान्य व पूर्व या दिशांस कोल्हापूर संस्थान, व बेळगांव जिल्हा; यांच्या दरम्यान् सह्याद्रीची ओळ आहे. दक्षिणेस पोर्तुगीज अमलांतील डिचोली व पेडणें हे परगणे आहेत, व पश्चिमेस रत्नागिरी जिल्ह्यांतील वेंगुर्लें व मालवण हे तालुके आहेत. या संस्थानाचे कुडाळ व वाडी व बांदें असे तीन पेटे आहेत. यांत एकंदर सात किल्ले आहेत. त्यांचें वर्णन येणेंप्रमाणें:—

१ आवर किल्ला:—हा किल्ला सावंतवाडीच्या ईशान्येस सुमारें तेरा मैलांवर व वाडीहून वेंगुर्ल्यांस जो रस्ता जातो त्याच्या उत्तरेस तीनशें यार्डांवर बांधलेला आहे. हा भुईकोट असून त्याचें बांधकाम चिखलांत दगड बसवून केलेलें आहे. इ० स० १८४३ त या किल्ल्याच्या सभोंवार एक कोरडा खंदक होता व त्यांत कांटेरी झाडेंझुडपें व बांबूचीं दाट बेटें होतीं. किल्ल्याच्या उत्तरेस तटाच्या बाहेरच्या बाजूस एक बुरूज बांधलेला होता, व मुख्य किल्ला व हा बुरूज यांच्यामध्यें रस्ता केलेला होता. या रस्त्याच्या एका बाजूस वेळूचीं अतिशय दाट बेटें होतीं, व दुसऱ्या बाजूस तट बांधलेला होता. किल्ल्याचा दरवाजा

अतिशय मजबूत होता. परंतु त्याची बंदोबस्ती चांगली नव्हती. इ० स० १८४५ त हा किल्ला पाडून टाकिला.

२ बांदें येथील किल्ला:—बांदें हा गांव तेरेखोलच्या खाडीच्या कांठीं वाडीच्या दक्षिणेस सहा मैलांवर व समुद्रकिनाऱ्यापासून सुमारें वीस मैलांवर आहे. तेरेखोलच्या खाडीच्या भरतीचें पाणी या गांवापर्यंत येतें. हा गांव प्राचीन काळापासून फार प्रसिद्ध आहे. या गांवीं एक किल्ला आहे. तो खाडीच्या डाव्या अंगास सुमारें एका गोळीच्या टप्प्यावर एका ७२ फूट उंचीच्या टेंकाडावर बांधलेला आहे. या किल्ल्याचें कांहीं काम घडींव दगडांचें असून कांहीं ठिकाणीं तें अगदीं साधें आहे. त्याची लांबी १०० फूट व रुंदी ५० फूट आहे. या किल्ल्याला जे बुरूज आहेत ते आच्छदलेले आहेत. त्याचा दरवाजा आग्नेयी दिशेस आहे. पश्चिमेच्या बाजूस एक चोर दरवाजा आहे व तेथून खालीं खाडीपर्यंत बांधींव पायऱ्या आहेत. हा किल्ला विशेष बळकट नाहीं. आंत कांहीं जुन्या निरुपयोगी तोफा आहेत. हल्लीं किल्ल्यांत मामलेदार व महालकरी यांच्या कचेऱ्या आहेत.

३ कुडाळचा किल्ला:-कुडाळ हा प्रसिद्ध गांव वाडीच्या उत्तरेस १३ मैलांवर आहे. याच्या पश्चिमेच्या अंगास एका उंचवट्यावर एक किल्ला बांधलेला आहे. त्याचा तट दगड व चिखल यांनीं बांधलेला आहे, व त्याला मध्यंतरीं बुरूज आहेत. तो विजापुरच्या बादशाहांनीं बांधला असें सांगतात. त्याचें क्षेत्रफळ १६० चौरस यार्ड आहे. त्याच्या सभोंवार खंदक आहे. किल्ल्याच्या आग्नेयीकडील कोपऱ्यांत तीन दरवाजे आहेत. परंतु त्यांचें बांधकाम फारसें बळ-

कट नाहीं. पश्चिमेच्या अंगास एक चोर दरवाजा आहे. त्याची हल्लीं पडापड झालेली आहे. आंत कांहीं तोफा आहेत, परंतु त्या निरुपयोगी आहेत आंत एक जुनी मोडून पडलेली मशीद आहे. अद्यापि तिच्यांत एखादे वेळीं मुसलमान लोक आपला नमाज पढतात. आंत एक विहीर आहे तिला घोडबाव असें म्हणतात. तिचा घेर १००फूट असून खोली ४० फूट आहे. तिला पायऱ्या आहेत व त्यांवरून घोड्यावर बसून आंत पाण्यापर्यंत जातां येतें. याच गोष्टीवरून तिला घोडबाव असें नांव पडलें आहे. इ. स. १८७७ सालीं किल्ल्यांत एक इमारत बांधिली. तिच्यांत हल्लीं सरकारी कचेऱ्या असून पोलीस लोकांचेंही ठाणें आहे.

४ महादेवगडः—हा किल्ला सह्याद्रीच्या एकीकडे झुकलेल्या अशा एका फाट्यावर पारपोली घाटाच्या माथ्यावर आंबवली नांवाच्या गांवापासून सुमारें दीड मैलावर बांधलेला आहे. या किल्ल्याचा तट फारसा बळकट नाहीं. इ. स. १८३०त लेफटेनंट कर्नल मारगन यानें हा किल्ला सावंतांपासून घेतला. त्या वेळीं या किल्ल्याला पूर्वेच्या बाजूस दोन दरवाजे होते, व त्यांच्या संरक्षणाकरितां तीन बुरूज बांधलेले होते. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता बराच अवघड असून तो अरुंद होता. या किल्ल्यापासून तोफेच्या गोळ्याच्या अंतरावर दोन उंचवट्याच्या जागा आहेत, तेथून या किल्ल्यावर मारा लागू पडतो. इ. स. १८८० त या किल्ल्याचा पूर्वेकडील भाग—दरवाजे, बुरूज वगैरे—जमीनदोस्त झालेला होता. हल्लीं किल्ल्यांतील जमीनींत गुरें चरतात. या किल्ल्यावर उभें राहिलें ह्मणजे

खालचा कोंकणपट्टीचा देखावा फारच मनोहर दिसतो; व हवा स्वच्छ असली तर जरी तेथून समुद्र तीस मैलांवर आहे तरी तो स्पष्टपणें दिसतो. या किल्ल्याची उंची सुमारें २९०० फूट आहे व त्याचें क्षेत्रफळ सुमारें २० एकर आहे.

९ मनोहरगडः—हा किल्ला वाडीच्या ईशान्येस १४ मैलांवर रांगणा किंवा प्रसिद्धगड किल्ल्याच्या दक्षिणेस एका डोंगराच्या २५०० फूट उंचीच्या एका शिखरावर बांधलेला आहे. तो पांडवांनीं बांधला, अशी त्याच्या संबंधाची दंतकथा सांगतात. तो हुशार शिबंदीच्या हातीं असेल तर शत्रु कितीही बलाढ्य असला तरी त्याला वर चढाव करून जाणें फार बिकट जाईल. त्याचा आकार तिकोनी असून त्याची लांबी ४४० यार्ड व रुंदी ३९० यार्ड आहे. किल्ल्यावर जाण्याला पायथ्यापासून माथ्यापर्यंत खडकांत खोदलेल्या एकसारख्या पायऱ्या आहेत, व जेथें या पायऱ्या संपतात, तेथें दोन भक्कम दरवाजे आहेत. वर जाण्याला एवढीच कायती वाट आहे.

इ० स० १८४४ त कोल्हापूर प्रांतांतील गडकरी लोकांनीं जो दंगा केला, त्या वेळीं या किल्ल्यावरील चार पांचशें गडकरी बंडवाल्यांत सामील झाले. वाडी व कोल्हापूर या दोन प्रांतांतील बंडखोर लोकांचा एकमेकांशीं मिलाफ होऊं नये, अशाबद्दल इंग्लिश सरकारानें पुष्कळ प्रयत्न केला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मनोहर किल्ल्यावरील गडकरी लोकांनीं तारीख १० आक्टोबर रोजीं रात्रौ गोठुस येथील सबनिसाच्या वाड्यावर दरवडा घालून त्याचे सरकारी व खासगी कागदपत्र जाळून टाकिले, त्याचा खजिना लुटून नेला, व बाजारपेठें-

तील धान्याची लूट केली. तारीख ११ रोजीं किल्ल्यांतील २०० गडकरी हत्यारबंद होऊन बाहेर पडले, व त्यांनीं दुकानवाडी येथील सरकारी लष्करावर हल्ला केला. परंतु त्या लोकांनीं बंडखोरांस पिटाळून लाविलें. तारीख १३ रोजीं मेजर बेनबो हा सातव्या पायदळ पलटणीचे कांहीं लोक बरोबर घेऊन वेंगुर्ल्याहून तांदुळवाडी येथील लष्कराच्या मदतीकरतां आला. इकडे मनोहर गडावरील शिबंदीनें रांगणा किल्ल्यावरील लोकांस वश करून घेतलें, त्यामुळें बंडवाल्यांस बराच जोर आला, व त्या लोकांनीं पुनः दुकानवाडी येथील इंग्लिशांच्या फौजेवर चाल केली. या वेळीं इंग्लिशांचें लष्कर थोडें असल्यामुळें त्यांची अगदीं पांचांवर धारण बसली होती. बंडखोरांचा समुदाय मोठा असल्यामुळें वाडीप्रांतांत जें लष्कर होतें, तेवढें त्यांचा मोड करण्यास पुरेसें नव्हतें. तेव्हां कोल्हापुरचा त्या वेळचा पोलिटिकल एजंट सर जेम्स औटरम यास त्या लोकांच्या मदतीस जाण्याचा हुकूम झाला. नंतर औटरम साहेब आपल्या लष्कराच्या चार टोळ्या बरोबर घेऊन वाडीप्रांतांत येण्याकरितां निघाला. त्यानें वाटेनें ठिकठिकाणीं बंडखोरांचा पराभव करून त्यांचा जोर मोडला. या बंडांत आपल्या आठ पुत्रांसह वाडीचा फोंड सावंत व कोल्हापुरचे अण्णासाहेब भोंसले हेही सामील होते; त्यामुळें बंडवाले फारच चढून गेले होते, व त्यांनीं आसपासच्या मुलखास बराच त्रास दिला. परंतु औटरम यानें सपाट प्रदेशांतून त्यांचा पराभव करून त्यांस घालवून दिल्यामुळें ते लोक फक्त डोंगरी किल्ल्यांचा आश्रय धरून बसले होते.

मनोहरगडावरील लोकांनीं दोन महिनेपर्यंत इंग्लिशांस दाद दिली नाहीं. नंतर कपतान **पोफम** साहेब बरोबर मोठी फौज घेऊन **मनोहरगडावर** चाल करून गेला. बंडखोरांचें मुख्य ठाणें **तारगोळ** नांवाच्या टेंकडीवर होतें; तेव्हां **पोफम** साहेबानें आपला मोर्चा प्रथमतः तिकडेच फिरविला. या ठिकाणीं इंग्लिशांची व बंडवाल्यांची फारच निकराची लढाई होऊन तींत शेवटीं बंडवाल्यांचा पराभव झाला. ह्या अपजयानंतर कांहीं दिवसांनीं बंडवाल्यांनीं **मनोहरगडही** सोडून दिला, व तारीख २७ जानेवारी इ. स. १८४९ रोजीं जनरल डिलामोटी यानें तो किल्ला आपले ताब्यांत घेतला. पुढें ह्या बंडाचा शेवट झाल्यावर इंग्लिशांनीं हा किल्ला व त्याचें उत्पन्न सर्व **वाडीकरांस** दिलें. गडकरी लोकांकडे पूर्वापार ज्या जमिनी चालू होत्या, त्या त्यांच्याशीं त्या वेळीं कांहीं विशेष करार करून कायम ठेविल्या, त्यांचीं पूर्वींचीं नक्त वेतनें बंद केलीं, व जे गडकरी मूळ **वाडी** प्रांतांत राहणारे असून कोल्हापूर प्रांतांत येऊन राहिले होते, त्यांनीं **वाडी** प्रांतांत परत न येतां घांटावरच रहावें, असा कायमचा ठराव करून टाकिला हल्लीं हा किल्ला ओसाड अशा स्थितींत आहे.

६ **मनसंतोषगडः**—हा किल्ला **मनोहरगडापासून** सुमारें २०० यार्ड अंतरावर आहे. या दोन किल्ल्यांच्यामध्यें फक्त एक मोठें खोरें आहे. या किल्ल्याचें क्षेत्रफळ सुमारें १५ एकर आहे, व त्याचा आकार फार चमत्कारिक आहे; ह्मणजे सर्व बाजूंनीं त्याला कोन आलेले आहेत. त्याची उंचीही **मनोरगडाइतकीच** आहे. पूर्वी या किल्ल्यावर जाण्याला त्याच्या माथ्याशीं खडक फोडून पायऱ्या तयार

केलेल्या होत्या. परंतु त्या तशा पूर्वीं होत्या, अशा-बद्दलची हल्लीं कांहींच खूण दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. हल्लीं या किल्ल्यावर जातां येत नाहीं. या किल्ल्या-संबंधानें फारशी माहिती उपलब्ध नाहीं. परंतु इ. स. १८४४ त मनोहरगडावरील गडकरी लोकांनीं बंड केलें, त्या वेळीं तो त्यांच्या ताब्यांत असावा, व जनरल डिलामोटी यानें मनोहरगड काबीज केला त्याच वेळीं हा किल्लाही त्याच्या हातीं आला असावा.

७ **सांवतवाडीचा किल्लाः**—सांवतवाडी येथें मोतीं तलाव नांवाचा एक मोठा तलाव आहे, व त्याचें क्षेत्रफळ सुमारें ३१ एकर आहे. या तळावाच्या पूर्वेकडील बाजूस वाडीचा किल्ला बांधलेला आहे. त्याचें बांधकाम चिखलांत दगड बसवून केलेलें आहे, व हल्लीं तो मोडकळीस आ-लेला आहे. त्याच्या आग्नेयी व दक्षिण या दिशांस खंदक आहे. उन्हाळ्यांत हा खंदक कोरडा असतो. त्याचा आ-कार वांकडातिकडा असून त्याची लांबी ३९० यार्ड व रुंदी १९० यार्ड आहे. त्याचे बुरूज आच्छादित असून त्याला बंदुका मारण्यकरितां भोकें ठेविलेलीं आहेत. किल्ल्यां-त जाण्याला तीन वाटा आहेत. मुख्य दरवाजा उत्तरेच्या बाजूस आहे व त्याच्या दोन बाजूंस दोन बुरूज आहेत. तथापि हा दरवाजा फारसा भक्कम नाहीं. किल्ल्यांत दोन पितळेच्या व बाकीच्या लोखंडी मिळून बऱ्याच जुन्या तोफा आहेत, परंतु त्या निरुपयोगी आहेत. वर सांगित-लेल्या तलावाच्या कांठावर एक दरवाजा आहे. त्याला मूस दरवाजा असें म्हणतात. याच्याही दोन बाजूंस दोन बुरूज आहेत. या दरवाज्यांतून आंत गेलें ह्मणजे आंत-

ला किंवा बालेकिल्ला लागतो. बालेकिल्ल्याचा तट स्वतः-सिद्ध उंच दरडीवर बांधलेला आहे. त्याच्या दरवाज्याच्या दोन बाजूंस दोन सुंदर व मजबूत बुरूज बांधलेले आहेत; हल्लीं तेथें पोस्ट आफीस आहे. आंत एका आवारांत कांहीं इमारती आहेत. पूर्वीं येथें शिकारखाना होता: म्हणजे त्या इमारतींत रानटी हिंस्त्र पशु ठेवीत असत. हल्लीं त्या इमारतींत पोलिटिकल सुपरिंटेंडंट व त्याचे मदतनीस यांच्या कचेऱ्या आहेत. या इमारतींना लागूनच एक चतुष्कोनी दोन मजली वाडा आहे. त्याची पूर्वेकडील बाजू एकमजली आहे व कोणा थोर गृहस्थाची मुलाखत घेणें, त्यास पानसुपारी करणें वगैरे गोष्टी या दालनांत करतात. बाकीच्या भागांत कमाविसदार, दफतरदार, रजिष्टर, न्यायाधीश, खजीनदार वगैरे अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या आहेत. याच इमारतीला दर्शनी नवीन भाग बांधलेला आहे व घड्याळाकरितां एक मनोरा बांधलेला आहे. या इमारतीपासून जवळच सरकारी तुरुंग, अश्वशाळा, व राजवाडा या इमारती आहेत.

कोल्हापूर संस्थानांतील किल्ले.

—:*:—

कोल्हापूर हें संस्थान उत्तर अक्षांस १७° १०′ ४५″ व १५° ९०′ २०″ आणि पूर्व रेखांश ७४° १४′ ११″ व ७३° ४३′ १६″ यांचेमध्यें आहे. याच्या पूर्वेस रायबाग व आग्नेयीस कटकोल हे भाग ह्यांत धरून या संस्थानाचें क्षेत्रफळ २८१६ चौरस मैल आहे, त्याची लोकसंख्या

९१३१३१ आहे, व त्याचा वसूल सुमारें ३०८८३४० रुपये आहे.

ह्या संस्थानाचे एकंदर १० विभाग किंवा पेटे केलेले आहेत ते येणेंप्रमाणें:—१ करवीर. २ पन्हाळा. ३ आळतें ४ शिरोळ. ५ गडइंग्लज. ६ भूधरगड. ७ विशाळगड ८ बावडा. ९ कागल. १० इचलकरंजी. यांपैकीं विशाळगड, बावडा, कागल व इचलकरंजी हीं कोल्हापूर संस्थानापैकीं पोटसंस्थानें असून त्यांचा कारभार तेथील संस्थानिक स्वतंत्र रीतीनें पहात आहेत.

कोल्हापूर संस्थानाच्या उत्तरेस वारणा नदी—ईच्यापलीकडे सातारा जिल्हा लागतो; पूर्वेस कृष्णा व दुधगंगा ह्या नद्या, सांगली व मिरज हीं संस्थानें, व बेळगांव जिल्ह्यापैकीं चिकोडी तालुका; दक्षिणेस बेळगांव जिल्हा; व पश्चिमेस सह्याद्रीची ओळ,-हिच्या पलीकडे रत्नागिरी जिल्हा व सावंतवाडी संस्थान हीं आहेत. याची उत्तरदक्षिण लांबी सुमारें ६५ मैल, व पूर्वपश्चिम रुंदी ८ पासून ५० मैलपर्यंत आहे. ह्या संस्थानांतील किल्ले येणेंप्रमाणें:—

१ बावडाकिल्ला.—पन्हाळ्याच्या भोजराजानें (इ० स० ११७८-१२०९) जे पंधरा किल्ले वांधिले, त्यांपैकीं हा एक होय. हा किल्ला कोल्हापुरच्या वायव्येस ३६ मैलांवर सह्याद्रीच्या एका शिखरावर बांधलेला आहे. समुद्राचे सपाटीपासून याची उंची सुमारें २५०० फूट आहे. कोकणाच्या बाजूनें हा किल्ला उंच व तुटलेला दिसतो, व त्यावर जाण्याचा मार्गही फार बिकट आहे. पूर्वीं या किल्ल्याचे सभोंवार अतिशय दाट जंगल होतें. परंतु हल्लीं ती झाडी पुष्कळ कमी झाली आहे. इ० स० १६६० त

शिवाजीनें पन्हाळा, विशाळगड व रांगणा हे किल्ले घेतले, त्याच वेळीं हा किल्लाही विजापुरचा बादशाहा दुसरा अली, अदिलशाहा (इ. स. १६५६--१६७२) याजपासून घेतला व तो निळो सोनदेव पिंगळे यास जहागिरी दाखल दिला. विजापुरच्या बादशाहानें तो शिवाजीपासून पुनः परत घेतला. परंतु शिवाजीनें तो किल्ला पुनः जिंकून घेतला. इ० स० १६८९ त मोंगलांनीं शिवाजीचा पुत्र संभाजी यास रत्नागिरी जिल्ह्यांत संगमेश्वर येथें कैद केलें, त्या वेळीं बावडा मोंगलांचे हातांत गेला. राजारामाचे कारकीर्दींत बावडेकरांचा मूळ पुरुष रामचंद्र निळकंठ यानें तो मोंगलांपासून जिंकून घेतला. त्या कामगिरीबद्दल राजारामानें तो किल्ला रामचंद्रपंतास बाक्षिस दिला. पुढें सातारा व कोल्हापूर या दोन राज्यांत तंटा लागला (इ. स. १७०८--इ. स. १७२९) त्या वेळीं रामचंद्रपंत कोल्हापुरच्या संभाजीचा पक्ष धरून राहिला. त्यामुळें संभाजीनें रामचंद्रपंत वारल्यावर बावड्याची जहागीर रामचंद्रपंताचा पुत्र भगवंतराव याजकडे पुढें चालविली. त्या वेळीं बावडेकरांच्या ताब्यांत रत्नागिरी जिल्ह्यांत मालवण व विजयदुर्ग एथपर्यंतचा मुलूख होता. तसेंच त्यांच्या पदरीं घोडेस्वार व पायदळ मिळून एकंदर २६००० फौज असे, त्यामुळें त्यांनीं शाहूमहाराजांच्या मुलखाला फार त्रास देत असत. इ०स० १७८२ त कोल्हापुरच्या राजांनीं बावडा येथून आपली राजधानी काढून कोल्हापुरास नेली. त्या वेळीं बावडा येथील गडकरी लोकांचे पुष्कळ हक्क काढून घेतले, त्यामुळें त्या लोकांनीं बंड केलें, व कोल्हापुरच्या

सैन्याचा एका प्रसंगीं पराभव करून टाकला. पुढें तें बंड लौकरच मोडलें. इ० स० १८०० त भगवंतराव पंतअमात्य यानें बावडा किल्ल्याची नीट दुरस्ती केली, व पेशव्यांचा एक सरदार तो किल्ला घेण्याकरितां आला होता त्याचा पराभव करून त्यास ठार मारिलें. इ० स० १८४४ त सामानगड व बावडा येथील शिबंदीनें बंड केलें. परंतु सामानगडावरील शिबंदीचा पराभव होऊन तो किल्ला हातीं येतांच बावडा किल्लाही इंग्लिशांचे हातीं आला, व त्या वेळीं त्यांनीं किल्ल्याची कांहीं तटबंदी पाडून टाकिली. हा किल्ला अद्यापि साधारण बऱ्या स्थितींत आहे. किल्ल्याचे पायथ्याशीं बावडा नांवाचें एक लहानसें खेडें आहे. येथें इ० स० १८४८ पासून कोल्हापुरच्या काळ्या पायदळ पलटणीची एक टोळी असते.

२ भूधरगड.—हा किल्ला कोल्हापुरच्या दक्षिणेस ३६ मैलांवर एका खडकाळ डोंगरावर बांधलेला आहे. त्याची उत्तरदक्षिण लांबी २६०० फूट व पूर्वपश्चिम रुंदी २१०० फूट आहे. या किल्ल्याला दोन दरवाजे आहेत व त्याच्या तटाची हल्लीं बरीच पडापड झालेली आहे. किल्ल्यांत सुमारें ३३ घरें असून त्यांत सुमारें ९७० लोकांची वस्ती आहे. डोंगराचे पायथ्याशीं दोन लहान वाड्या असून त्यांपैकीं एकींत दर सोमवारीं लहानसा बाजार भरत असतो. इ० स० १ ६७ च्या पूर्वीं भूधरगड याची विशेष प्रसिद्धि त्यावर केदारलिंग, बहिरवनाथ वगैरे जीं पवित्र देवस्थानें आहेत, त्यांबद्दल होती, व त्या देवतांचे पुजारी डोंगराचे पायथ्याशीं एक खेडें होतें तेथें राहत असत. इ० स० १६६७ त शिवा-

जीनें त्या किल्ल्याची नीट दुरस्ती केली, व त्याच्यावर शिबंदी वगैरे ठेवून त्याचा उत्तम बंदोबस्त केला. पुढें कांहीं वर्षांनीं तो मोंगलांनीं जिंकून घेतला; परंतु सुमारें ९ वर्षांनीं मरठ्यांनीं किल्ल्यावर हल्ला करून मोंगलांचा पराभव केला, त्यांच्या सरदारास ठार मारिलें, व मोंगलांचीं निशाणें बहिरवनाथास देऊन टाकिलीं. तीं निशाणें अद्यापि तेथें आहेत. अखेरीस हा किल्ला परशुराम भाऊ पटवर्धन यानें किल्ल्यां-तील शिबंदी वश करून घेऊन आपले ताब्यांत घेतला; परंतु पुढें दहा वर्षांनीं कोल्हापुरच्या राजानें तो परत जिं-कून घेतला. पुढें परशुराम भाऊ व इचलकरंजीचा मुख्य गोपाळपंत या दोघांनीं मिळून तो किल्ला परत घेण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तो सर्व व्यर्थ गेला. इ. स. १८४४ त सामानगड व भूधरगड येथील शिबंदीनें बंड करून किल्ल्यांचे दरवाजे बंद केले. पुढें तारीख १३ अक्टोबर १८४४ रोजीं जनरल डिला-मोटी याच्या हाताखालच्या इंग्लिश फौजेनें तो घेतला, व पाडून टाकिला. ह्या किल्ल्यांत हल्लीं एक सुंदर राजवाडा, एक धान्याची मोठी कोठी, व पांचहजार रुपये ख-र्चून एक पाण्याचा हौद बांधलेला आहे. ह्या किल्ल्यांतील बहिरवाचें देवालय पाहण्यासारखें आहे. त्या देवालयाकडे सालीना ९६० रुपयांची नेमणूक असून शिवाय १३० रुपये धान्याची जमीन आहे. येथें दरवर्षी माघ कृष्ण १ पासून १० पर्यंत मोठी यात्रा भरत असते.

३ पन्हाळा किल्लाः—हा किल्ला सह्याद्रीच्या एका शिखरावर बांधलेला असून तो कोल्हापुरच्या वायव्येस सुमारें दहा मैलांवर आहे. समुद्राचे पृष्ठभागापासून याची

उंची सुमारें २०४७ फूट आहे, व कोल्हापुरच्या बाजूनें याची उंची सुमारें ९७९ फूट आहे. या किल्ल्याचा घेर ४॥ मैल आहे. सुमारें निमे भागाला ३० पासून ९० फूट खोल तुटलेला कडा आहे, व त्याला मधूनमधून तट बांधलेला आहे. बाकीच्या निमे भागाला १९ पासून ३७ फूट रुंदीचा भक्कम व उंच दगडी तट घातलेला आहे, व इकडून तिकडे तोफा वगैरे नेण्याआणण्याकरितां मधून मधून बुरूज बांधलेले आहेत. किल्ल्याला तीन दुहेरी भक्कम दरवाजे होते. वर जाण्याला दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. किल्ल्याच्या तीन दरवाज्यांपैकीं वाघ दरवाजा, व चोर दरवाजा हे कोसळून पडले आहेत, व तिसरा दरवाजा मात्र अद्यापि शाबूत आहे. हा दरवाजा भक्कम असून त्याच्यावर नक्षीचें सुंदर काम केलेलें आहे. ह्या दरवाज्यापासून सुमारें ४६ यार्डांवर तटाला एक भगदाड दृष्टीस पडतें, तेथून इ. स. १८४४ त इंग्लिश फौजेनें मोठ्या नेटानें किल्ल्यांत शिरून तो बंडखोर लोकांपासून घेतला. किल्ल्याच्या उत्तरेस ९० यार्ड रुंदीचा एक स्वतःसिद्ध तलाव आहे. किल्ल्यांत जिवंत पाण्याच्या दोन विहिरी असून दुसरे पुष्कळ झरे आहेत.

पन्हाळा येथें प्राचीन काळीं पराशर ऋषि रहात असत अशी दंतकथा सांगतात. करवीर पुराणामध्यें पन्हाळ्याचें पन्नगालय असें नांव आढळतें. जुन्या शिलालेखांत त्याचें पद्मनाल असें नांव लिहिलेलें आहे. साताऱ्यास एक ताम्रपट सांपडला त्यांत इ० स० ११९१--९२ त पन्हाळा हें शिलाहार राजा दुसरा भोज याच्या राजधानीचें शहर होतें असें लिहिलें आहे. हा राजा त्या पूर्वी कोल्हापुरच्या

उत्तरेस वलवड येथें राहत असे. त्यालाच हल्लीं वलिवडें असें म्हणतात, व तें कोल्हापुरच्या उत्तरेस ४॥ मैलांवर आहे. भोजराजानें एकंदर पंधरा किल्ले बांधिले, व त्यांत बावडा, भूधरगड, पन्हाळा, सातारा आणि विशाळगड हे मुख्य होते. इ० स० १२०९–१० च्या सुमारास देवगिरीच्या यादवांनीं भोजराजाचा पराभव केल्यामुळें त्याच्या हातून पन्हाळा किल्ला गेला. पुढें तो किल्ला कांहीं दिवस पुंडपाळेगार लोकांच्या ताब्यांत होता असें दिसतें. इ० स० १३९६ त किल्ल्याचे आग्नेयीस नभापूर नांवाचें शहर स्थापन झालें असा शिलालेख सांपडतो. इ० स० १४८९ त तो किल्ला विजापुरच्या अदिलशाही घराण्याचे ताब्यांत गेला. त्या वेळीं तेथील बादशाहानें त्याची उत्तम रीतीनें दुरस्ती केली. किल्ल्याचे भक्कम तट व दरवाजे याच घराण्यांतील पुरुषांनीं बांधले, व त्यांचें बांधकाम बरोबर शंभर वर्षें चाललें होतें, अशी दंतकथा आहे. इब्राहिम अदिलशाहा किंवा पहिला इब्राहिम इ० स० १५३४-५७ याच्या कारकीर्दींत खोदलेले पुष्कळ शिलालेख या किल्ल्यांत आहेत. इ० स० १६५९ त शिवाजीनें विजापुरचा सरदार अफजूलखान यास ठार मारल्यानंतर लौकरच पन्हाळा किल्ला विजापूरकरांपासून जिंकून घेतला. तेव्हां विजापुरसरकारानें शिद्दीजोहार यास पन्हाळा शिवाजीपासून परत जिंकून घेण्याकरितां पाठवून दिलें. शिद्दीनें तावडतोब किल्ल्यास वेढा दिला. त्या वेळीं शिवाजी या किल्ल्यांतच होता. किल्ल्यास सुमारें चार महिने वेढा पडला होता. ह्या वेढयाचें काम शिद्दीजोहार यानें मोठ्या नेटानें चालविलें होतें. शेवटीं निरुपाय होऊन

शिवाजीनें मोठ्या युक्तीनें आपली तेथून सुटका केली, व तो कोल्हापुरच्या नैर्ऋत्येस पंचावन मैलांवर रांगणा किल्ल्यावर निघून गेला. या कामीं शिवाजीचा शूर सरदार बाजी देशपांड्या यानें स्वामीसेवेकरितां आपले प्राण खर्ची घातले. नंतर अल्ली अदिलशाहा स्वतः येऊन त्यानें पन्हाळा, व पावनगड हे दोन्ही किल्ले सर केले. इ. स. १६७३ त शिवाजीनें विजापुरकरांपासून तो किल्ला परत जिंकून घेतला. इ. स. १६७४ त विजापुरच्या बादशाहाचा सरदार अबदुल करीम यानें पन्हाळा घेण्याकरितां आपली शिकस्त केली, परंतु किल्ला त्याचे हातीं लागला नाहीं, व शिवाजीचे मृत्यूपर्यंत तो मराठ्यांचे ताब्यांत होता. शिवाजीनें मरणाचेपूर्वीं कांहीं दिवस आपला पुत्र संभाजी यास त्याच्या वाईट वर्तणुकीबद्दल पन्हाळा किल्ल्यावर कैदेंत ठेविलें होतें. शिवाजी रायगड येथें मृत्यु पावल्यावर त्याची धाकटी बायको सोयराबाई हिनें दरबारी मंडळीच्या साहाय्यानें संभाजीचा गादीवरचा हक्क उडवून टाकून तिचा पुत्र राजाराम याचे नांवानें राज्यकारभार पाहण्यास सुरवात केली. संभाजीस ही बातमी कळतांच त्यानें किल्ल्यावरील शिबंदीस वश करून घेऊन आपली सुटका केली. पुढें त्यास हंबीरराव मोहिते सेनापति हाही येऊन मिळाला. नंतर तो तावडतोब रायगडास आला, व राजारामाचे पक्षाचे मंडळीचा विध्वंस करून आपण गादीवर बसला. पुढें ९ वर्षांनीं ह्मणजे इ. स. १६८९ त औरंगजेबाचा सरदार तकरीबखान यानें संभाजीस कोकणांत संगमेश्वर येथें कैद केलें. त्या वेळीं पन्हाळा किल्ला मोंग-

लांचे ताब्यांत गेला. पुढें इ. स. १६९२ त विशाळगड-च्या पंतप्रतिनिधि घराण्याचा मूळ पुरुष परशुराम त्रिंबक यानें तो किल्ला मोंगलांपासून परत जिंकून घेतला. इ. स. १७०१ त औरंगजेब बादशाहानें जातीनें या किल्ल्यास वेढा देऊन तो मराठ्यांपासून घेतला. ता० २८ एप्रिल १७०१ रोजीं इंग्लिशांचा वकील सर वुइलियम नॉरिस हा पन्हाळा किल्ल्यावर औरंगजेबाच्या भेटीस गेला, व त्यानें त्यास २०० मोहरा नजर करून आपणांस–इंग्लिशलोकांस–त्याचे राज्यांत व्यापाराच्या सवलती मिळाव्या म्हणून त्या-च्याशीं बोलणें लाविलें. परंतु त्या वेळीं बादशाहानें त्याचें बोलणें मान्य केलें नाहीं. औरंगजेब पन्हाळा सोडून गेला नाहीं तोंच हल्लींच्या बावडेकर घराण्याचा मूळपुरुष रामचंद्र-पंत यानें त्याच वर्षी (इ. स. १७०१) तो परत जिंकून घेतला. इ. स. १७०५ त राजारामाची स्त्री प्रसिद्ध तारा-बाई हिनें पन्हाळा येथें आपली गादी स्थापिली, व तेथें राहून ती आपला सर्व कारभार पाहूं लागली. इ० स० १७०८ त संभाजीचा पुत्र शाहू व ताराबाई यांच्यांत गादीविषयीं तंटा सुरू झाला, व इ० स० १७०९ त शाहूनें ताराबाईवर स्वारी करून पन्हाळा किल्ला घेतला, तेव्हां ताराबाई मालवणास पळून गेली. नंतर वाडीचा फोंड सावंत याच्या मदतीनें ती पुनः कोंकणांतून निघून पन्हाळ्यास आली, व त्याच वर्षी तिनें तो किल्ला पुनः हस्तगत केला. तेव्हांपासून आज-पर्यंत तो किल्ला कोल्हापूर सरकारच्या अमलाखालीं आहे. कोल्हापुरच्या राणीसाहेब जिजाबाई यांच्या कारकीर्दींत पन्हाळा येथें नरमेध करीत असत. हा नरमेध राणी-

साहेबांच्या वाडयाजवळच होत असे, व तो महाकालिका देवीस संतुष्ट करण्याकरितां करीत असत. त्या राणीसाहेबांची व इतर भोळ्याभाविकांची अशी समजूत झाली होती कीं, जोंपर्यंत या नरमेधानें महाकालीला संतुष्ट ठेवतां येईल, तोंपर्यंत या किल्ल्यावर कधींही परचक्र येणार नाहीं. ह्या महाकालीचें देवालय आंतल्या किल्ल्यांत दाट झाडीमध्यें होतें. तेथें पूर्वी दोन बुरूज होते. त्यांपैकीं हल्लीं एक अवशिष्ट असून त्यास काली देवीचा बुरूज असें म्हणतात. जिजाबाई साहेब इ० स० १७७२ त कैलासवासी झाल्या. मेजर ग्राहाम हे त्या प्रांतांत असतां त्यांना एक सनद मिळाली होती. ती सनद एका तेल्यानें पन्हाळ्याच्या एका बुरुजाखालीं जिवंत पुरण्याकरितां आपली सून सरकारच्या स्वाधीन केली ह्मणून त्या तेल्याला कांहीं जमीन इनाम दिली होती त्याबद्दल होती. परंतु ती कोणीं दिली तें त्या सनदेवरून कळत नाहीं असें ते साहेब लिहितात. इ० स० १७८२ त कोल्हापुरच्या राजांनीं पन्हाळा येथून आपली गादी हालवून कोल्हापुरास आणिली. शहाजी महाराजांच्या कारकीर्दींत (इ० स० १८२१–३७) इ० स० १८२७ या वर्षी कांहीं दिवस पन्हाळा व पावनगड हे किल्ले इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतले होते. चौथे शिवाजी महाराज (इ. स. १८३७-६६) हे अज्ञान असतां इ. स. १८४४ त कोल्हापूर प्रांतीं बंड होऊन बंडवाल्यांनीं पन्हाळा व पावनगड हे किल्ले घेतले. त्यांनीं साताराच्या राजाच्या दरबारीं कर्नल ओव्हन्स नांवाचा साहेब रेसीडेंटीवर होता, तो बाहेर फिरत असतां त्यास कैद केलें व त्यास पन्हाळगडावर ठेविलें.

इंग्लिशांनीं दिलामोटी नांवाच्या साहेबाच्या हाताखालीं कांहीं फौज देऊन त्यास बंडवाल्यांवर पाठवून दिलें. त्यानें इ. स. १८४४ च्या दिजंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस तटाला खिंडार पाडून आंतील लोकांवर हल्ला करून पन्हाळगड घेतला, व त्याची तटबंदी पाडून टाकिली. त्या वेळीं इंग्लिशांनीं १८४९ लष्करी लोक व शंभर तोफा इतका सरंजाम किल्ल्याच्या संरक्षणाकरितां तेथें ठेविला होता.

हल्लीं पन्हाळा हें पन्हाळा तालुक्याचें मुख्य ठिकाण असून कोल्हापूर संस्थानापैकीं उत्कृष्ट हवेचें एक ठिकाण आहे. पन्हाळ्याचे दोन भाग आहेत; एकाला किल्ला पन्हाळा किंवा 'हुजूर बाजार' असें म्हणतात. हा टेंकडीच्या अगदीं माथ्यावर आहे. दुसऱ्या भागांत किल्ल्यांतील रविवार, मंगळवार, गुरुवार, आणि इभ्रमपूर या पेठा मोडतात. दोन्ही भाग मिळून सुमारें २९०० लोकांची वस्ती आहे. टेंकडीच्या माथ्यावर कोठें खोल तुटलेले कडे, कोठें तळीं, कोठें वृक्षछायेखालीं असलेले पाण्याचे झरे इत्यादि गोष्टींचा देखावा फारच रमणीय दिसतो. पावसाळा शिवाय करून बाकीच्या ऋतुकालीं तेथील हवा फारच उत्तम असते. आजपर्यंत पन्हाळा येथें पटकीचा उपद्रव झालेला ऐकिवांत नाहीं; याचें मुख्य कारण तेथील पाणी फारच उत्तम व पाचक आहे. तेथील सर्वांत उत्कृष्ट झऱ्याला नागझरी असें म्हणतात. साधोबा व सोमाल या दोन तळ्यांतील पाण्याचा किल्ल्यांतील लोकांस पुरवठा आहे. पहिलें तळें २२१ फूट लांब, १४८ फूट रुंद व ३५ फूट खोल आहे, व दुसरें तळें २२० फूट लांब, १९०

फूट रुंद व १७ फूट खोल आहे. ह्या दोन्ही तळ्यांना खालीं उतरण्यास दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. किल्ल्यांतील मुख्य विहिरीस श्रृंगारबाव किंवा अंधारबाव असें ह्मणतात. ही किल्ल्याच्या पश्चिमेकडील तटाला लागून आहे. दर आदित्यवारीं या किल्ल्यांत बाजार भरतो. त्या दिवशीं सुमारें बाहेरचें १००० मनुष्य येतें, व सुमारें ९०० रुपयांची विक्री होते. किल्ल्याच्या पायथ्याशीं ज्या वाड्या आहेत तेथें दर गुरुवारीं बाजार भरतो. पन्हाळा येथें मामलेदार कचेरी, फौजदार कचेरी, व सबरजिस्ट्रार कचेरी अशा तीन सरकारी कचेऱ्या असून शिवाय एक मराठी शाळा व तिचीच एक पोटशाळा अशा दोन शाळा आहेत. युरोपियन लोकांस उतरण्याकरितां एक बंगला आहे, व हिंदु वाटसरू मंडळीस उतरण्याकरितां तीन चार देवालयें आहेत. जुने रस्ते पूर्वीं अरुंद होते ते हल्लीं रुंद केलेले आहेत, व दर वर्षास सरकारी खर्चानें त्यांची दुरुस्ती होत असते.

किल्ल्यांत पडापड झालेल्या जुन्या इमारती बऱ्याच आहेत. सर्वांत जुनें काम म्हटलें ह्मणजे बालेकिल्ला होय. हा किल्ल्याच्या मध्यभागीं असून त्याच्या सभोंवार उंच तट आहे. परंतु ह्या तटाची हल्लीं पडापड झालेली आहे. बालेकिल्ल्यांत फणसाचीं, आंब्याचीं, पेरूचीं वगैरे पुष्कळ झाडें आहेत. आंत पूर्वीं एक राजवाडा होता, परंतु हल्लीं त्याचा फक्त चौथरा मात्र दृष्टीस पडतो, व झाडझुडपांत गडप होऊन गेलेलीं कांहीं खांबांचीं उथळीं दृष्टीस पडतात. याशिवाय या किल्ल्यांत फक्त दगड व चुना यांनीं बांधलेल्या जुन्या तीन कोठ्या आहेत; सर्वांत मोठ्या कोठीला

'गंगा कोठी' असें म्हणतात. तिला दोन दारें आहेत. परंतु तीं हल्लीं गाळ सांचल्यामुळें गच्च भरून गेलीं आहेत. या कोठीच्या दोन्ही बाजूंस दोन दगडी जिने आहेत, व तिच्या माथ्यावर धान्य ओतण्याकरितां भोकें ठेविलेलीं आहेत. याशिवाय 'धर्मकोठी' म्हणून एक कोठी हल्लींच्या मामलेदार कचेरीच्या शेजारीं आहे. किल्ल्याच्या पूर्वेस तटाला लागून 'कलावंतिणीचा सज्जा' म्हणून एक जागा आहे. ह्या इमारतीच्या सुंदर नक्षीदार कडीपाटाचा फारच थोडा भाग हल्लीं अवशेष राहिला आहे. ही इमारत ६० फूट लांब, ३५ फूट रुंद, व ५८ फूट उंच आहे. किल्ल्याचे उत्तर भागांत हल्लींच्या कोल्हापुरच्या महाराजांचा राजवाडा आहे. हा वाडा दुमजली आहे, व ह्यांत सुमारें २०० मनुष्यें राहण्यासारखी जागा आहे. ह्या राजवाड्याच्या पूर्वेस तटाशेजारीं 'सज्जेकोठी' म्हणून एक दुमजली दगडी इमारत आहे. किल्ल्याचे दक्षिण भागांत तटाशेजारीं तालीमखान्याची जागा आहे. ह्या इमारतीला घुमटाच्या तीन खोल्या आहेत. येथें पूर्वीं तालीम करीत असत. मामलेदार कचेरीच्या दक्षिणेस 'रेडे महाल' म्हणून १०१ फूट लांब, ५३ फूट रुंद, व ३६ फूट उंच अशी एक इमारत आहे. मामलेदार कचेरीला लागूनच संभाजी महाराज (इ. स. १७१२–१७६०) यांचें देवालय आहे. या देवालयाच्या समोर संभाजी महाराजांच्या राणी साहेब जिजाबाई यांचें देवालय आहे. मुसलमानी अमलांतील इमारतींपैकीं मुख्य इमारत म्हटली ह्मणजे साधोबा नांवाच्या मुसलमान साधूचा मठ ही होय. हिच्या सभोंवार दगडी भिंत आहे. दरवर्षीं येथें उरूस भरत

असतो. येथें पूर्वीं पाराशर ऋषि राहत असत असें करवीर-माहात्म्य नामक ग्रंथांत वर्णन केलें आहे. तसेंच किल्ल्याच्या दक्षिणेस खडकांत खोदलेली एक गुहा आहे, तिला पाराशर ऋषींची गुहा असें म्हणतात.

४ **पावनगड**.–हा किल्ला पन्हाळगडाच्या पूर्वेस सुमारें अर्ध्या मैलावर एका डोंगरावर बांधलेला आहे. पन्हाळगड व पावनगड यांच्यामध्यें एक मोठें खोरें आहे. या किल्ल्याच्या सभोंवार पंधरा पासून वीस फुटांपर्यंत एकसारखा तुटलेला कडा असल्यामुळें त्याला विशेष बळकटी आलेली आहे; व जेथें जेथें कड्याचा चढाव सोपा असें वाटलें तेथें तेथें खडक फोडून तो अवघड केलेला आहे. किल्ल्याच्या सभोंवार १४ फूट उंचीचा काळ्या दगडांचा भक्कम तट घातलेला आहे. किल्ल्याला पूर्वीं दोन दरवाजे होते, ते इ० स० १७४४ त इंग्लिश सरकारानें पाडून टाकिले, व किल्ल्याचा तटही फोडून टाकला. हल्लीं हा किल्ला ओसाड आहे. परंतु आंतील पाणी फार चांगलें आहे.

५ **रांगणा किल्ला**.—हा किल्ला सह्याद्रीच्या एका सपाट माथ्याच्या फांट्यावर बांधलेला आहे. याची उंची २६०० फूट आहे. हा किल्ला भूधरगडाच्या नैर्ऋत्येस ३० मैलांवर, व कोल्हापुरच्या नैर्ऋत्येस ५९ मैलांवर आहे. ह्या डोंगराची तीन बाजूंची चढण फार अवघड आहे. फक्त उत्तरेकडील चढाव सोपा आहे. किल्ल्याचा तट बिनटांकीच्या दगडांचा परंतु चुन्यानें बांधलेला आहे. किल्ल्यांतून खालीं उतरण्यास तीन पायवाटा आहेत. किल्ल्यांतील प्रदेश उंचसखल आहे. त्याची पूर्वपश्चिम लांबी ४७९० फूट, व दक्षिणोत्तर रुंदी २२४० फूट

आहे. हल्लीं आंत मुळींच वस्ती नाहीं आंत तीन विहिरी, व दोन लहान टांकीं आहेत. हल्लीं किल्ल्याच्या उतरणीवर वरी, नाचणी, हरीक वगैरे धान्य पिकतें. इ० स० १६५९ त शिवाजीनें हा किल्ला मुसलमानांपासून घेतला, व त्याची उत्तम दुरुस्ती केली. तेव्हांपासून मराठ्यांचें राज्य लयाला गेलें तरी तो अद्यापि मराठ्यांच्या (कोल्हापूर सरकारच्या) ताब्यांत आहे. शाहूमहाराज व ताराबाई यांच्यांत गादीविषयीं तंटा लागला तेव्हां ताराबाई रांगण्यास जाऊन राहिली होती. शाहूमहाराजांनीं त्या किल्ल्यास वेढा दिला व तो घेण्याकरितां आपली पराकाष्ठा केली, परंतु त्या वेळीं तो किल्ला त्यांचे हातीं आला नाहीं (इ० स० १७०९). इ० स० १८४४ त कोल्हापूर प्रांतांतील गडकरी लोकांनीं बंड केलें त्या वेळीं ब्रिटिश सरकारच्या हुकुमावरून कोल्हापूर सरकारानें रांगण्याची तटबंदी पाडून टाकिली. त्याला प्रसिद्धगड असेंही नांव आहे. तो पन्हाळ्याच्या शिलाहार राजांनीं जे १९ किल्ले बांधले त्यांपैकीं एक आहे अशी त्याची दंतकथा आहे.

६ **सामानगड.**—हा किल्ला गडइंग्लजच्या दक्षिणेस साडेतीन मैलांवर एका एकीकडे झुकलेल्या दीर्घ वर्तुळाकृति अशा डोंगराच्या फांद्यावर बांधलेला आहे. समुद्राच्या सपाटीपासून याची उंची २६०० फूट आहे, व रुंदी २६० फूट आहे. डोंगराच्या माथ्यासभोंवार ८ फूट उंचीचा तट घातलेला आहे. किल्ल्यांत खडकांत खोदलेलीं पाण्याचीं पुष्कळ टांकीं आहेत. पूर्वीं या किल्ल्याच्या संरक्षणाकरितां ३५० शिपायी, १० तोफा, १०० बंदुका, व २०० तलवारी इतका सरंजाम असे. इ. स. १६७६ त

हा किल्ला शिवाजीचे ताब्यांत आला, तेव्हां त्यानें त्याची उत्तम दुरुस्ती केली. शिवाजीच्या अमलांतील किल्लयांमध्यें हा जरी लहान किल्ला होता, तरी तो सर्वांत अतिशय बळकट होता. निजामाचे स्वारांनीं या किल्लयास १२ वर्षें वेढा दिला होता, तसेंच पटवर्धन व निपाणिकर यांनीं त्याला वेढा दिला होता, परंतु तो त्यांना घेतां आला नाहीं. कोल्हापुरचा दिवाण दाजी पंडित यानें अविचारानें या किल्लयांतील गडकऱ्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या इनाम जमिनी मामलेदाराच्या देखरेखीखालीं दिल्या. तेव्हां त्या लोकांस मोठा राग येऊन त्यांनीं इ. स. १८४४ त बंड केलें, व किल्लयाचे दरवाजे लावून घेतले. पुढें इंग्लिशांचा सरदार जनरल दिलामोटी यानें ता. १३ आक्टोबर सन १८४४ रोजीं तो किल्ला गडकरी लोकांचा पराभव करून घेतला, व पुढें त्या किल्लयाचा तट पाडून टाकिला. पूर्वी तेथें मामलेदाराचें ठाणें असे, परंतु इ. स. १८४४ त तें तेथून काढून गडइंग्लज येथें आणिलें.

७ विशाळगड.—हा किल्ला कोल्हापुरच्या वायव्येस ४५ मैलांवर गजापूर नांवाच्या डोंगरावर बांधलेला आहे. याची लांबी ३२०० फूट व रुंदी १०४० फूट आहे. या किल्लयाचा तट, त्याचे दरवाजे, व बुरूज यांची हल्लीं बहुतेक पडापड झालेली आहे. किल्लयांत सुमारें पंधरावीस घरें आहेत. आंत कोल्हापुरच्या प्रतिनिधींचा जुना वाडा असून एक मशीद आहे. या मशिदींत १७ फूट लांब १५ फूट रुंद व आठ फूट उंच अशी हजरत मालिक रहान पीर नांवाच्या मनुष्याची कबर आहे. दर वर्षी जिल्हेज महिन्याच्या तेराव्या तारखेस तेथें उरूस भरतो, व त्याला

हिंदुमुसलमान मिळून सुमारें तीन चारशें लोक जमतात. ह्या मशिदीला सरकारांतून सालीना ९० रुपयांची नेमणूक आहे. किल्ल्यांत भोपाळ व अर्धचंद्र अशीं दोन पाण्याची तळीं असून शिवाय एक टांकें आहे. भोपाळ तलावाचें क्षेत्रफळ ६४०० फूट असून तो भोपाळ नांवाच्या राजानें बांधला अशी दंतकथा सांगतात. अर्धचंद्र तलाव सतरा फूट लांब, पंधरा फूट रुंद व आठ फूट खोल आहे. इ. स. १६५९ त शिवाजीनें हा किल्ला मुसलमानांपासून घेतल्यावर त्याची देखरेख रामचंद्रपंत अमात्य यास सांगितली. तेव्हां त्यानें हा तलाव बांधला असें सांगतात. आंतील टांकेंही ३२४ चौरस फूट असून दहा फूट खोल आहे, व तेंही रामचंद्रपंतानेंच बांधलें.

या किल्ल्याचे संबंधानें दंतकथेवरून अशी माहिती मिळते कीं, इ. स. १००० च्या सुमारास विशाळगड भोपाळ नांवाच्या एका हिंदु राजाच्या अमलाखालीं होता. भोपाळ तलाव त्यानेंच बांधला. आंतील मशिदीच्या भिंतीवर एक फारशी शिलालेख आहे, त्यांत असें लिहिलें आहे कीं, " हा किल्ला भोज नांवाच्या एका हिंदु राजाच्या ताब्यांत होता. मी मालिक रहान यानें सहा वेळ किल्ल्यास वेढा दिला परंतु तो माझे हातीं आला नाहीं. नंतर सातव्यानें मीं किल्ल्यास वेढा दिला, व तो माझे हातीं आला. " तसेंच दौलत बुरुजावर आणखीं एक शिलालेख आहे, त्याचा सारांश असा आहे कीं, ' दीर्घ प्रयत्नानें मोठमोठ्या संकटांतून पार पडतां येतें ' असा जगाचा नियम आहे. 'दौलत बुरुजाचें काम फारच उत्तम रीतीनें पुरें केलें आहे. ' ' जर तुम्हाला तो कधीं

बांधला याची तारीख पाहिजे असेल तर ती दौलत बुरूज याच अक्षरांत आहे.'

'दौलत बुरूज' या फारशी अक्षरांतून ओढून ताणून ६४५ (इ. स. १२४७) असा अंक काढतां येतो, व याच वर्षाच्या सुमारास विशाळगड मुसलमानांचे हातून गेला. इ. स. १४५३ च्या सुमारास अल्लाउद्दीनखान बाहामणी (इ. स. १४३५–१४५७) याचा सेनापति मालिक-उल्-तुजार हा विशाळगडच्या रस्त्यानें आपल्या सैन्यासह कूच करीत असतां शंकरराव मोरे नांवाच्या मराठे सरदारानें त्याच्यावर अकस्मात् छापा घालून त्याला कैद केलें, व त्याच्या सर्व सैन्याची कत्तल केली. इ. स. १४६९ त प्रख्यात बाहामणी सरदार महंमद गवान यानें शंकररावाचा पराभव केला. त्यानें विशाळगडास वेढा घातला, परंतु तो हातीं येण्यास त्याला नऊ महिने झटापट करावी लागली. बाहामणी राज्य मोडल्यावर इ. स. १४८९ त या किल्ल्याचें स्वामित्व विजापुरच्या बादशाहांकडे गेलें. तेव्हांपासून सुमारें पावणे दोनशें वर्षें तो विजापूर सरकारचे ताब्यांत होता. इ. स. १६५९ त शिवाजीनें विजापुरकरांपासून तो किल्ला घेतला, व इ. स. १६६० त त्यानें त्याचा प्रतिनिधि परशुराम त्रिंबक यास तो इनाम दिला. तेव्हांपासून आज तागायत तो त्याच्या वंशजांच्या ताब्यांत आहे. इ. स. १६६१ त विजापुरचा सरदार फजलखान हा बरोबर मोठें सैन्य घेऊन आला, व त्यानें विशाळगडास वेढा दिला. हा वेढा पुष्कळ महिने पडला होता. त्यानें

सुरुंग लावून किल्ल्याचा पश्चिमेकडील कोपरा उडविण्याचा प्रयत्न केला, त्याचप्रमाणें घोणसली नांवाच्या शेजारच्या डोंगराच्या माथ्यावरून किल्ल्यावर तोफांचा भडिमार चालविला. परंतु तो त्याचा सर्व प्रयत्न व्यर्थ गेला. विजापुरच्या सैन्यानें पाण्याकरितां शेजारच्या गजापूर नांवाच्या खेड्यांत खोदलेल्या विहिरींच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात, व ज्या ठिकाणीं त्या सैन्यानें तळ दिला होता, त्या जागेला अद्यापि 'बादशाहाचा माळ' असें म्हणतात. इ. स. १७३० त कोल्हापूर व सातारा हीं दोन्हीं राज्यें पृथक् झालीं, तेव्हां कोल्हापुरच्या संभाजीनें (इ. स. १७१२--१७६०) जनार्दनपंत प्रतिनिधि यास विशाळगडची पुनः नवीन सनद करून दिली. इ. स. १८४४ पर्यंत प्रतिनिधि विशाळगड येथें राहून आपला सर्व कारभार पहात असत. परंतु त्या वर्षीं गडकरी लोकांनीं जें बंड केलें त्यांत तो किल्ला बंडखोर लोकांचे हातीं गेला. पुढें त्या बंडाचा मोड झाल्यावर इंग्लिश सरकारानें तो किल्ला पाडून टाकिला, व तेव्हांपासून प्रतिनिधि मलकापूर येथें राहूं लागले.

वर सांगितलेल्या डोंगरी किल्ल्यांशिवाय कोल्हापूर संस्थानाखालीं मोडणारे तीन भुईकोट किल्ले होते. (१) गडइंग्लज—हा किल्ला कापशी संस्थानचे मालक घोरपडे यांनीं इ० स० १७०० च्या सुमारास बांधला होता. हल्लीं त्याची सर्वत्र पडापड झालेली आहे. (२) कागल—येथें पूर्वीं किल्ला होता. कोल्हापुरचा सरदार यशवंतराव शिंदे यानें इ. स. १७८० च्या सुमारास तो पाडून टाकिला. नंतर इ. स. १८१३ त हिंदुराव घाटगे यानें त्याच जागेवर

पुनः नवीन किल्ला बांधला. त्याची पूर्वपश्चिम लांबी ३७७ फूट व उत्तरदक्षिण रुंदी ३६६ फूट आहे. किल्ल्याचा तट रुंद व मजबूत आहे. सभोंवार खंदक आहे. हल्लीं तट पुष्कळ ठिकाणीं पडलेला आहे. इ. स. १८५८ त इंग्लिश सरकारानें या किल्ल्याच्या तटाचा पूर्वेकडील भाग पाडून टाकिला. (३) कोल्हापूर—येथील किल्ल्याचे संबंधानें अशी दंतकथा आहे कीं, जैन लोक ब्रह्मपुरी टेकडीवर अंबाबाईचें देवालय बांधीत असतां जयसिंग नांवाच्या क्षत्रिय राजानें हा किल्ला बांधला. हा जयसिंग कोल्हापुरच्या पश्चिमेस सुमारें ९ मैलांवर विड या शहरीं राहत असे. बाराव्या शतकांत कलचुरी घराण्यानें कल्याणचे चालुक्य राजांस जिंकून दक्षिणेचें आधिपत्य मिळविल्यावर तें व चालुक्यांचे मांडलिक कोल्हापुरचे शिलाहार राजे यांच्यामध्यें या किल्ल्याचे संबंधानें पुष्कळ दिवस युद्ध चाललें होतें. पूर्वी कोल्हापूर हें एक साधारण खेडें होतें. विजापुरच्या बादशाहांच्या अमलांत विजापुरचा कोणी तरी एक सरदार पन्हाळा किल्ल्याच्या संरक्षणाकरितां नेहमीं कोल्हापूर येथें छावणी देऊन असे. इ. स. १६५९ त शिवाजीनें कोल्हापूर घेतलें. इ. स. १७३० त कोल्हापुरचें राज्य सातारच्या मुख्य गादीपासून विभक्त झाल्यावर कोल्हापूर शहर फार भरभराटीस आलें. इ. स. १७८२ त कोल्हापुरचे राजे पन्हाळा सोडून कोल्हापूर येथें आले. या पूर्वी चोरटे लोकांचा किंवा परशत्रूचा उपद्रव न व्हावा म्हणून कोल्हापुरच्या सभोंवार एक मातीची भिंत मात्र होती. पुढें पटवर्धन व कोल्हापुरकर यांच्यामध्यें इ. स. १७७३ पासून १८१० पर्यंत जे तंटे मा-

जले होते, त्या वेळीं कोल्हापुरच्या सभोंवार असलेला मातीचा कोट पाडून ३० फूट उंच व दहा पासून २० फुटांपर्यंत रुंद असा पावणे दोन मैल परिघाचा भक्कम दगडी कोट बांधला. या कोटाला समान अंतरावर ४६ बुरूज होते, व त्याच्या सभोंवार खोल व रुंद असा खंदक होता. तटाला एकंदर सहा दरवाजे होते, व त्यांपैकीं तीन दुहेरी होते. दरवाज्यांचीं दारें भक्कम असून त्यांना बाहेरून लांब लांब चोंचीचे लोखंडी खिळे मारलेले होते. त्या दरवाज्यांचीं गंगा दरवाजा, रंकाळें दरवाजा, वरुणतीर्थ दरवाजा, आदित्यवार दरवाजा, मंगळवार दरवाजा व शनवार दरवाजा अशीं नांवें होतीं. प्रत्येक दरवाज्याच्या तोंडाशीं खंदकावर काढतां व घालतां येण्यासारखा पूल तयार केलेला होता. दरवाजे रात्रीस अकरा वाजतां लागत असत, व पहाटेस चार वाजतां उघडत असत. कोल्हापुरची लोकसंख्या वाढत चालली तसतसे लोक किल्ल्याच्या बाहेर वस्ती करूं लागले. अशा रीतीनें एकंदर दहा पेठा किल्ल्याचे बाहेर वसल्या. कोल्हापुरची हवा पूर्वीपासून चांगलीशी नव्हती. ती सुधारण्याकरितां अलीकडे पूर्वीच्या किल्ल्याच्या भिंती पाडून टाकिल्या, व सभोंवतालचा खंदक भरून काढिला.

सांगली संस्थान.

सांगली संस्थानाखालीं मोडणारा मुलूख तुटक तुटक असून तो उत्तरेस सातारा व सोलापूर ह्या जिल्ह्यांपासून द-

क्षिणेस तुंगभद्रा नदीपर्यंत पसरला आहे. या संस्थानाचें क्षेत्रफळ १०८३ चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या सुमारें दोन लाख आहे, व वसूल सुमारें आठ नऊ लक्ष रुपये आहे.

सांगली संस्थानाचे सहा पेटे केलेले आहेत. त्यांचीं नांवें:--१ मिरजप्रांत, २ कुची, ३ मंगळवेढें, ४ तेरडळ, ५ शाहापूर, ६ शिरहट्टी.

या संस्थानांत बरेच किल्ले आहेत. परंतु ते सर्व भुईकोट आहेत. त्यांचें वर्णन येणेंप्रमाणें:—

१ दोदवाडचा किल्ला:—हा किल्ला धारवाडच्या उत्तरेस १४ मैलांवर आहे. हा किल्ला पूर्वाभिमुख असून चतुष्कोण आहे. त्याचे कांहीं बुरूज वाटोळे, कांहीं अर्धचंद्राकृति, व कांहीं चतुष्कोण आहेत. त्याची उत्तर बाजू ९७ फूट, पूर्वबाजू ७२७ फूट, दक्षिणबाजू ८५ फूट, व पश्चिम बाजू ६७२ फूट आहे. हा किल्ला एका खडकाळ टेंकाडावर किंवा दरडीवर बांधलेला आहे. त्याच्या तटाची उंची साधारण २० फूट आहे. तटाचें निमे काम दगडी असून निमे विटांचे केलेलें आहे. तटाला बंदुका मारण्याकरिता भोंकें पाडलेलीं आहेत. तटावर ४ फूट उंचीची पडभिंत आहे. किल्ल्याच्या सभोंवार खंदक असून त्याची रुंदी २५ फूट व खोली १२ पासून १९ फुटांपर्यंत आहे. हा किल्ला अद्यापि चांगल्या स्थितींत आहे. या किल्ल्यांत पूर्वीं एक मोठा वाडा व एक मशीद अशा दोन इमारती होत्या असें सांगतात. परंतु हल्लीं त्यांच्या कांहींच खाणाखुणा दृष्टीस पडत नाहींत.

हा किल्ला कोणीं कधीं बांधिला तें कळत नाहीं. परंतु इ. स.

१६६७ त विजापुरच्या बादशाहानें हिसार किंवा किल्ला दोदवाड येथील दिवाणास त्या किल्ल्याचे संबंधानें सालीना अमुक एक रकम खर्च करावी असा हुकूम पाठविल्याचें आढळून येतें. त्यावरून तो किल्ला त्या वर्षाच्या पूर्वीं केव्हां तरी बांधलेला असावा असें उघड दिसतें. विजापूर सरकारच्या मागून दोदवाड किल्ल्याचें स्वामित्व सावनूरच्या नबाबांकडे गेलें. पुढें इ. स. १७५६ त बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांनें सावनूरच्या नबाबापासून जे २२ परगणे घेतले, त्यांत दोदवाडचें नांव आहे. या परगण्यांपैकीं कांहीं परगणे पुढें गोपाळराव गोविंद पटवर्धन याच्या मध्यस्थीमुळें सावनूरच्या नबाबास परत मिळाले. गोपाळरावानें अशा प्रकारें उत्कृष्ट कामगिरी बजाविल्यामुळें सावनूरचा नबाब अबदुल हकीमखान यानें इ. स. १७६९ त दोदवाड गांव पहिले माधवराव पेशवे यांच्या मंजुरीनें त्यास इनाम दिला. इ. स. १७९२ त टिपू सुलतान यानें दोदवाडचा किल्ला व गांव घेऊन एक वर्षभर आपले राज्यांत सामील केला. इ. स. १७९३ त पेशव्याचे फौजेनें तो परत घेऊन पटवर्धनांस दिला. इ. स. १८०१ त पटवर्धनांच्या दौलतीचा विभाग झाला त्यावेळीं दोदवाडप्रांत सांगली संस्थानचे मालक चिंतामणराव पटवर्धन यांचे अमलाखालीं आला. दोदवाडचें सालीना उत्पन्न १८२७५ रुपये आहे. हल्लीं तेथें म्युनिसिपालिटी आहे, व तिचें सालीना उत्पन्न ८०० रुपयांचें आहे. किल्ल्याचे बाहेर ईशान्य बाजूस वहिवाटदाराची कचेरी आहे. दक्षिण बाजूस पुष्कळ खुली जागा आहे. तेथें पूर्वीं बाग होता असें सांगतात. वहिवाटदाराची कचेरी

व वर सांगितलेली खुली जागा यांचा सभोंवार तट आहे. परंतु तो ज्या ठिकाणीं किल्ला बांधला आहे, त्याच्यापेक्षां सखल प्रदेशावर आहे.

२ **मंगळवेढ्याचा किल्ला**:—हा किल्ला बहुधा बेदरच्या बादशाहांनीं बांधला असावा. पूर्वीं मंगळवेढ्यास जैन लोकांचीं फार उत्तम भव्य देवालयें होतीं, तीं पाडून मुसलमानांनीं त्याच सामानानें हा किल्ला बांधला असावा असें अनुमान होतें. कारण, किल्ल्यांत विश्वनाथाचें देवालय आहे त्याच्या खांबावर अंगिरसनाम संवत्सरे शके १४९४ (इ. स. १५७२) भाद्रपद शुक्ल ३ अशी मित्ती दिली असून असें लिहिलें आहे कीं, 'हिवरगीचा कुळकर्णी व मंगळवेढयाचा मुजूमदार यानें तुल्ला याकुबखान याच्या परवानगीनें किल्ल्यांतील जगभावी बुरूजाजवळच्या एका जुन्या पाडून टाकलेल्या देवालयाचा जीर्णोद्धार केला, व त्यांत विश्वनाथाच्या लिंगाची स्थापना केली.' किल्ल्याची उत्तरबाजू १२४५ फूट, पूर्वबाजू १२०० फूट, दक्षिणबाजू ११०० फूट व पश्चिमबाजू ९२० फूट लांब आहे. त्याचा तट ३९ फूट उंच व १२ फूट रुंद आहे, फक्त पूर्वबाजूचा तट पाडलेला आहे. बाकी सर्व किल्ला फार चांगल्या स्थितींत आहे. तटाला मर्दान, कराड, चोफाळा, जगभावी, गच्ची, कैकाड, आणि वोराळें असें सात बुरूज आहेत. यांत मर्दान बुरूज सर्वांत मोठा आहे. त्याची उंची ४७½ फूट व व्यास ५० फूट आहे. बाकीच्या सहा बुरूजांपैकीं ५ वाटोळे आहेत, व चोफाळा बुरूज काटकोनाकृति आहे. सर्व बुरुजांची उंची एकसारखी नाहीं. किल्ल्याच्या सभोंवताल-

चा खंदक ८२ फूट रुंद व ६½ फूट खोल आहे. किल्ल्याचा मुख्य दरवाजा पूर्वबाजूस आहे. किल्ल्यांत चौबुरुजी नांवाचा बालेकिल्ला आहे. हा समभुज चौकोन आहे; व त्याची प्रत्येक बाजू २३० फूट लांब १८ फूट उंच, व ८ फूट रुंद आहे. त्याला रणमंडळ, रहाट, भूत, व बडेखान या नांवांचे चार बुरूज आहेत. या बुरुजांची उंची २९ फूट व प्रत्येकाचा व्यास ३० फूट आहे. चौबुरुजीला २ दरवाजे आहेत. एक पूर्वेच्या बाजूस तटाच्या बरोबर मध्यावर आहे, व दुसराही पश्चिमेच्या बाजूस तटाच्या मध्यावर आहे. ही चौबुरुजी शाहूमहाराज (थोरले) यांच्या कारकीर्दींत (इ. स. १७०८-१७४९) त्यांचे पदरचे पांढरे या आडनांवाचे सरदार मंगळवेढें परगण्याचा कारभार करीत असतां त्यांनीं बांधला असें सांगतात.

मंगळवेढें हा गांव सोलापुरच्या नैर्ऋत्येस ४२ मैल, पंढरपुरच्या दक्षिणेस १६ मैल, व सांगलीच्या ईशान्येस ६९ मैल आहे. स्कंदपुराणांत भीममहात्म्यांत मातुलिंगपुरी म्हणून ज्या शहराचें वर्णन केलेलें आहे, तेंच हें मंगळवेढें असावें असें पुष्कळ विद्वान् लोकांचें मत आहे. अकराव्या शतकांत मंगळवेढें हें कल्याणच्या चालुक्य राजांच्या अमलाखालीं असून तें एक फार नामांकित शहर असावें, व त्या ठिकाणीं त्या राजांचा एक मोठा अधिकारी राहत असावा असें अनुमान होतें. १४ व्या शतकांत तें बेदरच्या बाहामणी बादशाहांच्या अमलाखालीं गेलें. या बादशाहांच्या कारकीर्दींत दामाजीपंत नांवाच्या एका मनुष्यास मंगळवेढ्याच्या वसुलाचें काम सांगितलेलें

होतें. इ० स० १४६० या सालीं दक्षिण-हिंदुस्तानांत फार मोठा दुष्काळ पडला होता. त्याला दामाजीपंताचा दुष्काळ असें म्हणतात. त्या वेळीं मंगळवेढयाच्या वसुलाचें काम दामाजीपंताकडे असून धान्यानें भरलेलीं पुष्कळ सरकारी पेंवें त्याच्या ताब्यांत होतीं. हजारों दुष्काळपीडित लोक मंगळवेढयास येऊं लागले. तेव्हां त्यांची ती भयंकर स्थिति पाहून त्या महात्म्यास त्यांची दया आली व त्यानें तीं सरकारी पेंवें खुलीं करून सर्व धान्य गरीब लोकांस वांटून दिलें. बेदरच्या बादशाहास तें वर्तमान कळतांच त्यानें दामाजीस कैद करून हुजर आणण्याकरितां आपले लोक पाठवून दिले. ते दामाजीस पकडून घेऊन चालले असतां त्याचें कुलदैवत पंढरपुरची पांडुरंगमूर्ति हिनें महाराचें रूप धरून दामाजीस दरबारांत आणण्याचे पूर्वींच एकंदर खर्च झालेल्या धान्याच्या रकमेचा दरबारांत भरणा केला, व अशा रीतीनें आपल्या भक्तास संकटांतून मुक्त केलें. ह्या गोष्टीच्या सत्यतेबद्दल ज्याला जेवढा भाग खरा वाटेल तेवढाच त्यानें घ्यावा. परंतु अशा प्रकारचे पुण्यपुरुष फारच विरळा. इ० स० १४८९च्या सुमारास मंगळवेढें विजापूर सरकारच्या अमलाखालीं गेलें, व इ. स. १६८६ त विजापुरचें राज्य लयास गेल्यावर तें मोंगलांचे ताब्यांत गेलें. औरंगजेब बादशाहा मंगळवेढ्याचे पूर्वेस ८ मैलांवर मसनूर गांवीं छावणी देऊन बसला असतां (इ० स० १६९८-१७००) तो दररोज मंगळवेढें येथें पीर गैबी साहेब याच्या मशिदीच्या दर्शनाकरितां जात असे. या वेळची अशी एक चमत्कारिक गोष्ट सांगतात कीं, एके दिवशीं औरंगजेब बादशाहा मंगळवेढ्यास

जात असतां वाटेनें त्यास लागवड केलेलीं शेतें लागलीं. तेव्हां या परगण्याची जमाबंदी काय आहे, म्हणून त्यानें प्रश्न केला. तेव्हां त्याचें सालीना एक लाख रुपये उत्पन्न सरकारपोत्यास जमा होतें असें कळलें. औरंगजेबास ती रक्कम फार थोडी वाटून त्यानें पुढील सालीं (इ. स. १६९९) या परगण्याची जमाबंदी २ लाख करा, व त्याच्या पुढील सालीं म्हणजे इ० स० १७०० त त्याचा बसूल दोन लाख चाळीस हजार रुपये आलाच पाहिजे. असा हुकूम केला. हा जुलमी हुकूम तावडतोब अमलांत आला, व त्याप्रमाणें इ० स० १७०० त त्या प्रांताचा वसूल २४०००० रुपये घेण्यांत आला. तो वसूल इ० स० १७१६ पर्यंत तसाच जबरीनें घेत होते. पुढें सातारच्या शाहूमहाराजांचा तिकडे अमल बसल्यावर त्यांनीं बहिरजी राजे पांढरे यास त्या परगण्यावर पाठवून दिलें. त्या वेळीं त्याला तो सर्व प्रांत ओसाड असा दृष्टीस पडला. बहुतेक ठिकाणीं लोक घरेंदारें सोडून निघून गेले होते, व बहुतेक जमीन पडीत होती. पुढें त्यानें प्रथम वर्षीं १७½ रुपये चाहूरप्रमाणें सारा ठरवून सर्व जमिनीची लागवड केली (इ० स० १७१७), व त्यानें तो सारा दरवर्षास दर चाहुरास १७½ रुपये प्रमाणें वाढवीत वाढवीत इ० स० १७२२ पर्यंत दर चाहुरास १०९ रुपयेपर्यंत वाढविला. इ० स० १७५० त मेघश्याम कृष्ण पटवर्धन त्या प्रांताच्या मामलतदारीचें काम पेशव्यांच्या तर्फेनें पाहत असतां मंगळवेढें गोविंद हरी पटवर्धन यास सरंजामादाखल जो प्रांत मिळाला त्यांत मोडूं लागले. इ० स० १८०१ या सालीं पटवर्धनांच्या सरंजामाचे जेव्हां विभाग झाले तेव्हां मंगळवेढें सांगलीकरांचे वांट्यास आलें.

३ **सांगलीचा किल्ला.—सांगली** शहरांत हा किल्ला पाहण्यासारखा आहे. जुनें सांगली शहर व खण यांच्यामध्यें हा किल्ला आहे. तो अष्टकोनाकृति असून प्रत्येक बाह्य कोनाचे ठिकाणीं वाटोळे बुरूज आहेत. त्याच्या सभोंवतीं वाटोळा रुंद खंदक असून त्याची खोली सुमारें १३ फूट आहे. किल्ल्याचा तट १७ फूट उंच व १९ फूट रुंद आहे, व तो चुन्यांत दगड बसवून बांधलेला आहे. तटावर पूर्वीं पडभिंत होती, परंतु हल्लीं तिची पडापड झालेली आहे. पूर्वीं किल्ल्याच्या सभोंवार रेवणी ह्मणून दगड व चिखल मिळून एक भिंत घातलेली होती, व तिला बंदुका उडविण्याकरितां भोंकें ठेविलेलीं होतीं. परंतु हल्लीं तिचा मागमूसही नाहीं असें ह्मटलें तरी चालेल; व हल्लींच्या बहुतेक सरकारी इमारती या भिंतीचे दगड लावूनच बांधलेल्या आहेत. किल्ल्यास उत्तरेचे बाजूस एकच दरवाजा आहे. परंतु इ० स० १८५७ सालीं त्याला आणखीं एक भगदाड पाडून ठेविलें. आंत जाण्याचा पहिला दरवाजा २१ फूट उंचीच्या वाटोळ्या बुरुजांच्या मध्यें आहे. ह्या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे दुसरा दरवाजा लागतो. हा पहिल्या दरवाज्यापेक्षां फारच मजबूत आहे. याच्याही दोन्ही बाजूंस दोन मोठमोठे बुरूज असून त्याला बंदुका मारण्याकरितां तिरपीं भोकें ठेविलेलीं आहेत. याच्या आंत गेलें ह्मणजे रस्ता डाव्या हातास फुटतो. बुरुजांचे आंतले अंगास पहारेकऱ्यांच्या कोठड्या आहेत. इ० स० १८५० त हा किल्ला पाडून टाकिला, व वरील तोफा वगैरे काढून टा-

किल्या. जुन्या शहराची रचना उंच जागेवर असल्यामुळ या किल्ल्यावर तेथून सहज मारा चालण्यासारखा आहे, त्यामुळें त्याला पूर्वींपासूनच फारसें महत्त्व नव्हतें. किल्ल्यांत दिवाणखाना ह्मणून एक भव्य इमारत आहे. तेथें पूर्वीं सांगलीकर राहत असत; व त्यांचा खजिनाही तेथेंच असे. तसेंच सरकारी तुरुंग, धान्याच्या कोठ्या, लोहार व सुतार यांचे सरकारी कारखाने, मामलेदार व मुनसफ यांच्या कचेऱ्या वगैरे सर्व कारखाने किल्ल्यांतच असत.

४ **शिरहट्टीचा किल्ला.**—हा किल्ला एका आधारावरून खानगवंडे देसाई यांनीं बांधला असें आढ-

---

१ हा शिरहट्टीच्या देसायांचा मूळपरुष. अंकुशखानाच्या पांचव्या पुरुषानें इ. स. १६०७ त लक्ष्मेवर प्रांत व शिरहट्टी गांव देसायांस इनाम दिला. यासंबंधाची अशी एक चमत्कारिक दंतकथा सांगतात कीं, हे देसाई मूळ निजामाच्या राज्यांत सगर व केंभावी म्हणून दोन गांव आहेत तेथें रहात असत. ते मूळ कुदवकल जातीचे होते. परंतु फकीरस्वामी म्हणून एका लिंगायत साधूनें त्यांस लिंगायत पंथाची दीक्षा दिली. या वंशापैकीं अवलिंगवा नांवाची एक बाई भीमण्णा व सोमण्णा अशा आपल्या पुत्रांस बरोबर घेऊन फकीरस्वामीबरोबर गदग प्रांतांत कडडी येथें येऊन राहिली. नंतर ती बाई सोमण्णास बरोबर घेऊन फकीरस्वामीबरोबर श्रीशैल मल्लिकार्जुनाच्या यात्रेस निघाली. मार्गांत एके दिवशीं फकीरस्वामी त्या बाईसह अंकुशखान याचे वाडयांत एक रात्र उतरला. त्या रात्रीस तो जहागिरदार आपल्या पत्नीबरोबर बुद्धिबळें खेळत असतां इकडे डाव ऐन रंगांत येण्यास व दिव्यांतील तेल सरण्यास एकच गांठ पडली. त्यानें दिव्यांत तेल घालण्यास सांगितलें. परंतु घरांत तेल नव्हतें. त्या वेळीं जर कोणी हा डाव पुरा होईपर्यंत हा दिवा जळत ठेवील तर मी त्याला आपली सर्व जहागीर इनाम देईन असें तो बोलला. वरील बाईनें ते

ळून येतें, व दुसऱ्या एका आधारावरून तो लक्ष्मेश्वर येथीश अंकुशखान नामक पुरुषानें बांधला असें आढळतें. त्याला १९ बुरूज आहेत. किल्ल्याचा तट चांगला मजबूत आहे. परंतु इ. स. १८५८ सालीं इंग्लिश सरकारच्या हुकुमावरून उत्तरेच्या बाजूच्या तटाचा कांहीं भाग व तीन बुरूज जमीनदोस्त करून टाकलेले आहेत. तटाची उंची १९ फूट व रुंदी १५ फूट आहे. किल्ल्याचा वीरभद्र नांवाचा बुरूज शिवाय करून बाकीचे बुरूज वाटोळे बांधलेले आहेत. वीरभद्र बुरुजाची रचना अष्टकोन असून तो शिकललेल्या दगडांनीं बांधलेला आहे. किल्ल्याचा दरवाजा पूर्वाभिमुख असून त्याच्या दोहों बाजूंस दोन बुरुज आहेत, व त्या प्रत्येक बुरुजाची उंची ४० फूट व व्यास ३० फूट आहे. किल्ल्याच्या सभोंवार खंदक असून तो ८०—१०० फूट रुंद व १२ फुट खोल आहे.

शिरहट्टीचे देसाई यांना ही जहागीर कशी मिळाली याचें वर्णन मागील टीपेंत आलेंच आहे. इ. स. १६८६

शब्द ऐकतांच तिच्याजवळ तूप होतें तें दिव्यांत घालून तो दिवा तेवत ठेविला; व खेळ पुरा झाल्यावर तिनें त्या जहागिरदारास त्याच्या वचनाचें स्मरण दिलें. त्या वेळीं त्याला आपला मूर्खपणा पूर्णपणें कळून आला. परंतु तो वचनाचा धड असल्यामुळें त्यानें त्या बाईशीं कांहीं शर्ती ठरवून सोमणणाचे नांवानें ती सर्व जहागीर करून दिली, व आपण मजलापूर नांवाच्या खेड्यांत जाऊन राहिला. सोमणणास यापुढें खानगवंडे असें म्हणावें ही वरील शर्तीपैकीं एक शर्त होती. असे सत्यप्रतिज्ञ पुरुष फारच विरळा.

१ हा विजापूर जिल्ह्याचा एक तालुका आहे. विजापुरच्या अदिलशाही घराण्याच्या कारकीर्दीत तो सय्यद मासून बोखारी उर्फ अंकुशखान यास जहागिरी दाखल दिलेला होता.

त शिरहट्टी येथें सावनूरच्या नवाबांचा अमल सुरू झाला. इ. स. १७५६ त सावनूरच्या नवाबानें बाळाजी बाजीराव पेशव्यास जे ११ परगणे दिले त्यांत शिरहट्टी हा परगणा होता. तेव्हांपासून देसाई हे इनामदार या नात्यानें त्याची वहिवाट करूं लागले. इ. स. १७६४ त लक्ष्मेश्वर परगणा गोविंद हरी पटवर्धन यास पेशव्यांकडून सरंजामादाखल मिळाला, व इ. स. १८०१ सालीं पटवर्धनांच्या सरंजामाचे विभाग झाले, तेव्हां शिरहट्टीचा अधिकार चिंतामणराव सांगलीकर यांचेकडे आला. शिरहट्टी गदगच्या दक्षिणेस १२ मैलांवर सदर्न मराठा रेलवेवर आहे.

५श्रीमंतगड.—याला पूर्वीं सीमांतगड असें म्हणत असत. हा किल्ला शिरहट्टीच्या दक्षिणेस १० मैलांवर आहे. हा किल्ला जरी सांगलीकरांचे हद्दींत आहे, तरी त्याचें स्वामित्व मिरजकरांकडे आहे. हा किल्ला साताराच्या राजांनीं बांधला असें सांगतात. तटाची उंची ३० फूट व रुंदी ८ फूट आहे. तटावर पडभिंत असून तिला बंदुका मारण्याकरितां भोकें ठेविलेलीं आहेत. हल्लीं किल्ल्यांत बाभळीचीं झाडें व दुसरीं कांटेरीं झुडपें पुष्कळ आहेत. तसेंच आंत विषारी जीवजंतुही पुष्कळ आहेत. या किल्ल्याचा आकार वर्तुळखंडाच्या आकाराचा आहे. त्याला एकंदर ३० बुरूज आहेत. त्यांपैकीं एक बुरूज फारच मोठा असून त्यावरून दक्षिणेच्या बाजूस पाहिलें तर तुंगभद्रा नदीचा प्रवाह दृष्टीस पडतो. तुंगभद्रा नदी तेथून सुमारें १० मैलांवर आहे. तीस बुरुजांपैकीं पूर्वेच्या बाजूचे सहा बुरूज इ. स. १८५८ त इंग्लिश सरकारच्या हुकुमावरून पाडून टाकलेले आहेत. बाकीचा सर्व भाग दुरुस्त आहे. आंत

यल्लमा देवीचें देवालय आहे; तसेंच पांच तळीं आहेत. सर्वांत मोठ्या तळ्याचा परीघ ८२९५ फूट असून आंत ८–९ फूट ह्मणजे सुमारें दोन पुरुष पाणी आहे. याच्या संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

६ **तेरडळचा किल्लाः**—हें तेरडळ शहर बेळगांवच्या ईशान्येस ६० मैलांवर, व सांगलीच्या आग्नेयीस ४१ मैलांवर आहे. या शहरापासून कृष्णेचा प्रवाह ४॥ मैलांवर आहे. हें तालुक्याचें ठाणें आहे. पूर्वीं याच्या सभोंवार तट होता. येथील नेमीनाथ नांवाच्या देवळावरील शिलालेखांत ज्या किल्ल्याचा उल्लेख केलेला आहे, तो हाच किल्ला असावा. परंतु हल्लीं जो तट अवशेष आहे, त्याला बंदुका मारण्याकरितां भोंके ठेविलेलीं आहेत, त्यावरून ह्या तटाची मागून बरेच वर्षांनीं दुरुस्ती केलेली असावी. कारण वरील शिलालेख इ० स० ११२२ त लिहिलेला आहे; व त्या काळीं बंदुकीच्या दारूची युक्ति निघालेली नव्हती. प्राचीन काळीं तेरडळच्या पूर्वेकडील कोनांत एक किल्ला असून त्याला दुहेरी तट होता असें दिसून येतें. त्याची बाहेरची भिंत हल्लीं जमीनदोस्त झालेली आहे. तसेंच पूर्वीं बाहेरचा तट व आंतला तट यांच्यामध्यें खंदक होता तोही हल्लीं बुजून गेलेला आहे. आंतल्या तटाचा कांहीं भाग अवशेष आहे. त्याचा पूर्वेकडील दरवाजा मात्र अद्यापि शाबूत आहे. याच्या दोन्ही बाजूंस दोन बुरूज आहेत, व दोन्ही बाजूंनीं आंतल्या तटाच्या भिंती त्याला आणून मिळविलेल्या आहेत. हा दरवाजा १२फूट उंच व १० फूट रुंद आहे; व प्रत्येक बुरुजाची उंची ३० फूट व व्यास २५ फूट आहे. तटाची उंचीही सुमारें

२९ फूट आहे. पूर्व दरवाजा, व पश्चिम दरवाजा यांच्यामध्यें ९२० फूट अंतर आहे. या दोन दरवाज्यांच्या बरोबर मध्य अंतरावर एका उंचवट्याच्या ठिकाणीं एक बुरूज बांधलेला आहे. याची उंची ५० फूट, व व्यास ४२ फूट आहे. त्या बुरुजाजवळ हल्लीं मामलेदार कचेरी आहे. या बुरुजावर एक मोठी तोफ पडलेली होती, परंतु इ० स० १८५८त इंग्रज सरकारच्या हुकुमावरून ती **सांगली** येथें आणून फोडून टाकिली. याशिवाय किल्ल्याच्या इतर बुरुजांवरही दोन तीन तोफा होत्या. परंतु त्याही **सांगलीस** आणून फोडून टाकिल्या. पश्चिमेकडील दरवाज्याजवळचा तट बराच दुरुस्त आहे. या दरवाज्याच्या आंतले अंगास पहारेकरी लोकांकरितां कोठड्या केलेल्या आहेत. हल्लीं उत्तरेकडील खोल्यांत गांवच्या पाटीलकुळकर्ण्यांची कचेरी किंवा चावडी आहे, व दक्षिणेकडील कोठड्यांचा सावकारी तुरुंगाकडे उपयोग करितात. ह्या किल्ल्याचे संबंधानें दुसरी ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

७ **येलवट्टी किल्ला**:—हा किल्ला शिरहट्टीच्या ईशान्येस ७ मैलांवर आहे. हा किल्ला इ. स. १८४६ त ईस्ट इंडिया कंपनीनें **सांगली** संस्थानचे अधिकारी **चिंतामणराव पटवर्धन** यांस इ. स. १८४४ त कोल्हापूर प्रांतांतील गडकरी लोकांनीं जें बंड केलें होतें ते मोडण्यांत त्यांनीं इंग्लिशांस मदत केली ह्मणून इनाम दिला. किल्ल्याचें क्षेत्रफळ ६०० चौरस फूट आहे. तटाला एकंदर १२ बुरूज आहेत. पडभिंत धरून प्रत्येक बुरुजाची उंची २९ फूट, व प्रत्येक बुरुजाचा व्यास ४०

फूट आहे. किल्ल्याचा तट २० फूट उंच व १० फूट रुंद आहे. हा किल्ला शिरहट्टीचे खानगवंडे देसाई यांनीं सुमारें २५० वर्षांपूर्वी बांधला असें म्हणतात. उत्तरेच्या बाजूचा तट ४ फुटांपर्यंत दगड व चुना यांनीं बांधलेला आहे. चार फुटांवरचा तट मातीचा आहे; व बाकीचा तीन बाजूंचा तट दगड व माती ह्यानीं बांधलेला आहे. उत्तरेकडील तट केवळ मातीचा असल्यामुळें इ० स० १८५८ त हा किल्ला पाडण्याचें विशेष कारण आहे, असें इंग्लिशसरकारास वाटलें नाहीं. याचे संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

येलवट्टी येथें सुमारें दीड हजार लोकांची वस्ती आहे. येथील गणेश्वराचे देवालय प्रसिद्ध असून तेथें लांबलांबची यात्रा जमते. या देवालयाच्या दरवाज्यावर एक शिलालेख आहे. त्यांत असें लिहिलें आहे. कीं, " आषाढ शुद्ध १२ प्रमाथी संवत्सर शके १०७३ (इ. स. ११५१) या दिवशीं संक्रांत होती. त्या दिवशीं राजा चालुक्य विक्रमचक्रवर्ती त्रिभुवनमाल वीर रंगीदेव यानें गणपतीला सहा मार (?) जमीन इनाम दिली अशाबद्दल पुज्याऱ्याच्या हातावर पाणी सोडलें. "

मे० डायरेक्टर साहेब बहादूर, विद्याखातें, यांनीं बक्षीस देण्याकरितां मंजूर केलेलीं पुस्तकें.

१.	छत्रपति शाहूमहाराज यांचें चरित्र.	१ऽ८
२.	अकबर बादशहाचें चरित्र.	१ऽ४
३.	शिक्षणसार.	ऽ७
४.	नीतिबोध.	ऽ६
५, ६, ७.	गलिव्हरचा वृत्तांत—भाग १, २ व ३. (सचित्र) प्रत्येकीं.	ऽ५
८.	सदर भाग ४....	ऽ६
९.	महाराष्ट्रांतील किल्ले—भाग १.	ऽ१२
१०.	महाराष्ट्रांतील किल्ले—भाग २.	ऽ१२
११.	औरंगजेब बादशहाचें चरित्र—पूर्वार्ध.	ऽ८
१२.	,, ,, ,, उत्तरार्ध	१
१३, १४.	इसापनीति—भाग १ व २ प्रत्येकीं....	ऽ४
१५.	सदर दोन्ही भागांचें एकत्र बांधलेलें पुस्तक (सुरेख मजबूत कापडी)	ऽ१०
१६.	डॉ० स्विफ्ट यांचे चरित्र.	ऽ३
१७.	नकुल [illegible].	ऽ२
१८.	मुलांस नवी देणगी.	ऽ२
१९, २०, २१.	सुबोध गोष्टी—भाग १, २ व ३. प्रत्येकीं.	ऽ२
२२.	सायंकाळची करमणूक....	ऽ६
२३.	थोरांच्या आख्यायिका.	ऽ१ऽ६
२४.	बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें चरित्र.	ऽ३

वरील सर्व पुस्तकें, नवीन किताबखाना, बुधवार पेठ, पुणें, येथें विकत मिळतील.